
सप्टेंबर २०१८/पाने ६०/किंमत ₹१०

# लोकराज्य



सामर्थ्य शिक्षणाचे, समृद्ध महाराष्ट्राचे!

शैक्षणिक क्रांतीचे जनक : राजर्षी छत्रपती शाहू महाराज

# गावोगावी पोहोचल्या विकासाच्या वळणवाटा

## राज्याच्या कानाकोपऱ्यात ग्रामीण रस्त्यांचा विकास

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
ग्रामविकास विभाग
महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था



श्री. नरेंद्र मोदी
मा. प्रधानमंत्री




श्री. देवेंद्र फडणवीस
मा. मुख्यमंत्री

पंकजा गोपीनाथ मुंडे
मा. मंत्री–ग्रामविकास, महिला व बाल विकास

श्री. दादाजी भुसे
मा. राज्यमंत्री, ग्रामविकास



१७,८०० किलोमीटर लांबीच्या रस्त्यांना प्रशासकीय मान्यता प्रदान








मुख्यमंत्री ग्राम सडक योजना

ग्रामीण रस्त्यांवर प्रति तास ४० कि.मी. ची वेगमर्यादा पाळा, अपघात टाळा!

- ३०,००० किलोमीटर रस्त्यांची सुधारणा / बांधणी
- २५० + लोकसंख्येची आदिवासी क्षेत्रातील गावे / वस्त्यांना एक बारमाही रस्ता
- रस्त्यांच्या कामात नवीन तंत्रज्ञानाचा वापर
- ८,३४० किमी लांबीच्या रस्त्यांची कामे प्रगती पथावर
- ५०० + लोकसंख्येची गावे / वस्त्यांना एक बारमाही रस्ता
- डांबरीकरणात WASTE PLASTIC चा वापर पर्यावरण पूरक पाऊल
- ५९५० किलोमीटर लांबीच्या रस्त्यांची कामे पूर्ण
- ५ वर्ष देखभाल दुरुस्तीच्या हमीसह गुणवत्तापूर्वक कामे

## 'दो शेरों के बीच खडा हूँ!' ६



देशाचे माजी प्रधानमंत्री भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांच्या निधनानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या स्मृतींना उजाळा दिला...



## द्रष्टा राजर्षी १०

बहुजन आणि अस्पृश्य समाजाचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणून छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांनी अविरत कार्य केले. असे करत असताना त्यांनी महात्मा जोतिबा फुले, छत्रपती शिवाजी महाराज यांसारख्या राष्ट्रपुरुषांच्या कार्याचा वारसा जपला.

## शैक्षणिक क्रांतीचे जनक १४

काळाच्याही पुढे पाहण्याची दृष्टी लाभलेल्या राजर्षी शाहू महाराजांनी समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी शिक्षणाला पर्याय नाही हे अचूकपणे जाणले होते. त्यामुळेच शिक्षण सर्वसामान्य माणसांपर्यंत पोहोचण्यासाठी त्यांनी धोरणे आखून त्यांची प्रभावीपणे अंमलबजावणी केली.



## सामाजिक समतेचा अधिष्ठाता १८

बहुजन समाजाची व विशेषतः अस्पृश्य वर्गाची अस्मिता जागृत करण्याचे, त्यांच्या सर्वांगीण उद्धाराचे कार्य राजर्षी शाहू महाराजांनी केले. त्याद्वारे महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात समता प्रस्थापित करण्याचा मौलिक प्रयत्न केला.



## शिका आणि समर्थ व्हा... २१



विविध घटकांतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलती मिळाव्या यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना आणि डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना राबवली जात आहे.



## यशाची चैतन्यदायी प्रेरणा ३२

शासनामार्फत विविध योजना राबवण्यात येतात. या योजनांचा लाभ घेऊन अनेकजण आपल्या जीवनात नवे चैतन्य फुलवत असतात. अशा काही चैतन्यदायी आणि प्रेरणादायी यशकथा..

## मिशन.. शेतीच्या भविष्यासाठी! ५४

'राष्ट्रीय शेतकरी आयोगा'च्या शिफारसी प्रधानमंत्र्यांनी गंभीरपणे घेतल्या असून, त्यामधून शेती व शेतकऱ्यांचे नवे भविष्य घडेल...


| | |
|---|---|
| 'दो शेरों के बीच खडा हूँ!' | ६ |
| कविमनाचे खंबीर नेतृत्व | ८ |
| द्रष्टा राजर्षी | १० |
| शैक्षणिक क्रांतीचे जनक | १४ |
| गाव तिथे शाळा | १७ |
| सामाजिक समतेचा अधिष्ठाता | १८ |
| शिका आणि समर्थ व्हा... | २१ |
| संधी आणि प्रेरणा | २६ |
| उंच माझा झोका... | २७ |
| अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांसाठी योजना | ३० |
| यशाची चैतन्यदायी प्रेरणा | ३२-४५ |
| नोंदी | ४६-५१ |
| समस्या इलेक्ट्रॉनिक कचऱ्याची | ५२ |
| मिशन.. शेतीच्या भविष्यासाठी! | ५४ |
| व्हा... 'युवा माहिती दूत' | ५६ |
| शासन आपल्या दारी | ५७ |
| केरळमधील पूरग्रस्तांसाठी महाराष्ट्राकडून अर्थसाहाय्य | ५८ |

वर्ष ७० वे | अंक ३ | सप्टेंबर २०१८

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

लोकराज्य


■ मुख्य संपादक — ब्रिजेश सिंह
■ संपादक मंडळ — अजय अंबेकर, शिवाजी मानकर
■ संपादक — सुरेश वांदिले
■ उपसंपादक — गजानन पाटील, राजाराम देवकर
■ प्रशासन — मीनल जोगळेकर
■ वितरण — मनीषा पिंगळे, मंगेश वरकड, अश्विनी पुजारी
■ साहाय्य — स्वप्नाली जाधव, भारती वाघ
■ मुखपृष्ठ — सीमा रनाळकर, सुशिम कांबळे
■ मांडणी, सजावट — शैलेश कदम
■ मुद्रितशोधन — उमा नाबर
■ मुद्रण — डिलिजंट मीडिया कॉर्पोरेशन लि., महापे, नवी मुंबई.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
Email : lokrajya.dgipr@maharashtra.gov.in

वर्गणीदार व तक्रार निवारण: ०२२ - २२८१८३१२
Email : lokvitaran.dgipr@maharashtra.gov.in

ई - लोकराज्य http://dgipr.maharashtra.gov.in

या अंकात प्रकाशित लेखातील मतांशी
शासन सहमतच असेल असे नाही.



# कदम मिलाकर चलना होगा...

बाधाएँ आती हैं आएँ, घिरें प्रलय की घोर घटाएँ,
पावों के नीचे अंगारे, सिर पर बरसें यदि ज्वालाएँ,
निज हाथों में हँसते-हँसते, आग लगाकर जलना होगा।
क़दम मिलाकर चलना होगा।

हास्य-रूदन में, तूफ़ानों में, अगर असंख्यक बलिदानों में,
उद्यानों में, वीरानों में, अपमानों में, सम्मानों में,
उन्नत मस्तक, उभरा सीना, पीड़ाओं में पलना होगा।
क़दम मिलाकर चलना होगा।

उजियारे में, अंधकार में, कल कहार में, बीच धार में,
घोर घृणा में, पूत प्यार में, क्षणिक जीत में, दीर्घ हार में,
जीवन के शत-शत आकर्षक, अरमानों को ढलना होगा।
क़दम मिलाकर चलना होगा।

सम्मुख फैला अगर ध्येय पथ, प्रगति चिरंतन कैसा इति अब,
सुस्मित हर्षित कैसा श्रम श्लथ, असफल, सफल समान मनोरथ,
सब कुछ देकर कुछ न मांगते, पावस बनकर ढ़लना होगा।
क़दम मिलाकर चलना होगा।

कुछ काँटों से सज्जित जीवन, प्रखर प्यार से वंचित यौवन,
नीरवता से मुखरित मधुबन, परहित अर्पित अपना तन-मन,
जीवन को शत-शत आहुति में, जलना होगा, गलना होगा।
क़दम मिलाकर चलना होगा।

**- अटलबिहारी वाजपेयी**

# शैक्षणिक क्रांती



**संभाजी पाटील-निलंगेकर**
मंत्री, कामगार, भूकंप पुनर्वसन, कौशल्य विकास, माजी सैनिकांचे कल्याण

२१ सप्टेंबर १९१७ हा दिवस आपल्या राज्यासाठी अत्यंत महत्त्वाचा क्रांतिकारी दिवस ठरला आहे. राजर्षी शाहू महाराजांनी या दिवशी कोल्हापूर संस्थानात, प्राथमिक शिक्षण मोफत आणि अनिवार्य केले. या निर्णयाने शैक्षणिक क्रांतीचा पाया घातला गेला असे म्हटल्यास वावगे ठरू नये. या निर्णयामुळे कोल्हापूर संस्थानातील प्राथमिक शाळा आणि विद्यार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढली. म्हणूनच हा दिवस शैक्षणिक क्रांती दिवस म्हणून साजरा केला जातो.

राजर्षी शाहू महाराज हे दूरदृष्टीचे शासक होते. समाजातील विविध घटकांच्या सर्वांगीण प्रगती व उन्नतीसाठी त्यांनी विविध प्रभावी निर्णय घेतले. 'गाव तिथे शाळा' अशी घोषणा करून, त्याची अंमलबजावणी केली. उच्च शिक्षणालाही त्यांनी असेच प्राधान्य दिले. ज्या काळात संपूर्ण मुंबई राज्यात शिक्षणावर वार्षिक ७० हजार रुपये खर्च केला जात असे, त्या काळात, कोल्हापूर संस्थानात वार्षिक १ लाख रुपये खर्च केला जाई. एकूण उत्पनाच्या ही रक्कम २३ टक्क्यांहून अधिक होती. आपल्या देशात कोणत्याही प्रांतात इतकी मोठी रक्कम शिक्षणावर खर्ची केली जात नसे.



चांगले शिक्षकच उत्तम विद्यार्थी घडवू शकतात, हे लक्षात घेऊन महाराजांनी शिक्षण प्रशिक्षण आणि मेरिट प्रमोशन स्किम सुरू केल्या. शिक्षण घेताना विद्यार्थ्यांची निवासाची काळजी मिटावी यासाठी, वसतिगृहे सुरू केली. समाजातील उपेक्षित घटकांतील नागरिकांसाठी संस्थानाच्या नोकरीत राखीव जागांचा निर्णय घेऊनच ते थांबले नाहीत तर, या घटकांचा संस्थानातील नोकरीचा अनुशेष भरेपर्यंत; इतर घटकांतील नागरिकांची भरती न करण्याचा निर्णय त्यांनी घेतला. जातिनिर्मूलनासाठी त्यांनी केलेले कार्य महत्त्वाचे ठरले. आंतरजातीय विवाहांना चालना देण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले.

राजर्षी शाहू महाराजांच्या आदर्शाप्रमाणेच महाराष्ट्राचे सरकारसुद्धा शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य देत आहे. समाजातील सर्व घटकांना दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे, यासाठी विविध योजना प्रभावीपणे राबवत आहे. यापैकी एक महत्त्वाची योजना म्हणजे राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना. आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांना उच्चशिक्षण घेताना कोणतीही अडचण येऊ नये या हेतूने, ही शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना राबवण्यात येत आहे. यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून आर्थिकदृष्ट्या मागास वर्गातील विद्यार्थ्यांच्या पालकांची वार्षिक उत्पन्नमर्यादा आठ लाख रुपये केली आहे. यामुळे मोठ्या संख्येने या घटकांतील विद्यार्थ्यांना याचा लाभ मिळेल. या योजनेंतर्गत वैद्यकीय, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, मत्स्यव्यवसाय, दंत वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्कात ५० टक्के सवलत देण्यात येते. डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह योजनेच्या माध्यमातून ग्रामीण आणि दुर्गम भागातील व व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता दिला जातो. अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या विविध योजनांच्या माध्यमातून शेतकरी आणि तरुणांसाठी रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणावर उपलब्ध व्हाव्यात यावर शासनाने लक्ष केंद्रित केले आहे. इतर मागास वर्ग, विशेष मागास प्रवर्ग आणि खुल्या संवर्गातील विद्यार्थ्यांना परदेशातील नामवंत शिक्षण संस्थेत पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम घेता येणे शक्य व्हावे यासाठी, संपूर्ण शैक्षणिक खर्च देण्याचा महत्त्वाचा निर्णय आम्ही घेतला आहे.

लोकराज्यच्या या अंकात राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे अलौकिक शैक्षणिक, सामाजिक कार्य, शासनाच्या विविध योजना, या योजनांचा लाभ घेऊन ज्या युवकयुवतींनी आपल्या जीवनात परिवर्तन घडवून आणले त्यांच्या यशकथांचा समावेश केला आहे. हा अंक आपणास आवडेल अशी आशा आहे.

हा अंक मुद्रणासाठी जात असतानाच; देशाचे थोर नेते, माजी प्रधानमंत्री भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांचे निधन झाले. अत्यंत दूरदृष्टी असलेल्या या कणखर व लोकोत्तर नेत्याने आपल्या देशाला एका वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले. भारताची समर्थ अशी मुद्रा संपूर्ण जगात उमटवली. अशा या महान नेत्याच्या निधनामुळे भारतमातेने आपला एक तेजस्वी पुत्र गमावला आहे. श्रद्धेय अटलजी हे आम्हा सर्वांचे प्रेरणास्थान आणि ऊर्जास्रोत होते. त्यांचे विचार अंगी बाणवून, आम्ही महाराष्ट्राच्या चौफेर विकासासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करणार आहोत. त्यांना महाराष्ट्र शासनातर्फे व लोकराज्य परिवारातर्फे मन:पूर्वक श्रद्धांजली.

**संभाजी पाटील-निलंगेकर**
**(अतिथी संपादक)**

**देशाचे माजी प्रधानमंत्री भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या निधनानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या स्मृतींना दिलेला हा उजाळा...**

# 'दो शेरों के बीच खडा हूँ!'

**देवेंद्र फडणवीस**, मुख्यमंत्री

सार्वजनिक जीवनात आमच्या पक्षाची, म्हणजेच भारतीय जनता पक्षाची, वाटचाल सुरू झाली ती अत्यंत प्रतिकूल वातावरणात. मी त्या वेळी लहान होतो. आणीबाणीच्या काळात बाबा, माझे वडील कारागृहात होते. आई घराचा कारभार चालवायची. वाट खडतर होती; पण ध्येयावरची निष्ठा किंचितही ढळली नव्हती. ध्येयवेड्यांच्या या काफल्याचे नायक होते अटलबिहारी वाजपेयी. आमचे अटलजी! ते आमचे देव होते...

माझ्या वाढत्या वयातला काळ त्यांच्या ओघवत्या वक्तृत्वाच्या छत्रछायेतला होता. त्यांच्या कविता मला लहान वयात पाठ होत्या. मी शाळकरी वयाचा असताना नागपुरात पक्षाचं अधिवेशन होतं. सगळे बडे नेते नागपुरात येणार होते. बाबा अधिवेशनाच्या व्यवस्थेच्या गडबडीत होते. कार्यकर्ते झटत होते. तयारी पूर्ण होत होती. या संधीचा लाभ घेत अटलजींसमवेत छायाचित्र काढून घ्यायचंच,' असं मी आणि माझ्या भावानं ठरवून टाकलं होतं. त्यासाठी बाबांच्या खूप मागं लागलो; पण ते काही बधेनात. ओळखीचा लाभ घेत अटलजींसमवेत आपल्या मुलांचं छायाचित्र काढून घेण्याचा हट्ट पुरवणं त्यांच्या स्वभावात नव्हतंच. पहिला दिवस तर तसाच गेला. छायाचित्र काही काढून घेता आलं नाही.

या मार्गानं काही आपलं काम व्हायचं नाही,' हे माझ्या दुसऱ्या दिवशी लक्षात आलं.

मग मी प्रमोद महाजन यांच्याकडं लग्गा लावायला सुरवात केली. त्या काळात पक्षाचा पसारा छोटा होता. साधनं नव्हती. त्यामुळे प्रमोदजी मोठे नेते; पण उतरायचे आमच्याच घरी. ओळख होतीच.

आम्हाला अटलजींबरोबर छायाचित्र काढून घ्यायचं आहे,'' आम्ही प्रमोदजींना सांगितलं. त्यांनी आमची अटलजींशी ओळख करून दिली आणि या मुलांना तुमच्याबरोबर छायाचित्र काढून घ्यायचं आहे,' असं त्यांना सांगितलं.

अटलजींनी लगेच आम्हा दोघा भावांना त्यांच्या दोन्ही बाजूंना उभं केलं. छायाचित्र काढलं गेलं. आम्ही खूश. खरं तर हवेतच! तेवढ्यात आमचे बाबा तिथं पोहोचले. अटलजींनीच त्यांना हाक मारली आणि म्हणाले : गंगाधररावजी, मैं इन दो शेरों के बीच खडा हूँ!''

नंतर मी पक्षकार्य करू लागलो. जबाबदाऱ्या पार पाडू लागलो. नगरसेवक झालो, महापौर झालो अन् पाठोपाठ आमदारही. प्रसिद्ध छायाचित्रकार विवेक रानडे हा माझा मित्र. त्यानं गंमत म्हणून माझी छायाचित्रं काढली अन् कशी कुणास ठाऊक; पण त्या छायाचित्राची पोस्टर्स कुणीतरी छापून घेतली. मोठमोठ्या जाहिराती नागपुरात झळकू लागल्या. मी अवाक् झालो अन् काही दिवस नागपुरातून गायबही! खूप चर्चा सुरू होती त्या छायाचित्रांची.



अटलबिहारी वाजपेयी
जन्म : २५ डिसेंबर, १९२४, मृत्यू : १६ ऑगस्ट, २०१८

सगळं शांत झालं आहे अन् लोक आता त्या जाहिराती विसरले आहेत, अशी खातरजमा करून घेतल्यानंतर मी मतदारसंघात हिंडू लागलो. अचानक एक दिवस अप्पाकाकांचा दिल्लीहून फोन आला. अप्पाकाका म्हणजे एन. एम. घटाटे. हे दिल्लीत सर्वोच्च न्यायालयात वकिली करणारे घटनातज्ज्ञ. अटलजींचे जवळचे मित्र. ते नागपूरचे असल्यानं आमच्या कुटुंबाचेही सुहृद.

अप्पाकाका मला म्हणाले तू दिल्लीला ये. अटलजींनी बोलावलं आहे.''

नेमकं काय झालं आहे, ते मला काहीच कळेना; पण अटलजींनी बोलावलं होतं, तेव्हा जाणं तर भागच होतं. दिल्लीत पोचलो. अटलजींच्या घरी गेलो. ते म्हणाले : आईये, आईये... मॉडेल एमएलएजी! कैसे हो आप?'' झाला प्रकार माझ्या लक्षात आला आणि मी कसनुसा हसलो. त्यांना अभिवादन केलं. ताण हलका करत अटलजी म्हणाले : आप एमएलए तो थेही, लेकिन अब मॉडेल भी बन गये!''

मिश्कील कोट्या करत अटलजींनी जुन्या आठवणी जागवल्या. त्या वेळी माझ्या बाबांना बरं नव्हतं. आजारपण गुंतागुंतीचं होतं. बाबांना भेटायला अटलजी दोनदा आवर्जून आले होते.

''पोहे करा, मला खूप आवडतात,'' असं पूर्वी एकदा माझ्या आईला सांगून खास मराठी पदार्थांची चव चाखून गेले होते.

नंतर नंतर अटलजींच्या भेटी कमी होत गेल्या. ते सार्वजनिक जीवनातून जवळपास निवृत्त झाले होते. मी दिल्लीला गेलो तेव्हा एकदा त्यांच्या निवासस्थानी डोकावलो. विनम्रपणे नतमस्तक झालो. अटलजींनी लावलेल्या पक्षाचा वेलू आता चांगलाच विस्तारला होता. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी त्यावर कळस चढवला होता. आता भाजपची सत्ता बहुतांश राज्यांत आहे.

अटलजी आता आपल्यात राहिले नाहीत. अटलजींनी पक्षासाठी केलेल्या परिश्रमांची अशा दुःखाच्या प्रसंगी आठवण होते. त्यांची प्रगल्भता, निर्णयक्षमता लक्षात येते आणि थक्क व्हायला होतं.

## मृदू आणि कठोर दोन पैलू

पाकिस्तानशी मैत्रीचा हात पुढं करणारे, उपखंडात शांततापर्व निर्माण करू पाहणारे कविहृदयी राजकीय नेते होते अटलजी. मात्र, त्यांच्या या सकारात्मक प्रयत्नांना प्रतिसाद देण्याऐवजी शेजारी देश कुरापती काढत आहेत हे दिसताच कारगिलचं युद्ध छेडत शत्रुपक्षाला नमवणारे धडाडीचे कठोर प्रशासकही होते ते. आपण मित्र निवडू शकतो; शेजारी नव्हे' अशी परिस्थितीची जाणीव असलेले नेते; पण राष्ट्र अजेय असावं' याची जाणीव ठेवणारे प्रधानमंत्रीही! अणुचाचणीची सज्जता भारतानं केली होतीच; पण राजकीय निर्णय होत नव्हता. प्रधानमंत्रीपद सांभाळणारे नेते कचरत होते. डॉ. अब्दुल कलाम यांच्यासारख्या ऋषितूल्य शास्त्रज्ञानं अटलजींना भेटून जेव्हा 'पोखरण'चा प्रस्ताव त्यांच्यापुढे ठेवला, तेव्हा क्षणाचाही विलंब न लावता अटलजींनी होकार दिला होता. विदेशी महासत्ता निर्बंध लादतील, याची अजिबात तमा न बाळगता अटलजींनी चाचण्यांना देकार दिला. याबाबत ते अत्यंत स्पष्ट होते, महासत्ता होण्याचा मार्ग त्यांना चोखाळायचा होताच. शंभर कोटी लोकसंख्येच्या आपल्या देशावर कोणताही देश फार काळ निर्बंध लादू शकत नाही, याची त्यांना खात्री होती. दोन ते अडीच वर्षांत सगळ्या देशांनी निर्बंध मागं घेतले. अटलजींना सामाजिक वास्तवाचीही जाण होती. प्रधानमंत्रीपदी असताना दारिद्र्यनिर्मूलनाच्या कामावर त्यांनी सर्वाधिक भर दिला होता. ग्रामसडक योजने'चा महत्त्वाकांक्षी प्रकल्प त्यांनी हाती घेतला तेव्हा ते म्हणाले होते, 'रस्त्यावर होणारा खर्च गावागावात समृद्धी आणेल, उत्पन्न वाढेल, अर्थव्यवस्थेला बरकत येईल, या सडकेचा वापर करूनच गावात इमारती उभारल्या जातील, शिक्षण पोहोचेल, तिथं शिक्षक जातील, दवाखाने उभारले जातील, डॉक्टर पोहोचतील.'

'सुवर्णचतुष्कोण' ही भारताची चारही टोकं जोडण्याची योजना क्रांतिकारी होती. अटलजींना निवडणुकीत पराभव पत्करावा लागला. सहकारीपक्षांनाही त्या निवडणुकीत फार यश लाभलं नाही. संयुक्त पुरोगामी लोकशाही आघाडी सत्तेत आली. त्या सरकारनं आर्थिक अहवाल प्रकाशित केला तेव्हा, २००७ मध्ये अटलबिहारी वाजपेयी यांच्या सरकारच्या काळात तब्बल सहा कोटी रोजगार निर्माण झाले, हे आकडेवारी देत मान्य केलं होतं. विशाल हृदयाचा हा नेता आपल्यासोबत असावा, अशी आम्हा सगळ्यांची इच्छा होती. आज भारताचा परमवैभवाचा प्रवास अतिशय वेगानं सुरू आहे. या परमवैभवाचा पाया ज्यांनी रचला ते अशा वेळी आपल्यात हवे होते. मात्र, आज ते आपल्यात नाहीत, हे सत्य स्वीकारताना मन कठोर करावं लागत आहे.

अटल, अढळ, अचल असलेलं हे नेतृत्व भारताच्या दिशादिशांत वास करत राहील, याची मला खात्री आहे!

अटलजींच्या स्मृतींना भावपूर्ण श्रद्धांजली. (साभार: सप्तरंग, दै.सकाळ)



अटलबिहारी वाजपेयी यांच्या पार्थिवावर पुष्पहार अर्पण करून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस.

डॉ. विनय सहस्रबुद्धे

# कविमनाचे खंबीर नेतृत्व

**अटलजी वृत्तीने लोकतांत्रिक होते आणि लोकशाहीबद्दल त्यांची काही ठाम मतंही होती. पक्षाच्या बैठकींमधून अटलजींचे म्हणणे हा 'अंतिम शब्द' असायचा. पण खुद्द अटलजी, पंचों की राय मानायचे. प्रधानमंत्री म्हणून अटलजींच्या कारकिर्दीचे मूल्यमापन करताना जमेच्या बाजूला अनेक भरभक्कम मुद्दे आहेत हे कोणालाही नाकारता येणार नाही. संपूर्ण कार्यकाल प्रधानमंत्री म्हणून यशस्वीपणे काम केलेले पहिले काँग्रेसेतर प्रधानमंत्री म्हणून त्यांचं वैशिष्ट्य तर निर्विवाद आहेच, पण वीस-पंचवीस पक्षांची मोट बांधून आणि त्यातही ममता, समता, जयललिता यांच्या सहयोगाने टिकाऊ सरकार चालविणं, ही त्यांच्या कौशल्याची कसोटी होती. पण महत्त्वाच्या ग्रासून टाकणाऱ्या काही समस्यांवर मात करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला.**

संपूर्ण कार्यकाल प्रधानमंत्री म्हणून यशस्वीपणे काम केलेले पहिले काँग्रेसेतर प्रधानमंत्री म्हणून अटलजींचे वैशिष्ट्य तर निर्विवाद आहेच, पण काही समस्यांवर मात करण्याचा प्रामाणिक प्रयत्न त्यांनी केला. राज्यसभेच्या निवडणुकीतला घोडेबाजार आणि खुली मतविक्री यांना पायबंद घालून, त्यांनी या निवडणुका पूर्णत: पारदर्शी केल्या. त्यांच्या राजकीय इच्छाशक्तीमुळेच मंत्रिमंडळाच्या सदस्य संख्येवर मर्यादा घालणारा आणि त्यातून पुन्हा एकदा स्वच्छ राजकारणाला चालना देणारा कायदा मंजूर होऊ शकला.

अटलजींना भेटण्याचे प्रसंग तसे विरळच. पण जेव्हा जेव्हा भेटलो तेव्हा ती भेट दीर्घकाळ स्मरणात राहणारी ठरली. १९८० च्या जानेवारीत भारतीय जनता पार्टीच्या सपशेल पराभवानंतर अटलजी मुंबईत आले होते. मी तेव्हा 'माणूस' साप्ताहिकाचा प्रतिनिधी म्हणून काम करायचो. अटलजी सायनला वेदप्रकाश गोयलांकडे उतरायचे. विद्यार्थी परिषदेमुळे गोयलजींची चांगली ओळख होती. फोन केल्यावर मुलाखतीची वेळही मिळाली. नंतर चांगले तासभर अटलजी माझ्यासारख्या एका नवजात स्तंभलेखकाशी बोलत होते. मोरारजी देसाईंच्या कार्यशैलीपासून ते जनता पार्टीतील संघ स्वयंसेवकांच्या कथित दुहेरी निष्ठेपर्यंत अनेक विषयांवर ते दिलखुलास बोलले. इतक्या दणदणीत पराभवानंतरच्या निराशेची पुसटशी छायाही मला त्यांच्या मनावर जाणवली नाही.

अटलजींना इतक्या जवळून भेटण्याची, पाहण्याची माझी ती पहिलीच वेळ होती. मनावर दडपण होतं, पण अगदी सहजपणे दिवाणावर स्वत:च्या बाजूलाच मला बसायला लावून अटलजींनी ताण हलका केला. बोलिए महाराज ! असं म्हणून प्रश्न विचारायला सांगितले आणि सहज संवादात मुलाखत पार पडली. शेवटी पराभरावे खचलेल्या पक्ष कार्यकर्त्यांना तुमचा संदेश काय? असं विचारल्यावर हसत म्हणाले, 'लिख लो !' आणि नंतर त्या प्रसिद्ध चार ओळी सांगितल्या :

*क्या हार में क्या जीत में, किंचित नहीं, भयभीत मैं,*
*कर्तव्य पथ पर जो मिले, यह भी सही; वह भी सही !*

नंतर खूप वर्षांनी मी पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीचा सदस्य झाल्यानंतर ते एका भाषणात काही विनोदाने पण तरीही गांभीर्याने जे म्हणाले होते ते ऐकल्यानंतर मला पुन्हा या अर्थगर्भ ओळी आठवल्या होत्या. भाषणात ते म्हणाले होते: परिश्रमों के बावजूद चुनाव में पार्टी क्यों हारती है यह कई बार समझ में नहीं आता मगर जैसे हार का पराभव का विश्लेषण होना चाहिए, वैसे जीत का भी होना चाहिए.

तसं पाहिलं तर खरोखरच एका विशिष्ट टप्प्यावर 'हार' आणि 'जीत' यांच्या पलीकडे अटलजी निघून गेले होते. विचारशील आणि विवेकी वृत्तीच्या या नेत्याला प्रवृत्ती आणि निवृत्ती या दोन्हींकडे समदृष्टीने पाहण्याची असाधारण क्षमता होती. सुधीर नांदगावकर हे निस्सीम अटलप्रेमी! अटलजी आणि अडवाणी हे दोघेही हिंदी सिनेमांचे चाहते. वेळ आणि मूड जमून आल्यानंतर कोणता सिनेमा



बघायचा? हे ठरवण्यापूर्वी ते खंदे समीक्षक असलेल्या सुधीर नांदगावकरांना फोन करायचे. २००६ मध्ये नांदगावकरांनी संपादित केलेले, 'राजनीती के उस पार' हे अटलजींच्या बिगर-राजकीय विषयांवरील भाषणांच्या संग्रहाचे पुस्तक रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीने प्रकाशित केले. संसदेच्या बालयोगी सभागृहात एका दिमाखदार सोहोळ्यात तेव्हाचे उपराष्ट्रपती भैरोसिंग शेखावत यांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन झाले. आपल्या अगदी छोट्याशा भाषणात अटलजी म्हणाले, 'पुस्तक का नाम राजनीती के उस पार है, मगर मंच पर जो भी बैठे है वह सब राजनीती के इस पार है ! मगर इस पार हो या उस पार, राजनीती की मंझधार में सिद्धन्तहीन होकर बहकर नहीं जाना चाहिए!'

'रंग माझा वेगळा' या प्रकारचं आपलं वेगळेपण, आपली वैशिष्टपूर्णता अटलजींनी नित्य कायम राखली. २००६ मध्येच; विकलांग होऊन अंथरुणाला खिळण्याआधी एकदा दिल्लीतल्या इंडिया इंटरनॅशनल सेंटरमध्ये कुठल्याशा कार्यक्रमाला ते आले होते. कुणा पत्रकाराने प्रश्न विचारला की तुम्ही राजकारणातून निवृत्त होणार आहात असं ऐकतोय? चालता-चालता क्षणभर थांबून त्या पत्रकाराकडे पाहात अटलजी म्हणाले; मी आणि निवृत्त? मग त्या निवृत्तीचं काय होणार? आणि मग हसत हसत निघून गेले.

ही प्रवृत्तिपरता त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा अविभाज्य भाग होती. त्यांच्या खाण्यापिण्याच्या आवडींबद्दल त्यांची मानसकन्या आणि तिचे पती अनेकदा बोलायचे. काव्य-शास्त्र-विनोदाची त्यांची आवड तर सर्व परिचित होती. कलकत्याच्या बडा बाजार कुमारसभा ग्रंथालयाच्या सभागृहात त्यांनी नव्वदच्या दशकाच्या पूर्वार्धात अगदी समरसून आपल्या निवडक कविता सादर केल्या होत्या, त्या यू-ट्यूबवर ऐकणं म्हणजे निखळ आनंद ! विनय आपटे त्यांच्या भाषणांचे व्हिडिओ पाहताना हमखास म्हणायचा ''अभिनेताय रे हा अभिनेता कसली आवाजाची फेक, किती ते चढउतार, किती बोलका चेहरा...'' उगाच नाही पद्मजा फेणाणी आपल्या काव्यगायनात अटलजींची नक्कल करतात तेव्हा हशा आणि टाळ्यांची जणू बरसातच होते!

माणूस म्हणून नेहमी जमिनीवर पाय ठेवून वावरणारी आणि मनुष्यजीवनाच्या विविध दालनांमधून रसिकतेने लीलया संचार करणारी माणसं सहसा राजकारणाच्या वाटेला जात नाहीत आणि गेलीच तर यशस्वी होत नाहीत. अटलजी हा एक सन्माननीय अपवाद ! जनसंघ आणि भाजपचे अध्यक्ष, परराष्ट्रमंत्री, संसद-सदस्य, विरोधी पक्षनेते आणि शेवटी प्रधानमंत्री म्हणूनही त्यांनी यशस्वीपणे जबाबदाऱ्या सांभाळल्या. संघटना आणि सरकार दोन्ही आघाड्यांवर त्यांच्या नेतृत्वाची छाप उमटली. व्यावहारिक राजकारणाची दडपणं पेलतानाही त्यांनी सैद्धान्तिक भूमिकेचं विस्मरण होऊ दिलं नाही !

परराष्ट्रमंत्री या नात्याने त्यांनी भारत-इस्रायल संबंधांची मुहूर्तमेढ रोवली. अलिप्ततावादाचं महत्त्व आणि मर्यादा हे दोन्ही ओळखणारे ते बहुदा पहिले परराष्ट्रमंत्री. हीच विचारांची स्पष्टता पुढे प्रधानमंत्री झाल्यावर त्यांनी पोखरणची अणुचाचणी घडवून आणतानाही दाखविली. सरकार स्थापन होऊन दोन महिने पूर्ण होण्याच्या आतच त्यांनी शतप्रतिशत गोपनीयता राखून एवढा मोठा निर्णय अमलात आणला आणि नंतर अमेरिकेच्या निर्बंधांना न जुमानता इतर आघाड्यांवरही ते लढले.

राज्यसभेच्या निवडणुकीतला घोडेबाजार आणि खुली मतविक्री यांना पायबंद घालून, एक प्रकारे पक्ष व्यवस्थेला मजबूत करण्यासाठी; त्यांनी या निवडणुका पूर्णतः पारदर्शी केल्या. त्यांच्या राजकीय इच्छाशक्तीमुळेच मंत्रिमंडळाच्या सदस्यसंख्येवर मर्यादा घालणारा आणि त्यातून पुन्हा एकदा स्वच्छ राजकारणाला चालना देणारा कायदा मंजूर होऊ शकला. १९९६ मध्ये आकाशवाणीच्या देशराज चौधरी स्मारक व्याख्यानात बोलताना अटलजींनी अनेकविध लोकतांत्रिक सुधारणांचा पुरस्कार केला होता. भारतीय संविधानाच्या अंमलबजावणीच्या समीक्षेसाठी त्यांनी एम. एन.वेंकटचलैया समिती नेमून खूप महत्त्वाचे विषय जनचर्चेत आणले. आघाडी-धर्म हा शब्द त्यांनीच रुजवला. त्यांच्या कौशल्यपूर्ण हाताळणीमुळेच त्यांच्या कारकिर्दीत झारखंड, छत्तीसगड आणि उत्तराखंडासारखी तीन छोटी राज्ये कोणतेही मोठे वादंग न माजता, हिंसेचा उद्रेक उफाळू न देता अस्तित्वात येऊ शकली; हेही लक्षात ठेवायला हवे.

अटलजींचे सामाजिक भानही अतिशय तल्लख होते. भाजपचे पहिले अध्यक्ष झाल्यानंतर, त्यांनी एका भीषण दलित हत्याकांडाच्या विरोधात आपला आक्रोश व्यक्त करण्यासाठी; एक पदयात्रा काढली होती. अनुसूचित जाती-जमातींच्या समाजबांधवांना कोणाच्या मेहेरबानीची नव्हे तर न्यायाची गरज आहे हे जाणून, त्यांनी समाजकल्याण मंत्रालयाला अतिशय अर्थवाही असे सामाजिक-न्याय मंत्रालय असे नाव दिले. भाजपच्या, वांद्रे रेक्लेमेशन परिसरात झालेल्या स्थापना – अधिवेशन स्थळालाही नाव होते ते 'समता नगर' हे!

१३ एप्रिल १९९१ या दिवशी समता-परिषदेच्या व्यासपीठावरून डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्मशताब्दीच्या कार्यक्रमात त्यांनी डॉ. बाबासाहेबांना श्रद्धांजली वाहताना खूप महत्त्वाच्या मुद्द्यांची चर्चा केली होती. संविधानात तरतूद असलेल्या वयस्क मताधिकाराच्या अधिकारामागची दृष्टी स्पष्ट करताना अटलजी म्हणाले होते, ''भिन्न प्रकृती, प्राकृतिक विषमता, बौद्धिक क्षेत्रातील असमानता, आर्थिकदृष्ट्या कोणी धनवान आणि कोणी निर्धन, असे असूनही सर्वांना सारखाच मताधिकार का? तर सर्वांमध्ये वसणारा आत्मा एकच आहे. त्या दृष्टीने लोकशाहीचा आत्माही आध्यात्मिकच आहे!''

अटलजी म्हणजे हे एवढे सारे आहे, होते! एखाद्याच्या निधनानंतर देशाची आणि समाजाची 'अपूरणीय क्षति' झाल्याचे सांगितले जाते. पण अटलजींच्या बाबतीत ते अक्षरशः खरं आहे. संघर्ष आणि समन्वय या दोन्हीचा यशस्वी मेळा घालणाऱ्या या असाधारण नेत्याने एका कवितेत जे म्हटले ते सर्वांसाठीचे पाथेय आहे.

*''आदमी को चाहिए कि वह जुझे,*
*परिस्थितीयोंसे लडे*
*एक स्वप्न टूटे तो दुसरा गढे !''*

(साभार: लोकसत्ता)

**(लेखक राज्यसभा सदस्य आहेत.).**

**राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे नाव महाराष्ट्राच्या जनतेला माहीत आहे. शाहू महाराजांना 'राजर्षी' ही उपाधी कानपूरच्या कुर्मी क्षत्रीय समाजाने दिली होती. लोकराजा, आरक्षणाचे जनक म्हणूनही महाराजांची ख्याती आहे. समता, न्याय आणि बंधुत्व याचा आग्रह त्यांनी कायम ठेवला. ज्या दिवसापासून शाहू महाराजांनी पदभार स्वीकारला तेव्हापासून २८ वर्षे कोल्हापूर संस्थानात रयेतेचे राज्य निर्माण केले. आजही राजर्षी शाहू महाराज यांनी मांडलेले आणि प्रत्यक्षात आणलेले विचार यावरच पुढे जात आहोत. बहुजन आणि अस्पृश्य समाजाचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणून अविरत कार्य महाराजांनी केले. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतिबा फुले यांसारख्या राष्ट्रपुरुषांच्या कार्याचा वारसा जपला.**

# द्रष्टा राजर्षी

**विनोद तावडे,** (मंत्री, शालेय शिक्षण आणि उच्च व तंत्र शिक्षण)

अनेक वर्षांपासून शिक्षणासाठी कोणतेही कष्ट सोसण्यासाठी समाज तयार असल्याचे दिसून आले आहे. प्रत्येक पालकाची इच्छा असते की, आपली मुले शिकावीत, त्यांनी प्रगती करावी. त्यामुळे माणूस घडवण्याचे काम शिक्षण करीत असते.

अज्ञानातून ज्ञानाकडे, वाईटातून चांगल्याकडे नेण्याचे काम शिक्षण करते. शिक्षणामुळे बुद्धी प्रखर तर होतेच पण उज्वल भविष्यही घडते. आपल्या प्रत्येकाच्या आयुष्यात शिक्षणाचे एक महत्त्व आहे. शिक्षणाच्या जोरावरच आपल्याला आपला विकास आणि प्रगती करता येणार आहे. आपल्या महाराष्ट्राला संपन्नतेचा, कलेचा, संस्कृतीचा वारसा आहेच पण त्याबरोबरच शैक्षणिक वारसाही आहे. आज काळाच्या ओघात आणि बदलत्या युगात शिक्षणक्षेत्रासमोरील आव्हाने वेगवेगळी आहेत, वेगवेगळ्या समस्या आहेत. पण या आव्हानांना, समस्यांना आपण सर्वांनी एकत्र येऊन सोडवणे आवश्यक आहे.

अनेकदा समोर येणारे प्रश्न, समस्या आणि आव्हाने यांचा नीट अभ्यास केला तर अनेक उत्तरे मिळतात. आजचे शिक्षण हे प्रॅक्टिकल असणे जितके आवश्यक तितकेच हे शिक्षण सर्वांपर्यंत पोहोचणे तितकेच आवश्यक आहे. सर्वांना समान शिक्षण असे आपण जेव्हा म्हणतो तेव्हा समाजातल्या प्रत्येक घटकाला शिक्षणाच्या समान संधी उपलब्ध होणे आवश्यक आहे. आजही विविध घटक समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील झालेले नाहीत असे असताना, या प्रवाहाला समाजाच्या मुख्य प्रवाहात सामावून घेणे, त्यांना उच्च शिक्षणाच्या संधी देणे हे राज्य शासन म्हणून आमचे कर्तव्य आहे, या विचारधारणेचा मी आहे.



## जनतेबद्दल कळवळ

छत्रपती शाहू महाराजांच्या मनात सामान्य जनतेबद्दल कळवळा होता आणि त्यामुळेच बहुजन समाजाची स्थिती सुधारावी हे त्यांचे प्राथमिक ध्येय होते. ते पूर्ण करण्यासाठी त्यांनी या घटकांना साक्षर करण्याचा विडा उचलला. संपूर्ण कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत केले.

शिक्षण हे एक क्रांतीचे साधन मानून त्यांनी

प्राथमिक शिक्षणावर भर दिला. शाहू महाराज यांनी आपल्या संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत करण्याचा कायदा केला. अशा प्रकारचा कायदा करणारे कोल्हापूर संस्थान हे भारतातील पहिले संस्थान होते. प्राथमिक शिक्षणाबरोबरच शाहू महाराजांनी माध्यमिक उच्च व तंत्रशिक्षणालाही महत्त्व दिले. अस्पृश्यता निर्मूलनासाठी उच्च वर्ण आणि अस्पृश्य अशा वेगळ्या शाळा चालवण्याची पद्धत बंद केली. बहुजन समाजाला शिक्षण दिल्याशिवाय त्यांची प्रगती होणार नाही आणि ते आपली गुलामगिरीतून सुटका करू शकणार नाही हे शाहू महाराजांनी ओळखले होते.

महाराजांनी आपल्या संस्थानात बहुजन समाजातील गरीब आणि होतकरू विद्यार्थ्यांना अनेक प्रकारे मदत केली, विद्यार्थ्यांना राहण्यासाठी वसतिगृहे, शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, तसेच परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्यास सुरुवात केली. कोल्हापूर येथे सर्व जातिधर्माच्या विद्यार्थ्यांसाठी एकच वसतिगृह सुरू केले. सर्वांनी समानतेने वागावे, यासाठी प्रयत्न केले. शाळा-दवाखाने-पाणवठे-विहिरी-सार्वजनिक इमारती सर्वांसाठी खुल्या केल्या. शाहू महाराजांनी अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी चर्मकार समाजातील कांबळे नावाच्या इसमाला स्वत:चे हॉटेल काढून दिले होते. त्या हॉटेलात इतरांनीही यावे म्हणून ते स्वत: त्या हॉटेलात चहा पिण्यास जात असत. असाच आणखी एक किस्सा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जेव्हा परळ बीआयटी चाळीत राहत असत, त्या वेळी शाहू महाराज बाबासाहेबांना त्यांच्या राहत्या घरी टांग्यातून प्रवास करून भेटावयास आले होते. घरी पोहोचल्यावर शाहू महाराज यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्नी रमाबाई आंबेडकर यांना, 'ताई चहा मिळेल का?' असे विचारले, बाबासाहेबांनी शाहू महाराज यांना घरी पाहताच, 'शाहू राजे, तुम्ही घरी येण्याचे कष्ट का केले असे विचारले.' यावर शाहू महाराज म्हणाले, 'डॉ. आंबेडकर आम्ही फक्त एका संस्थानाचे राजे आहोत, पण तुम्ही मात्र ज्ञानाचे राजे आहात'. या आणि असंख्य उदाहरणांवरून एक निश्चित होते की,आपले पद आणि प्रतिष्ठेचा कोणताही गर्व न करता, खऱ्या अर्थाने दरियादिल राजा म्हणजेच आपले शाहू महाराज...

असाच एक दुसरा किस्सा येथे सांगावासा वाटतो. १९२० मध्ये करवीर संस्थानातील माणगाव येथे सर्वात पहिली बहिष्कृत सभा भरली होती. त्या वेळी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर त्या सभेत उपस्थित होते. या वेळी या सभेसाठी उपस्थित असलेल्या अस्पृश्य समाजाला उद्देशून शाहू महाराज म्हणाले की, आज मी तुम्हा सर्वांवर खूश आहे कारण तुम्ही तुमचा शास्ता, नेता शोधून काढला आहे. मी, या ठिकाणी असे भाकीत करतो की, माझी मनोदेवता मला सांगते की, बाबासाहेब हे फक्त दलितांचे नेते नव्हेत तर संपूर्ण भारताचे नेते होतील.

### राजर्षी छत्रपती शाहू महाराज शैक्षणिक शुल्क शिष्यवृत्ती योजना

राजर्षी शाहू महाराज यांचे आचार विचार संपूर्ण महाराष्ट्रासाठी प्रेरणास्रोत आहेत. म्हणूनच दोन वर्षांपूर्वी त्यांच्या नावाने एक स्वतंत्र योजना शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने आणली. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शैक्षणिक शुल्क शिष्यवृत्ती योजना असे या योजनेचे नाव आहे. या योजनेचा फायदा उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मिळणार आहे. ही योजना महत्त्वाची अशासाठी आहे की, यात उच्च शिक्षण देण्यात येणाऱ्या महत्त्वाच्या पाच विभागांचा व ६००हून अधिक अभ्यासक्रमांचा समावेश आहे.



### राष्ट्राची खरी संपत्ती

छत्रपती शिवाजी महाराज हे समस्त महाराष्ट्राचे आराध्यदैवत आहेत तर राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे सामाजिक समतेच्या लढ्याचे यशस्वी नायक आहेत, असे मला वाटते. शिवाजी महाराजांचा गुलामीविरोधी स्वातंत्र्याचा लढा होता, तर शाहू महाराजांचा जातीयवादी शक्तीविरोधी समतेचा लढा होता. म्हणून राजर्षी शाहू महाराज म्हणतात, 'ब्राह्मणेतरांची ही चळवळ प्राण जाईतोवर हा शाहू सोडणार नाही.' राष्ट्रीय विचाराचा नागरिक हीच राष्ट्राची खरी संपत्ती आहे. महाराजांनी जातिभेद नष्ट करण्यासाठी जीवनभर अविरत प्रयत्न केले.

शिक्षणामुळेच समाजाचा विकास होऊ शकतो ही राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची धारणा होती. म्हणून त्यांनी त्या वेळच्या विविध जातींची २२ वसतिगृहे निर्माण केली व सर्व जातीच्या व समाजाच्या विकासाचा मार्ग मोकळा केला. सर्वप्रथम सर्वांना सक्तीचे मोफत शिक्षण सुरू केले. मुलींना सर्व शिक्षण मोफत देणारे ते पहिले राजे आहेत. राजाराम कॉलेजची स्थापना केली व उच्च शिक्षणाची पायाभरणी केली.

आपल्या शिक्षणातून आणि तसेच अभ्यासक्रमातून महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार प्रचारित व प्रसारित होत असतात. या थोर महापुरुषांचे सामजिक, राजकीय आणि सांस्कृतिक स्वरूपातील विचार आपल्याला प्रेरित व प्रोत्साहित करत असतात. त्यांचे विचार २१ व्या शतकात आपल्या विद्यार्थिवर्गाला नव्याने देणे आवश्यक आहे. म्हणूनच मला असे वाटते की, सामाजिक समतेचा

पुरस्कर्ता राजा म्हणूनच राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे नाव आपल्याला घ्यावे लागेल.

### मागासवर्गांसाठी आरक्षण

मागासवर्गांसाठी आरक्षण सर्वप्रथम शाहू महाराजांनी प्रत्यक्षात आणले. या वर्गांना विकासाच्या प्रवाहात आणायचे असेल तर त्यांच्यासाठी राखीव जागांची तरतूद केली पाहिजे अशी कल्पना महात्मा जोतिबा फुले यांनी मांडली होती. ही कल्पना शाहू महाराजांनी प्रत्यक्षात उतरवली. १९०२ मध्ये त्यांनी कोल्हापूर संस्थानातील मागास जातींसाठी ५० टक्के जागा राखीव ठेवण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. समाजातील सर्व घटकांना समानतेने वागवावे असे सांगून, त्यांनी तसा आदेशच जाहीर केला. यामुळे शाळा, दवाखाने, पाणवठे, विहिरी, सार्वजनिक इमारती सर्वांसाठी खुल्या झाल्या. महाराजांनी बहुजन समाजासाठी आणि त्यांच्या उद्धारासाठी अनेक लोकोपयोगी उपक्रम हाती घेतले आणि म्हणूनच महाराष्ट्राच्या इतिहासातील अग्रगण्य व्यक्ती म्हणून शाहू महाराजांना ओळखले जाते. कोल्हापूर संस्थानाचे राजे असूनही, त्यांनी लोकशाही पद्धतीने राज्यकारभार केला. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'सामाजिक लोकशाहीचे आधारस्तंभ' अशा समर्पक शब्दांत शाहू महाराज यांचे वर्णन केले आहे.

आज राजर्षी शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना राबवत आहोत. ही योजना राजर्षी शाहू महाराज यांचा नेमका उद्देश पूर्ण करते. आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करून देते.

### कलांचा विकास

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शिक्षणाकरिता आणि मूकनायक वर्तमानपत्राच्या उभारणीमध्ये शाहू महाराजांनी स्वत:हून

### शाहू महाराजांच्या शैक्षणिक कार्याची प्रेरणा



राजर्षी शाहू महाराजांनी जे शैक्षणिक क्षेत्रात अलौकिक कार्य केले आहे. त्यामध्ये प्रामुख्याने १) विद्यार्थ्यांना मोफत आणि सक्तीचे शिक्षण. २) शिष्यवृत्तीची सवलत. ३) विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहाची व्यवस्था. ४) विद्यार्थ्यांना विविध सोयीसवलती. यांचा ठळकरीत्या उल्लेख करावा लागतो.

काही वर्षांपूर्वी शेती करणाऱ्या वडिलांचे बघून मुलगा पण त्याच पद्धतीने शेती करायचा. पण आता काळ बदलला आहे. शेतीत दररोज वेगवेगळे प्रयोग होत आहे, अत्याधुनिक तंत्रज्ञान येत आहे. मग हे सगळे समजण्यासाठी, प्रत्यक्षात आणण्यासाठी शिक्षण हवे.. शेतीत जे आहे तेच उद्योगाच्या बाबतीत. कुशल मनुष्यबळ घेऊन चांगला उद्योग उभारायचा असेल तर सध्या बाजारात नेमके काय सुरू आहे, कोणत्या उत्पादकाला मागणी आहे, सर्वेक्षण काय सांगतात हे सगळे अभ्यासले गेले पाहिजे. त्यामुळे अभ्यास हवाच.. मग हे सगळे येणार कुठून तर शिक्षणातून. काळानुरूप शिक्षण घेणे ही प्रत्येक विद्यार्थ्यांची गरज बनली आहे.

आज विविध अभ्यासक्रम मग ते उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे असो किंवा मग कौशल्यविकास विभागाचे असो किंवा मग इतर कोणत्याही विभागाचे असो, एक लक्षात घेणे आवश्यक आहे की, आपल्याला नेमका अभ्यासक्रम करून काय शिकायचे आहे आणि कशामध्ये करिअर करायचे आहे हे एकदा समजले की, मग वेगवेगळे पर्याय विद्यार्थ्यांसमोर आहेत. योजना आखताना नेहमीच शासन या योजनांचा फायदा राज्यातील अधिकाधिक विद्यार्थ्यांना कसा होईल याचा विचार करते.

आपण जेव्हा राजर्षी शाहू महाराज यांच्या कार्याबद्दल बोलतो तेव्हा एक विचार केला पाहिजे की, महाराजांनी नेहमी रयतेचे कल्याण कसे होईल, यावर भर दिला. त्यातूनच मग शिक्षण, आरोग्य, व्यापार, वाहतूक व्यवस्था असे वेगवेगळ्या पायाभूत सुविधांचे जाळे तयार केले. त्यामुळेच ते रयतेचे राजे झाले.

आज जेव्हा उच्च व तंत्र शिक्षण विभागाने राजर्षी शाहू महाराज यांचे कार्य डोळ्यासमोर ठेवून आणि त्यांना प्रेरणा मानून योजना आखली. त्या वेळी ही योजना आणण्यामागे राज्यात दरवर्षी उच्च व तंत्र शिक्षणासह इतर विभागात येणारे अभ्यासक्रम शिकणाऱ्या सरासरी ५ लाख विद्यार्थ्यांना या योजनेचा फायदा होईल हे लक्ष्य ठेवले. कारण या योजनेंतर्गत ५० टक्क्यांपर्यंतची शुल्क सवलत विद्यार्थ्यांना देण्यात येत आहे. त्यामुळे या योजनेचे शिक्षण क्षेत्रात आगामी काळात चांगले परिणाम दिसून येतील असा विश्वास वाटतो.

साहाय्य केले. केवळ समाज सुधारणेपुरता राज्यकारभार न करता महाराजांनी कला क्षेत्राला देखील राजाश्रय दिला. त्यामुळेच संगीत, चित्रपट, चित्रकला आणि लोककला या कलांचा विकास आणि विस्तार त्यांनी संपूर्ण महाराष्ट्रात घडवला.



शिक्षण हा जीवनाचा आधार आहे. शिक्षणापासून स्वत:ला वेगळे करू शकत नाही. प्रत्येक व्यक्ती हा शिक्षण देणारा एक महत्त्वपूर्ण ग्रंथ आहे. केवळ त्याच्याकडून काय घ्यावे हे आपणास कळायला पाहिजे. शिक्षण ही जीवन जगण्याची गुरुकिल्ली आहे. जीवन म्हणजे काय? जीवन का जगावे, जीवन कसे जगावे, जीवनाची सार्थकता कशामध्ये आहे, जीवन पूर्ण कसे करावे. आपण जीवनातून काय घ्यावे व इतरांना काय द्यावे. या सर्व प्रश्नांची उत्तरे म्हणजे शिक्षण होय. म्हणूनच 'शिक्षणानेच सर्व काही होत आहे, त्याकरिता आधी शिक्षण घेतलेच पाहिजे' हा मंत्र त्यांनी दिला.

## शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती

राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेची फलश्रुती काय असेल तर मी म्हणेन की, या योजनेमुळे उच्च शिक्षण आणि व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना लाभ देण्याकरिता; पात्रतेसाठी कुटुंबाची वार्षिक आर्थिक मर्यादा एका लाखावरून



आठ लाख रुपये केल्यामुळे, या योजनेमध्ये राज्यभरातील उच्चशिक्षण घेणाऱ्या अधिकाधिक विद्यार्थ्यांचा यामध्ये समावेश होत आहे. उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या व इतर काही विभागाच्या आधिपत्याखाली असणाऱ्या व्यवसायिक अभ्यासक्रमांच्या खासगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित संस्थांमध्ये प्रवेश घेणारे मागास व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थी केवळ निधीअभावी व्यावसायिक अभ्यासक्रमांपासून यापुढे वंचित राहणार नाहीत. व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी, शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेची अंमलबजावणीची प्रक्रिया ही पारदर्शी, वस्तुनिष्ठ आहे. ही योजना प्रत्यक्ष डिबीटीद्वारेच राबवण्यासाठी पात्र लाभार्थी हे त्या त्या वर्षात संबंधित शैक्षणिक संस्थेत शिकत असल्याची आणि विद्यापीठाच्या परीक्षेस बसल्याची खात्री करूनच करण्यात येत आहे. पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांच्या आधार क्रमांकाच्या आधारे ओळख निश्चित झाल्यानंतरच, विद्यार्थ्यांना शुल्क सवलतीचा लाभ देण्यात येत आहे.

भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणारे स्वातंत्र्यसेनानी, थोर राष्ट्रपुरुष यांचे विचार पुढे नेत, शाहू-फुले-आंबेडकर यांचा वारसा, राजर्षी शाहू महाराज यांचे कार्य अशी पार्श्वभूमी आपल्याला असताना; आपण खंबीरपणे देशाला आणि राज्याला अखंड ठेवण्यासाठी कार्य केले पाहिजे. आज जेव्हा आपला भारत तरुणांचा देश म्हणून ओळखला जातो तेव्हा या तरुणांकडून आपल्या सर्वांच्या वेगळ्या अपेक्षा आहेत. या सर्व तरुण बांधवांनी देशाच्या आणि राज्याच्या विकासासाठी आपले योगदान देणे आवश्यक आहे, असे मला वाटते.

**शब्दांकन : वर्षा फडके-आंधळे,**
**विभागीय संपर्क अधिकारी**

# शैक्षणिक क्रांतीचे जनक

**मानवी जीवनाशी संबंधित असलेल्या आणि ज्यांचा प्रभाव मानवाच्या विकास प्रक्रियेवर अपरिहार्यपणे पडतो अशा आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, शैक्षणिक वास्तवाचा जाणतेपणाने महाराजांनी विचार केला. आपल्या राज्यातील नागरिकांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी कृतिशील पावले टाकली. काळाच्या पुढे पाहण्याची दृष्टी लाभलेल्या या महामानवाने समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी शिक्षणाला पर्याय नाही हे अचूकपणे जाणले. त्यामधूनच शिक्षण सर्वसामान्य माणसांपर्यंत पोहोचण्यासाठी धोरणे आखून अमलात आणली.**

**डॉ. भालबा विभूते**

दोन एप्रिल, १८९४ ला शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानाची सूत्रे हाती घेतली, त्या वेळी जो जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला त्यात त्यांच्या राज्यकारभाराची दिशा स्पष्ट होती. या जाहीरनाम्यात त्यांनी जाहीर केले की, 'आमची सर्व प्रजा सतत तृप्त राहून सुखी असावी, तिच्या कल्याणाची सतत वृद्धी व्हावी व आमचे संस्थानाची हरएक प्रकारे सदोदित भरभराट होत जावी, अशी आमची उत्कट इच्छा आहे.'

शाहू महाराजांच्या विविध धोरणांचा मूलाधार या जाहीरनाम्यातील वरील विधानामध्ये सापडतो. या जाहीरनाम्यांतील 'आमची सर्व प्रजा' हे शब्द अत्यंत महत्त्वाचे असून, त्यामध्ये समाजातील सर्व घटकांचा समावेश असल्याने, समाजात वरिष्ठ–कनिष्ठ असा भेदभाव न करता; सर्वांना समानतेची वागणूक मिळेल, विकासाची संधी प्राप्त होईल असा त्यातून अर्थ निघतो. यास अनुसरून महाराजांनी आपली धोरणे आखल्याचे आढळून येते.

'आमची सर्व प्रजा' यामध्ये भेदाभेदाला अजिबात जागा नव्हती हे महाराजांच्या कार्यामुळे स्पष्ट झाले आणि ज्यांनी भेदाभेदाला चालना देण्याचा प्रयत्न केला, त्यांचा बंदोबस्त महाराजांना करावा लागला. तथापि, हे काम करत असताना आपल्या राज्यातील बहुसंख्यांक प्रजाजनांची दीनवाणी परिस्थिती, मानसिक गुलामगिरीची अवस्था, आंधळ्या धार्मिक समजुती आणि त्यामुळे त्यांचे होणारे शोषण महाराजांच्या चाणाक्ष नजरेतून सुटले नाही. या अवस्थेस बहुजन समाजाचे शैक्षणिक मागासलेपणच कारणीभूत असल्याचे त्यांच्या लक्षात आले होते. हे चित्र बदलले पाहिजे आणि सर्व समाजाच्या विकासाला चालना मिळाली पाहिजे याकरिता, महाराजांनी 'शिक्षण सुधार समिती' स्थापन केली. तसेच बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी कोणत्या उपाययोजना कराव्यात याबाबत न्या. महादेव गोविंद रानडे, गोपाळ कृष्ण गोखले, डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांच्याशी सल्लामसलत केली होती.



### शैक्षणिक तत्त्वज्ञान

समतेवर आधारित समाजव्यवस्था निर्मितीसाठी शिक्षण प्रसार हे शाहू महाराजांचे शैक्षणिक तत्त्वज्ञान होते. त्याच्या प्राप्तीसाठी आपल्या राज्यात त्यांनी शैक्षणिक धोरणे आखली आणि अमलात आणली. शिक्षणानेच आमचा तरणोपाय होईल, असे त्यांचे मत होते.

राजर्षी शाहू महाराजांच्या शैक्षणिक विचारांचा आधार पुढील चतु:सूत्रीत आहे.

- समाजात प्राथमिक शिक्षण सर्वांना उपलब्ध करून देणे. नंतर दुय्यम व शेवटी उच्च शिक्षणाची सोय करणे.
- समाजातील प्रतिकूल परिस्थितीतील घटकांना शिक्षणाच्या सोयी विशेष बाब म्हणून उपलब्ध करून देणे.
- ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शहरात येऊन अल्पखर्चात शिक्षण घेता यावे म्हणून शहरात सर्व जमातींसाठी वसतिगृहे सुरू करणे.
- प्रथमच शिकून तयार झालेल्यांचा शिक्षणावरील विश्वास दृढ व्हावा म्हणून त्यांच्यासाठी रोजगाराची सोय करणे, नोकऱ्यात राखीव जागा ठेवणे.

### प्राथमिक शिक्षण

शाहू महाराजांची रयतेचा राज्यकारभारात सहभाग वाढावा अशी इच्छा होती. त्यासाठी जनतेस प्रथमत: तयार केले पाहिजे व याकरिता शैक्षणिक चळवळ वृद्धिंगत होणे आवश्यक होते. कारण 'लोकांच्या बुद्धीवर व ज्ञानावर जड व जुलमी जूं लादले गेले आहे ते झुगारून देण्याची शक्ती बहुजन समाजाच्या अंगी येण्यास सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाची फार जरुरी आहे' याची जाणीव त्यांना सातत्याने होत होती.

या दिशेने महाराजांनी कृती केली ती प्राथमिक शिक्षण सक्तीचे करून, त्यांनी सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा आदेश जारी केला. या आदेशानुसार शिक्षणास योग्य मुलांची यादी करणे, त्यांची शाळेत भरती करणे सक्तीचे करण्यात आले. शाळेत गैरहजर राहणाऱ्यांना दंड



करण्यात येऊ लागला. या कृतीची माहिती महाराजांना देण्याची व्यवस्थाही करण्यात आली होती. तथापि समाजाची परिस्थिती पाहता 'आईबापांच्या निकडीच्या कामकाजांसाठी मुलांच्या मदतीची जरुरी असल्यास १५ दिवस मुलास घरी ठेवून घेता येईल.' अशीही तरतूद करण्यात आली.

शाहू महाराजांच्या या धोरणाचा अत्यंत चांगला परिणाम झाल्याचे दिसून येते. कारण (१) प्राथमिक शाळांची १८९३–९४ ला असलेली १८३ ही संख्या १९२१ ला ४९६ एवढी झाली. (२) १८९३–९४ ला शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ११,०४२ होती ती १९२१–२२ ला २६,६२८ पर्यंत वाढली. तसेच सक्तीच्या व मोफत शिक्षण देणाऱ्या प्राथमिक शाळांची संख्या १९१७–१८ ला २७ होती ती १९२१–२२ ला ४२० एवढी झाली. विद्यार्थिसंख्या ११,२९६ वरून २२,००७ एवढी झाली.

### समाज सुशिक्षित करणे आद्य कर्तव्य

''हल्लीच्या स्थितीत आमचे ध्येय साध्य करण्यासाठी जे कर्तव्य आम्हाला करावयाचे ते आमचा समाज सुशिक्षित करणे हे होय. या अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नाचा उलगडा करण्याचा हा फक्त एकच मार्ग आहे. म्हणूनच प्रत्येक समाजाने आपल्या समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या कल्याणाकरिता झटणे अगत्याचे आहे. निरनिराळ्या समाजातील लोकांना शिक्षण देण्याची पद्धत मी काळजीने अनुसरीत आहे आणि माझ्या आयुष्याच्या पुढील काळात तीच पद्धत सुरू ठेवण्याची माझी इच्छा आहे. मराठा जातीतील कुटुंबांना मी याच दिशेने मदत करण्याचा प्रयत्न केला आहे. पुन्हा जरुरीची गोष्ट ही की, जातिपद्धतीच्या शृंखला तोडून टाकण्याचे ध्येय साध्य करण्याकरिता आणि परस्परांची मने एक करणे असेल तर परशुरामास रामाने जिंकले तो राम क्षत्रिय होता आणि परशुराम हा ब्राह्मण होता, असल्या प्रकारच्या गतकालीन ऐतिहासिक गोष्टी आम्ही साफ विसरल्या पाहिजेत. जर असल्या गोष्टींची आठवण आम्ही सदोदित ठेवू लागलो, तर राम आणि परशुराम यांच्यासारखीच भांडणे आमच्यामध्ये चालू रहातील अशी मला खात्री आहे.''

**– राजर्षी छत्रपती शाहू महाराज**

### शिक्षक

शैक्षणिक प्रक्रियेमधील शिक्षक हा महत्त्वाचा घटक. शिक्षक जर गुणवत्तापूर्ण असेल तरच तो चांगले विद्यार्थी घडवू शकेल. यासाठी शिक्षक प्रशिक्षण आणि शिक्षकांसाठी मेरिट प्रमोशन या योजना महाराजांनी सुरू केल्या. तसेच शिक्षक प्रशिक्षणासाठी ६ महिने मुदतीचे वर्ग सुरू करण्यात आले. प्रशिक्षणासाठी जाणाऱ्या शिक्षकांना ६ महिने निमपगारी रजा देण्याची तरतूद करण्यात आली होती.

### सक्तीच्या प्राथमिक व मोफत शिक्षणाची आवश्यकता

''खालच्या वर्गाच्या लोकांच्या बुद्धीवर व ज्ञानावर हे जे जड व जुलमी धार्मिक जूं लादले गेले आहे ते झुगारून देण्याची शक्ती बहुजन समाजाच्या अंगी येण्यास सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाची फार जरुरी आहे. असले शिक्षण मी माझ्या रयतेस देण्यास प्रारंभ केला आहे. त्याकरिता सक्तीच्या शिक्षणाचा कायदा करून तो अमलात ठेवला आहे. यामुळे पुढील पिढी तरी लवकर लिहिणारी वाचणारी होईल अशी मला खात्री आहे.

प्राथमिक शिक्षणावर माझा भर आहे. तरी दुय्यम व उच्च शिक्षणाकडे माझे लक्ष कमी नाही. माझे संस्थान सातारा व बेळगांव या जिल्ह्यांपेक्षा लहान असतानाही आमचेकडे सात हायस्कूल चालू आहेत व दोन लवकर सुरू होतील. शिवाय विद्यापीठाचे पुरे शिक्षण देणारे एक कॉलेजही आहे.''

**– राजर्षी छत्रपती शाहू महाराज**

शिक्षकांच्यात गुणवत्ता वाढवण्यासाठी तळमळ असेल तरच तो चांगला शिक्षक बनेल. जे शिक्षक असा प्रयत्न करतील त्यांना मेरिट प्रमोशन स्किम लागू करण्याचे धोरण महाराजांनी जाहीर केले होते.

'कोल्हापूर इलाख्यातील शाळाखात्यातील जे शिक्षक ट्रेनिंगचे सर्टिफिकेट मिळवलेले नाहीत व मराठी स्कूल फायनल परीक्षा किंवा विद्यापीठाची एखादी परीक्षा पास झालेले नाहीत त्यांनी त्यांचे वय ४० पेक्षा कमी असेल तर ही नोटिफिकेशन प्रसिद्ध झाल्यापासून दोन वर्षाच्या आत मराठी मुलकी परीक्षेत पास झाले पाहिजे, तसे करण्यास जे चुकतील ते कोणतीही बढती मिळवण्यास पात्र होणार नाहीत. शिक्षकांना असे करता यावे म्हणून जे शिक्षक परीक्षेस बसण्याचे पत्करतील त्यास तीन महिन्यांनी स्पेशल रजा देण्यास येईल.'

### विकासाची काळजी

समाजाने ज्यास अस्पृश्य समजलेले होते त्या समाजाच्या विकासाची काळजी घेणे शाहू महाराजांना महत्त्वाचे वाटत होते. त्यास शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही ही त्यांची धारणा होती.

## वसतिगृहांच्या योजना

शाहू महाराजांनी प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारावर भर दिला होता. त्यास अनुसरून प्राथमिक शिक्षण पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना माध्यमिक आणि उच्च शिक्षण मिळाले पाहिजे ही त्यांची भूमिका होती. खेड्यापाड्यांतील मुलांचा शहरामध्ये आल्यानंतर राहण्याचा प्रश्न मिटावा आणि त्यांना शिक्षण घेता यावे यासाठी शाहू महाराजांनी, वेगवेगळ्या जातीतील मुलांसाठी वसतिगृहे बांधली. त्यामध्ये व्हिक्टोरीया मराठा बोर्डिंग हाऊस, जैन बोर्डिंग, मिस क्लर्क होस्टेल, दयानंद होस्टेल, सारस्वत बोर्डिंग, कायस्थ प्रभू बोर्डिंग, जिनगर होस्टेल, पांचाल ब्राह्मण होस्टेल, वैश्य बोर्डिंग, देवांग बोर्डिंग, सुतार बोर्डिंग, मोहरी समाज बोर्डिंग, वैदिक स्कूल होस्टेल, आर्य समाज गुरुकुल, प्रिन्स शिवाजी बोर्डिंग, इत्यादींचा समावेश होतो.




महाराजांनी मुलींचे शिक्षण व्हावे यासाठीही खास प्रयत्न केले. तसेच व्यवसाय शिक्षणाशिवाय औद्योगिक प्रगतीस चालना मिळणार नाही यासाठी व्यवसाय शिक्षणास प्रोत्साहन दिले.

जयसिंगराव घाटगे टेक्निकल इन्स्टिट्यूट, इंडस्ट्रियल स्कूल फॉन जिनगर्स या औद्योगिक संस्था आणि शिवाजी क्षेत्रीय वैदिक स्कूल, सत्यशोधक समाज शाळा, सरदार स्कूल, संस्कृत पाठशाळा, डोंगर शाळा, उर्दू शाळा, अरेबिक शाळा, देवल क्लब, स्काउट इत्यादी स्वरूपाच्या शैक्षणिक संस्थानाही राजाश्रय दिला. याव्यतिरिक्त शाहू महाराजांनी ताराबाई मराठा बॉईज होस्टेल, पुणे, उधोजीराव मराठा होस्टेल, नाशिक, डिप्रेस्ड क्लास बोर्डिंग नाशिक, मराठा विद्या प्रसारक मंडळ, पंढरपूर, शिवाजी फोर्थ स्टुडंट्स होस्टेल अहमदनगर, डिप्रेस्डक्लास बोर्डिंग नागपूर, शिवाजी सोसायटी पुणे, शिवाजी एज्युकेशन सोसायटी अमरावती, इत्यादी शैक्षणिक संस्थांनाही भरघोस आर्थिक साहाय्य केले होते.

महाराजांनी जे शैक्षणिक विचार मांडून त्या अनुषंगाने कृती केली. त्यामधून, त्यांना समाजामध्ये असे वातावरण निर्माण करावयाचे होते की, समताधिष्ठित समाजनिर्मितीस चालना मिळावी. हे त्यांचा एकूण शैक्षणिक दृष्टिकोन आणि कृती यामधून सहज लक्षात येऊ शकते.

याचाच एक भाग म्हणून त्यांनी अस्पृश्य मुलांसाठी शाळा सुरू केल्या. शिक्षणप्रसारांमधून सामाजिक विषमता नष्ट व्हावी ही महाराजांची दृष्टी होती. तथापि, अस्पृश्यांसाठी असलेल्या स्वतंत्र शाळांमुळे हे होणे शक्य नाही हे त्यांच्या लक्षात आल्यावर त्या शाळा बंद करून अस्पृश्य मुलांना इतर मुलांप्रमाणे सरकारी शाळात दाखल करून घेण्याचा आदेश काढून, त्यांना अशा ठिकाणी समतेची वागणूक देणे त्यांच्याशी आदराने वागण्याच्या सूचना देण्यात आल्या. त्यामध्ये हलगर्जीपणा करणाऱ्यांना शिक्षेची तरतूदही केली. समाजातील सर्व जातिधर्मातील मुले एकत्र आल्याने ती एकत्रित राहू शकतील आणि सामाजिक विषमता नाहीशी करण्याच्या कामात मदत होऊ शकेल, ही या पाठीमागची शाहू महाराजांची भूमिका होती.

याचबरोबर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे आणि त्यांची गुणवत्ता वाढावी यासाठी शिष्यवृत्ती देण्याचे धोरण त्यांनी सुरू केले होते.

## पाटील शाळा

खेडेगाव हा राज्यव्यवस्थेतील महत्त्वाचा घटक. पूर्वीपासून खेडेगावचा कारभार पाटील, कुलकर्णी यांच्यामार्फत चालू असे. यामध्ये कुलकर्णी शिकलेला असे. तथापि पाटील मात्र शिकलेलाच असेल असे नाही. शाहूकालीन राज्यव्यवस्थेत गावकारभाराचे दोन घटक म्हणजेच पाटील आणि तलाठी यांचा दैनंदिन संबंध येत असे. त्यांच्या कार्यक्षमतेवर गावाचा विकास अवलंबून असल्याने गावगाड्याशी संबंधित विविध घटकांचे ज्ञान आणि त्यासंबंधी करावयाची कामे आणि त्याच्या पद्धती लक्षात याव्यात यासाठी, पाटील शाळा आणि त्याला जोडून तलाठी वर्ग सुरू केले. या वर्गात गावकारभाराशी संबंधित विषयांचा समावेश केला. या परीक्षा पास होणाऱ्यास कामावर रुजू करून घेतले जाईल, असा आदेश देण्यात आला. यावरून महाराजांचा शैक्षणिक दृष्टिकोन स्पष्ट होतो.

(ऑगस्ट १९९४च्या लोकराज्यतून पुनर्प्रकाशित)

# गाव तिथे शाळा

राजर्षी छत्रपती शाहू महाराज म्हणतात, 'शिक्षणानेच आमचा तरणोपाय आहे, असे माझे ठाम मत आहे. शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही हा इतिहास आहे. अज्ञानात बुडून गेलेल्या देशात उत्तम लढवय्ये कधीही निपजणार नाहीत. म्हणूनच सक्तीच्या व मोफत शिक्षणाची हिंदुस्थानला अत्यंत आवश्यकता आहे.' हे विचार शाहू महाराजांनी प्रत्यक्षात अमलात आणले. अशा करवीर संस्थानात शैक्षणिक क्रांतीची पहाट झाली.

शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्याचा आदेश काढला होता. नुसता आदेश काढून ते थांबले नाहीत, तर गावातील पाटलाला सांगून मुलांची यादी करायला सांगितली होती. घराघरांत जाऊन शिक्षणाचे महत्त्व पटवून, शाळेत नाव दाखल करण्यास भाग पाडले. जे विद्यार्थी गैरहजर राहतील अशा विद्यार्थ्यांना दंड करून, पालकांना समज देण्यात आली. छत्रपती शाहूंनी राज्य कारभाराची सूत्रे हाती घेतली तेव्हा साडेचार लाख प्रजेत साक्षरांची संख्या केवळ ४०० होती. प्राथमिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या खूपच कमी होती. ही संख्या वाढावी म्हणून त्यांनी अनेक उपाययोजना केल्या. त्यासाठी शिक्षण सुधार समिती स्थापन केली.

आपली प्रजा १० टक्के जरी शिक्षित झाली तरी तिच्या हाती राज्यकारभाराची सूत्रे आपण देऊ, असा म्हणणारा राजा या देशात फक्त करवीर संस्थानातच होऊन गेला. महाराजांच्या दूरदृष्टीची अनेक उदाहरणे पाहायला मिळतात.

### शिक्षणासाठी जादा तरतूद

धार्मिक स्थळांच्या ठिकाणी, देवस्थान समितीकडे प्रचंड प्रमाणात पैसा असतो व ते पैसे शिक्षण कार्याकडे थोडे जरी खर्च केले तरी जनतेचे कल्याण होईल, असे महाराजांना वाटायचे. त्यानुसार त्यांनी पंढरपूर येथे सुरू असलेल्या संस्थानच्या अन्नछत्र चालवण्याच्या तरतुदीमधून मोठी रक्कम शिक्षण कार्याकडे वर्ग केली.

तसेच काही पिरांचे उत्पन्नही त्यांनी मुस्लीम बोर्डिंगला देण्याचे आदेश दिले. संस्थानच्या देवस्थान फंडात मोठी रक्कम होती. त्यातील २००० रुपये त्यांनी या शैक्षणिक कार्यासाठी मंजूर केले. सर्वांगीण शिक्षण ही संकल्पना शाहू महाराजांनी मांडली. समाजाच्या विविध गरजा पूर्ण करण्यासाठी केवळ शिक्षण हे महत्त्वाचे नसून; विविधांगी शिक्षणाची गरज असल्याचे लक्षात आल्यावर त्यांनी गायन, वैद्यकीय शिक्षण, चित्रकला, शिल्पकला, वकिली शिक्षण, मल्लविद्या, नाट्य शिक्षण, नृत्य शिक्षण, औद्योगिक शिक्षण यासाठी शिक्षणाच्या सोयी निर्माण केल्या. त्यासाठी देशातील कान्याकोपऱ्यांतून तज्ज्ञांना करवीर नगरीत सन्मानाने बोलावले. त्याचा परिणाम असा झाला की, करवीर संस्थानात चांगले मल्ल, संगीतकार, गायक, चित्रकार, चांगले डॉक्टर, वकील, उद्योजक, कारागीर निर्माण झाले. कलापूर म्हणून कोल्हापूरची नव्याने देशाला ओळख झाली.



### ग्रंथालय परिपूर्ण शाळा

महाराजांनी 'गाव तेथे शाळा' ही मोहीम उघडली. केवळ शाळा सुरू केली नाही तर तेथे प्रशिक्षित शिक्षकांची नियुक्ती केली. शाळेत ग्रंथालय सुरू केले. विद्यार्थ्यांना वाचनासाठी पाठ्यपुस्तके दिली. होतकरू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसह अनेक सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्याने, विद्यार्थी आणि पालकांनाही शिक्षणाची गोडी वाटू लागली. त्या काळात अस्पृश्य म्हणून वागवलेल्या विद्यार्थ्यांना मोफत पुस्तके देण्याची सोय केली. ज्या मुली, मुले; पुणे, मुंबई येथे उच्च शिक्षण घेण्यास जाणार असतील, त्यासाठी खर्च देण्याची व्यवस्था करण्यात आली. काही मुलींना मुंबईच्या एका गर्ल्स हायस्कूलमध्ये पाठवले. त्या काळात मातोश्री लक्ष्मीबाई, छत्रपती महाराणी साहेब यांनी एक हुकूम जारी केला. तो महत्त्वपूर्ण आहे. तो असा की, मागासलेल्या लोकांत पडदा नाही. तेव्हा मागासलेल्या जातीतील बायका, मुली ज्यांना विद्या शिकण्याची इच्छा असेल त्यांनी अप्पासाहेब व मामासाहेब सुर्वे यांच्याकडे अर्ज करावेत. म्हणजे ते त्यांची बोर्डिंगजची सर्व व्यवस्था करतील. शिक्षण हे तळागाळातील घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी महाराजांनी केलेल्या प्रयत्नांची ही मोठी पावतीच होय.

**– डॉ. संभाजी खराट**
विभागीय संपर्क अधिकारी

**डॉ. गो. मा. पवार**

शाहू महाराजांचे कार्य केवळ कोल्हापूर या त्यांच्या संस्थानापुरते मर्यादित नव्हते. कायद्याचा आधार घेऊन ज्या सुधारणांचा अंमल त्यांना करावयाचा होता तो त्यांनी कोल्हापूर संस्थानात केलाच परंतु संस्थानाची सरहद्द ओलांडून ब्रिटिश अमलाखालच्या महाराष्ट्रातील बहुजन समाजात जागृती करण्याचे, त्यांना मार्गदर्शन करून, त्यांच्या उद्धाराची दिशा दाखवण्याचे कार्यही त्यांनी केले. एका संस्थानाचा अधिपती असून, सामाजिक जागृतीचे प्रचंड कार्य करणारी शाहू महाराज ही अपवादात्मक व्यक्ती होती. नेत्याच्या ठिकाणी असावी लागणारी लोकहिताची आच त्यांच्या ठिकाणी होती. मनाचा मोठेपणा, अंतःकरणाचे धैर्य, बुद्धीची कुशाग्रता व धडाडीची छाती त्यांच्या ठिकाणी होती.

### सामाजिक कार्याचा आविष्कार

शाहू महाराजांचे विशेषत्वाने डोळ्यात भरणारे जे कार्य आहे ते सामाजिक स्वरूपाचे. त्यांचे शिक्षणाविषयक कार्य हाही त्यांच्या सामाजिक कार्याचा एक विशेष आविष्कार आहे. आर्थिक उन्नती करण्याचे त्यांच्या कार्याचे मूळही त्यांच्या सामाजिक विचारातच आहे. राजकीय स्वराज्यासाठी झगडण्याआधी समताधिष्ठित समाज निर्माण केला पाहिजे अशी त्यांची दृढ वैचारिक श्रद्धा होती. समाजस्थितीच्या डोळस अवलोकनाने व तत्कालीन राजकीय नेत्यांच्या मनोवृत्तीचे आकलन झाल्याने त्यांची अशी वैचारिक भूमिका सिद्ध झाली होती.

### मागासलेल्या वर्गाची उन्नती

शाहू महाराजांनी मागासलेल्या वर्गाची आधी उन्नती झाली पाहिजे असा आग्रह धरला व त्या दिशेने कार्य करावयाला सुरुवात केली. ही भूमिका त्यांनी का स्वीकारली याचे कारण पूर्वेतिहासात तसेच तत्कालीन समाजस्थिती व पांढरपेशा नेत्यांच्या मनोवृत्तीत शोधावी लागते. १८९४ मध्ये शाहू महाराजांनी राजाचे अधिकार ग्रहण केले. शिक्षण, आर्थिक स्थिती, सांस्कृतिक पातळी, सामाजिक दर्जा या सर्वच बाबतीत बहुजन समाज मागासलेला होता. त्यांची उन्नती व्हावी असा उच्चवर्णीय नेतृत्वाचा प्रयत्न नव्हता. उलट पांढरपेशा वर्गाची सर्वच क्षेत्रात मिरासदारी राहावी असाच त्यांचा हेतू असल्याचे, महाराजांना जाणवत होते. सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाला त्यांचा तार्किक युक्तिवादाच्या मुलाम्याखाली विरोध होता. मात्र उच्च शिक्षणाची ते काळजी घेत होते. सरकारने त्यावरच जास्तीत जास्त पैसा खर्च करावा असा त्यांचा आग्रह होता.
मागासलेल्या जातीतील व्यक्तींसाठी पन्नास टक्के नोकऱ्या महाराजांनी राखून ठेवताच, पांढरपेशा वर्गाचा जळफळाट होत होता. महाराजांनी सहकारी कारखानदारीला उत्तेजन दिल्यावर उच्चवर्णीयांच्या ताब्यात असलेली वृत्तपत्रे त्यांचा उपहास करत होती. महाराजांनी वेदोक्त मंत्रांचा आग्रह धरला तर त्यांचा अहंकार दुखवला होता. तात्पर्य, पांढरपेशा वर्ग अहंगंडाने पछाडलेला होता. त्यांना जीवनाच्या सर्वच क्षेत्रात आपले श्रेष्ठत्व अबाधित ठेवावयाचे होते व ते बहुजन समाजाच्या उन्नतीच्या आड येत होते, असेच महाराजांना जाणवले.

### बहुजन समाजाचा उद्धार

तत्कालीन संदर्भ ध्यानात ठेवूनच, महाराजांच्या कार्याचे व विचाराचे आकलन व मूल्यमापन करावयास पाहिजे. त्यांची सामाजिक व राजकीय भूमिकाही या संदर्भात तपासून घेतली पाहिजे. १९१७ सालच्या एका भाषणात ते म्हणतात, 'जोपर्यंत हिंदुस्थान जातिबंधनाने निगडित राहील, तोपर्यंत स्वराज्य स्थापनेपासून मिळणारे संपूर्ण फायदे त्यास घेता येणार नाहीत. येथील सत्ता उच्चवर्गाच्या हाती जाईल. ज्या रितीने हल्ली स्वराज्याचा

# सामाजिक समतेचा अधिष्ठाता

**विसाव्या शतकाच्या पहिल्या पंचवीस वर्षात महाराष्ट्राचे सामाजिक जीवन ढवळून काढणारी, सामाजिक समतेची प्रतिष्ठापना करण्यासाठी अविश्रांत परिश्रम करणारी, बहुजन समाजाच्या उद्धारासाठी तळमळणारी व मार्गदर्शन करणारी लोकोत्तर व्यक्ती म्हणजे राजर्षी शाहू महाराज होत. ते एका संस्थानाचे अधिपती असले तरी त्यांचे मन लोकशाहीवाद्यांचे होते. वागणूक समतेच्या पुरस्कर्त्याची होती. बहुजन समाजाची व विशेषतः अस्पृश्य वर्गाची अस्मिता जागृत करण्याचे, त्यांच्या सर्वांगीण उद्धाराचे कार्य त्यांनी सुरू केले व त्याद्वारे महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात समता प्रस्थापित करण्याचा मौलिक प्रयत्न केला.**



अर्थ समजला जातो ते स्वराज्य म्हणजे मूठभर लोकांच्या हाती सत्ता जाणे हे होय. याचा अर्थ मी स्वराज्याच्या चळवळीच्या विरुद्ध आहे असे समजावयाचे नाही हे मी पुन्हा एकवार सांगतो. आम्हाला स्वराज्य पाहिजेच.'' बहुजन समाज मागास अवस्थेत असतानाच स्वराज्य मिळाले तर त्याचा फायदा केवळ पांढरपेशे लोक घेतील. बहुजन समाजाला फायदा मिळणार नाही अशी साधार भीती त्यांना वाटत होती. बहुजन समाजाबद्दलची खरीखुरी तळमळ हीच त्यांच्या भूमिकेच्या मुळाशी आहे. अस्पृश्यासकट बहुजन समाजाच्या सर्वांगीण उद्धाराची तळमळ हाच महाराजांच्या सामाजिक दृष्टिकोनाचा गाभा आहे.

राजर्षी शाहू छत्रपतींचा सामाजिक विचार द्वेषाधिष्ठित तर नव्हताच उलट प्रेमातून निर्माण झालेला होता. समतेचा पुरस्कार करणारा होता. वर्णश्रेष्ठत्वाने निर्माण केलेली विषमता त्यांना नष्ट करावयाची होती. उच्चवर्णीयांच्या अहंकाराने समाजाची कशी हानी झाली हे ते पाहत होते. समाजातील ५ टक्क्यांइतके लोक सर्व प्रकारचे फायदे उठवतात हे ते पाहत होते. ही विषमता दूर करणे म्हणजे वरच्यांना खाली ओढणे नव्हे तर खालच्यांना वर उचलणे. म्हणून मागासलेल्या बहुजन समाजाला वर उचलून, त्याची सर्वांगीण उन्नती करण्याचा प्रयत्न धार्मिक, शैक्षणिक व आर्थिक बाबतीत होता.

उच्चवर्णीयांच्या वर्चस्वाविरूद्ध जागृती करण्याचे व झगडण्याचे कार्य महात्मा जोतिबा फुले यांच्यानंतर राजर्षी शाहू महाराजांनीच महाराष्ट्रात केले. त्यांनी जातिकल्पनेवर व पर्यायाने जन्मजात उच्चनीचपणावर हल्ला केला. ते एका भाषणात म्हणतात, ''लोकशाहीच्या (डेमोक्रॅटिक) मतांचा फैलाव सर्व ठिकाणी जोराने होत असता आपल्या क्षत्रीय व शूद्रांनी पूर्वीसारखीच धार्मिक जुलमाखाली मान वाकवावी हे शक्य नाही....' सर्व जातीवर आपले धार्मिक व सामाजिक प्रभुत्व चालावे याकरिता राजकीय हक्कही आपल्याच पदरी पडावेत या हेतूने प्रेरित झालेली एक ब्युरॉक्रसी आहे व तिच्या सत्तेपासून मुक्त व्हावे. व सर्वास माणुसकीचे हक्क मिळावेत असे मानणारा, अज्ञानात पडलेला बहुजन समाज आहे.''

## धार्मिक मिरासदारीला छेद

विशिष्ट जातीतील धार्मिक बाबतीतील मिरासदारी त्यांना नष्ट करावीशी वाटली. १९११ मध्ये कोल्हापुरात सत्यशोधक समाजाची शाखा स्थापन झाली. समाजाच्या 'पुरोहित शाळेस' १९१३ मध्ये महाराजांनी अनुदान दिले. महाराजांनी १९१८ मध्ये आपल्या संस्थानात आंतरजातीय विवाहाचा कायदा मंजूर केला.

महाराजांनी वेगवेगळ्या जातीत कार्यकर्ते निर्माण केले व त्यांच्या सहकार्याने वसतिगृहे काढली. त्यांना मोफत जमिनी दिल्या. इमारती बांधण्यासाठी पैसे दिले व मराठा, जैन, लिंगायत, अस्पृश्य सारस्वत, दैवज्ञ, शिंपी, मुसलमान, वंजारी यांची वसतिगृहे सुरू केली. कोल्हापूर हे 'वसतिगृहांची माता बनले.' याचा सार्थ अभिमान त्यांना वाटत होता. संस्थानाबाहेरही नाशिक, अहमदनगर, पुणे इ. ठिकाणी विद्यार्थी वसतिगृहे स्थापन करण्यास त्यांना प्रोत्साहन व साहाय्य दिले. त्यांच्या कारकिर्दीच्या अखेरीस संस्थानात तर शिक्षणविषयक दृश्य सुखदपणे बदललेले होते. बहुजन समाजातील शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या कितीतरी पटीने वाढली.

## सक्तीच्या शिक्षणाचा कायदा



खेड्यापाड्यात पसरलेला बहुजन समाज साक्षर होणे. त्यांना ज्ञानाची गोडी लागणे आवश्यक आहे. हे ओळखून महाराजांनी आपल्या राज्यात सक्तीच्या शिक्षणाचा कायदा लागू केला. बहुजन समाजाने साक्षर होऊन, अथवा पुस्तकी ज्ञान मिळवून चालणार नाही. बहुजन समाजाच्या उन्नतीवरच देशाची प्रगती अवलंबून असते. बहुजन समाज ज्ञानी व्हायला पाहिजे तसेच संपन्न व्हायला पाहिजे. उद्यमशील व्हायला पाहिजे, पराक्रमी व्हायला पाहिजे असे त्यांना वाटत होते. म्हणून त्यांनी शिक्षणाची व्यापक कल्पना एका व्याख्यानात मांडली. ते म्हणतात, 'शिक्षणाचा प्रश्न आणि त्याची निरनिराळी स्वप्ने याकडे प्रथमतः लक्ष गेले पाहिजे. आम्ही शेतकरी किंवा सैनिकच होऊन राहावे ही स्थिती आम्हाला समाधानकारक नाही. म्हणून व्यापारधंदे व इतर उच्च प्रतीचे व्यवसाय यात आम्हास शिरण्याची जरुरी आहे. हल्ली व्यापार व उदीम यात आम्ही पडतच नाही. विसाव्या शतकात राष्ट्राची उन्नती व्यापार व तद्संबंधी चळवळ यावर अवलंबून आहे.' शेतकी व्यवसायात, अर्वाचीन युद्धपद्धतीत शिक्षणाची नितांत आवश्यकता असल्याचे त्यांनी या व्याख्यानात प्रतिपादिले आहे.

छत्रपती शाहू महाराजांचे वैशिष्ट्य असे की, अनुभवाने त्यांचे विचार बनत असत व विचार मनात आला की, ते कृतीत त्याचा पडताळा पाहत होते. म्हणून १९०६ मध्ये सुरू झालेल्या 'श्री शाहू छत्रपती स्पिनिंग अँड वीव्हिंग मिल' ला जागा दिली, भांडवलाची मदत केली. शिरोळ रोड येथील जिनिंग फॅक्टरीला मदत केली. उद्योगधंद्याची वाढ होण्याच्या दृष्टीने शाहूपुरी ही नगरी वसवून व्यापाऱ्यांना सोई उपलब्ध करून दिल्या. कोल्हापुरास व्यापारी जगात पत प्राप्त करून दिली.

## अस्पृश्यता निवारण

राजर्षी शाहू छत्रपतींनी अस्पृश्यता निवारणाचे आणि अस्पृश्योन्नतीचे जे महनीय कार्य केले त्यात महाराजांचे लोकशाहीवादी थोर अंतःकरण व अतुलनीय धाडस दिसून येते. बहुजन समाजाच्या तळाशी असलेला वर्ग व तथाकथित अस्पृश्यांना

## हरितक्रांतीची मुहूर्तमेढ

शेती ही पारंपरिक पद्धतीने न करता आधुनिक पद्धतीने करावयास पाहिजे असे त्यांचे मत होते. शेतकऱ्यांचे पावसाच्या पाण्यावरचे परावलंबित्व दूर करून शेती खात्रीची व्हावी, यासाठी लक्ष्मीबाई तलावाचे काम त्यांनी हाती घेतले. इतरही वीस तलाव त्यांनी बांधले. त्या परिसरातील शेतकरी वर्ग उद्योगी व सधन झालेला आपण पाहतो. महाराष्ट्रात हरितक्रांतीची पहिली मुहूर्तमेढ श्रीशाहू महाराजांनी रोवली.

शेतकऱ्याची भरभराट व्हावयाची असेल तर प्रगत शेतीच्या जोडीला सहकारी चळवळीची जोड मिळणे आवश्यक आहे हे शाहूमहाराजांनी ओळखले म्हणून त्यांनी १९१२ मध्ये संस्थानात सहकारी कायदा मंजूर केला आणि सहकारी चळवळीस प्रेरणा दिली.

शेतकऱ्यांच्या उन्नतीप्रमाणेच काम कऱ्यांच्या उन्नतीची तळमळ महाराजांना होती. १९१८ मध्ये मुंबईस परळ येथे भरलेल्या कामगारांच्या प्रचंड सभेत अध्यक्ष म्हणून भाषण करताना ते म्हणतात, 'आपल्या हिंदुस्थानातील स्थिती पाहू गेल्यास इकडे मुख्य मागासलेला वर्ग म्हणजे शेतकऱ्यांचा आहे व मीही त्यापैकीच एक आहे. कारखान्यात मजुरी करणारे आपण सर्व शेतकरीच आहोत तेव्हा सर्वांविषयी एकत्र विचार करणे सोयीचे आहे. मजूरदार व इतर मागासलेले यांच्या हिताचे संरक्षण करणे या हिंदुस्थान देशातही जरुरीचे आहे. पाश्चात्त्य देशात मजूरदार लोकांनी संघटना बळकट करून आपली स्थिती सुधारली आहे. एवढेच नव्हे तर आपल्या प्रतिनिधींचा प्रधान मंडळात समावेश करून घेतला आहे.' असे सांगून महाराज कामगारांना संघटनांची महती सांगतात. पाश्चात्त्य देशाचा दाखला देऊन ते म्हणतात, 'तिकडेही भांडवलवाले लोकांची मजूरदार लोकांवर बेसुमार सत्ता चाले. पण आता मजूरदार लोकांनी आपले संघ बनविले आहेत. गवताच्या एकेका काडीची ताकद जास्त नसते. पण अशा अनेक काड्यांचा वेठ वळला तर त्याने हत्तीलाही बांधता येईल.'



सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त करून देणे, त्याची आर्थिक उन्नती साधणे यासाठी महाराजांनी उच्चवर्णीय काय आक्षेप घेतील याची तमा न बाळगता अभूतपूर्व निर्णय घेतले.

अस्पृश्यतेच्या कल्पनेचीच त्यांना चीड होती. अस्पृश्य हा शब्द कोणाही माणसाला लावणे हे फार निंद्य आहे असेच त्यांचे सांगणे होते. महाराजांनी अस्पृश्यता नष्ट करण्याच्या दृष्टीने स्वतःचे खासगी नोकर, माहूत इ. जागांवर अस्पृश्यांची नेमणूक करून इतरांना आदर्श घालून दिला. अस्पृश्यांना सरकारी नोकरीत अग्रक्रम दिला, अपवाद करून कमी शिकलेल्या अस्पृश्यांना समाजात प्रतिष्ठेचे स्थान प्राप्त करून दिले. काही अस्पृश्य जातींना जन्मजात गुन्हेगार समजून पोलीस ठाण्यावरची सक्तीची हजेरी परंपरेने चालू होती. महाराजांनी ही हजेरीची माणुसकीला काळिमा आणणारी पद्धत बंद करून त्यांना माणुसकीचे हक्क निर्धाराने परत केले. महाराजांनी आपल्या संस्थानातील वातावरणच पूर्ण बदलून टाकल्यामुळे श्री. दत्तोबा पवारांसारखा दलित नेता त्यांच्या काळात कोल्हापूर नगरपालिकेचा स्थायी समितीचा अध्यक्ष होऊ शकला.

अस्पृश्यांनी वतनाच्या पाठीमागे लागून दारिद्र्यात व गुलामगिरीत काळ कंठू नये तर पूर्वीच्या काळातल्या वैश्यवृत्ती व उद्योग यांचा अंगीकार करून, स्वतःची उन्नती साधावी असे त्यांचे कळकळीचे आवाहन होते.

महाराजांची अस्पृश्यांकडे बघण्याची दृष्टी कशी समतावादी होती, अस्पृश्यांबद्दल त्यांच्या अंतःकरणात किती प्रेम व कळकळ होती हे त्यांनी काढलेल्या पुढील फर्मानावरूनही दिसून येईल. 'सरकारी इमारती खासगी उपयोगासाठी दिलेल्या नसल्यामुळे अस्पृश्यांना तुच्छतेने वागविण्याचा कोणालाही हक्क नसून, अस्पृश्यांची प्रत्येक तऱ्हेने काळजी घेतली पाहिजे. शिक्षणसंस्था गरीब लोकांकरिता असून गरिबांतील गरीब जे अस्पृश्य, त्यांना समतेच्या पायावर वागवणे योग्य आहे. ते कर देतात तर मग त्यांना वाईट रितीने का वागवावे? हुजूरची अंतःकरणपूर्वक इच्छा आहे की, शाळा खात्यांतील ज्या खासगी किंवा सरकारी संस्थांना ग्रॅन्ट किंवा इमारती किंवा प्ले ग्राऊंड वगैरे रूपाने मदत मिळते त्यांनी स्पृश्यवर्गापेक्षा अस्पृश्यांना जास्त ममतेने व आदराने वागवावे. कारण स्पृश्य लोक कोणत्याही प्रकारे शिक्षणात आपला मार्ग काढू शकतात. परंतु अस्पृश्यांना ते असाध्य असल्यामुळे कोणताही मार्ग नाही. जर अस्पृश्यांना समतेने वागविले नाही तर मग तो प्रिन्सिपॉल अगर खालच्या दर्जाचा शिक्षक असो, त्याला जाब द्यावा लागेल, आणि खासगी संस्थांना जी मदत मिळते ती काढून घेण्यात येईल. सरकारी मदत मिळणाऱ्या कोणत्याही शाळेत एखादा अस्पृश्य वर्गाचा विद्यार्थी आला तर संभावित गृहस्थाप्रमाणे आदरपूर्वक वागवून, त्याला शाळेत घेण्यात यावे. शाळा खात्यातील कोणा इसमाची असे करण्यास हरकत असेल तर त्यांने हा हुकूम झाल्यापासून, सहा आठवड्याचे आत आपला राजीनामा पाठवावा, अर्थात त्याला पेन्शन मिळणार नाही.''

अशा तऱ्हेने छत्रपती शाहू महाराजांनी समताधिष्ठित समाज निर्मितीसाठी ऐतिहासिक व क्रांतिकारक कार्य केले आहे.

**लेखक : मराठी साहित्याचे व्यासंगी आणि साक्षेपी समीक्षक (सोलापूर)**



कोल्हापूर येथील डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह.

# शिका आणि समर्थ व्हा...

**सर्व घटकांना समाजाच्या प्रवाहात सामावून घेत असताना विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलती मिळाव्या यासाठी शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने महत्त्वपूर्ण योजना आणल्या. यामध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना, डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना, शेतीपूरक कौशल्य प्रशिक्षण आणि छत्रपती राजाराम महाराज उद्योजकता व कौशल्य प्रशिक्षण अभियान यांचा समावेश आहे.**

**वर्षा फडके-आंधळे**

## वसतिगृह निर्वाह भत्ता

राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती आणि डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता या दोन्ही योजनेंतर्गत विविध घटकांतील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी मिळण्यासाठी साहाय्य केले जाते. शिक्षण घेत असताना अडचणी येऊ नये या अनुषंगाने दोन्ही योजना राबवण्यात येत आहेत.

महाराष्ट्रात कुठेही राहणाऱ्या मुलांना शिक्षण घेणे सुलभ व्हावे, यासाठी गेल्या वर्षी डॉ. पंजाबराव देशमुख निर्वाह भत्ता योजना सुरू करण्यात आली. या योजनेमुळे ग्रामीण आणि दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेतल्यानंतर, महानगर किंवा शहरांमध्ये जाऊन शिक्षण घेण्याची सोय उपलब्ध झाली. काही महाविद्यालयांमध्ये वसतिगृहाची सुविधा उपलब्ध असते तर काही ठिकाणी विद्यार्थी जागा भाड्याने घेऊन राहतात, अशाच विद्यार्थ्यांसाठी ही योजना उपयुक्त ठरत आहे. केवळ शिक्षण शुल्कासाठी शिष्यवृत्ती देणे पुरेसे नाही हे ओळखूनच शासनाने ही योजना

कार्यान्वित केली. ज्या विद्यार्थ्यांचे पालक अल्पभूधारक शेतकरी किंवा नोंदणीकृत मजूर आहेत अशा विद्यार्थ्यांना, शासनाने निश्चित केलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमाचे शिक्षण घेण्यासाठी ही योजना फायद्याची ठरत आहे.

या योजनेंतर्गत शासकीय, शासन अनुदानित आणि खासगी विनाअनुदानित महाविद्यालय किंवा तंत्रनिकेतनमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना दरमहा निर्वाह भत्ता मिळणार आहे.

या योजनेंतर्गत अल्पभूधारक शेतकरी, नोंदणीकृत मजुरांच्या मुलांना मासिक भत्ता देण्याचा विचार यापूर्वी झाला नव्हता. या वर्गातील मुलांनासुद्धा उच्चशिक्षण घ्यायचे असते पण महानगरांमध्ये किंवा छोट्या शहरात एकटे राहून शिक्षण घ्यावे लागेल या विचाराने अनेक मराठा मुले उच्च शिक्षण घेण्याचा विचार करत नव्हते. पण आता या योजनेमुळे अल्पभूधारक शेतकरी, नोंदणीकृत मजूर किंवा ज्या पालकांचे उत्पन्न आठ लाख रुपयांच्या वार्षिक मर्यादेत आहे अशा विद्यार्थ्यांना या योजनेचा फायदा मिळणार आहे. शासकीय, शासन अनुदानित आणि खासगी विनाअनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालय किंवा तंत्रनिकेतनमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना आता वार्षिक निर्वाह भत्ता मिळतो.

या योजनेमुळे निर्वाहभत्त्यासाठी वार्षिक २० ते ३० हजार रुपयांपर्यंत भत्ता मिळत असल्याने, आता या संवर्गातील विद्यार्थिसंख्या वाढते आहे. या योजनेंतर्गत शासनाने गेल्या वर्षी ३२ कोटी रुपयांची तरतूद केली होती. याचा फायदा २५ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना झाला आहे. या वर्षासाठी अर्थसंकल्पामध्ये ३२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून राज्यातील १० जिल्ह्यांत, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या इमारतींमध्ये वसतिगृहे सुरू करण्यात येणार आहे. या इमारतींचे नूतनीकरण करून त्या संस्थांना, वसतिगृह चालवण्यासाठी मोफत देण्यात येणार आहेत. या योजनेबाबत सविस्तर माहिती महाराष्ट्र सरकारच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या 'महाडीबीटी' या संकेतस्थळावरून घेता येईल.

### अधिक माहितीसाठी

शासनाने डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेसंदर्भात १३ ऑक्टोबर २०१६, २२ फेब्रुवारी २०१८ आणि १८ जून २०१८ रोजी शासन निर्णय निर्गमित केले आहेत. या तिन्ही शासन निर्णयांमध्ये या योजनेविषयी तसेच या योजनेमध्ये वेळोवेळी केलेल्या बदलांविषयी माहिती देण्यात आली आहे.

## शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना

समाजातील सर्व विविध घटकांतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलती मिळाव्या यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागाने राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना कार्यान्वित केली. या योजनेंतर्गत आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रम शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना लाभ दिला जातो. या योजनेमुळे शासकीय, शासन अनुदानित, खासगी अनुदानित आणि कायम विनाअनुदानित संस्थांमध्ये प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना; उच्च शिक्षण घेण्याची संधी मिळणार आहे. ही योजना शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून सुरू करण्यात आली. उच्च शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांनी शिक्षणाची गुणवत्ता आणि उपयुक्तता तपासून घेणे आवश्यक असून, त्यानुसार अभ्यासक्रमांना प्रवेश घेणे गरजेचे आहे.

### निकष

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून ईबीसी विद्यार्थ्यांच्या ज्या पालकांची वार्षिक उत्पन्न मर्यादा आठ लाख रुपये आहे अशा विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळतो. उच्च व तंत्र शिक्षण, वैद्यकीय शिक्षण, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, मत्स्यव्यवसाय अशा विभागांतर्गत येणाऱ्या ६०५ शैक्षणिक अभ्यासक्रमांसाठी लागणाऱ्या शुल्कामध्ये ५० टक्के सवलत देण्यात आली आहे. या वर्षापासून वैद्यकीय आणि दंत वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा यामध्ये

### वैशिष्ट्ये

■ शासकीय, शासन अनुदानित आणि खासगी विनाअनुदानित महाविद्यालये किंवा तंत्रनिकेतन व्यावसायिक अभ्यासक्रमास केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (कॅप) प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना दरमहा निर्वाह भत्ता मिळेल. ■ महानगरात (मुंबई महानगर क्षेत्र, पुणे, औरंगाबाद, नागपूर) शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रतिमहा तीन हजार रुपये (वार्षिक ३० हजार रुपये) तर या शहरांव्यतिरिक्त अन्य शहरात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रतिमहा दोन हजार रुपये (वार्षिक २० हजार रुपये) वसतिगृह निर्वाह भत्ता मिळेल. ■ अंमलबजावणी मागील शैक्षणिक वर्षापासूनच सुरू करण्यात आली असून यापूर्वीच्या वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनाही या वर्षापासून लाभ मिळेल.



■ व्यावसायिक अभ्यासक्रम शिकणारे विद्यार्थी ज्यांच्या पालकांची वार्षिक उत्पन्न मर्यादा १ लाख रुपये आहे अशा विद्यार्थ्यांनाही वार्षिक निर्वाह भत्ता देण्यात येतो. यामध्ये विद्यार्थी क्षमता कितीही असली तरी चालते.

समावेश करण्यात आला आहे. गेल्या वर्षी या योजनेंतर्गत ४०० कोटी रुपये खर्च करण्यात आले असून, २ लाख ३० हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना या योजनेचा फायदा मिळाला आहे. यंदाच्या अर्थसंकल्पात या वर्षीच्या शैक्षणिक वर्षासाठी ९५८ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

या शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेची अंमलबजावणी न करणाऱ्या महाविद्यालयांच्या विरोधात कारवाई करण्यात येईल. शिक्षण शुल्काच्या केवळ ५० टक्के इतकी रक्कम विद्यार्थ्यांकडून घ्यावी, अन्य ५० टक्के रक्कम राज्य शासन देणार आहे. परंतु ज्या महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांकडून १०० टक्के शुल्क घेण्यात आल्याच्या तक्रारी आल्या आहेत त्यावर शासनामार्फत कारवाई करण्यात येणार आहे.

विद्यार्थ्यांचा आधार क्रमांक प्राप्त करून, हा आधार क्रमांक बँकेच्या खात्याशी संलग्न करून घेण्यात येत आहे. आधार पेमेंट ब्रिज सिस्टिमद्वारे शासनाच्या विविध योजनांचे अनुदान, प्रतिपूर्ती, शिष्यवृत्ती इत्यादीची रक्कम थेट लाभार्थींच्या (डीबीटी) खात्यात जमा करता येईल, अशी कार्यपद्धती विकसित करण्यात आली आहे.

## मिळणारे फायदे

■ या योजनेंतर्गत ईबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीसाठीची पालकांची वार्षिक उत्पन्न मर्यादा १ लाख



**प्रयोगशाळेत प्रात्यक्षिक करताना विद्यार्थीनी.**

रुपयावरून ८ लाख रुपये करण्यात आली आहे. ■ उच्च व तंत्रशिक्षण, वैद्यकीय शिक्षण, कृषी विभाग, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय आणि मत्स्यव्यवसाय विभाग यांचे अभ्यासक्रम शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना याचा लाभ मिळेल. ■ ईबीसी आणि ओबीसी विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्काच्या ५० टक्के रक्कम आता शिष्यवृत्तीच्या स्वरूपात मिळेल. विशेष म्हणजे राज्य शासन डिजिटल प्रशासनावर भर देत असून आधार संलग्नित बँकेत विद्यार्थ्यांच्या खात्यावर थेट रक्कम जमा होईल. ■ वैद्यकीय शिक्षणासाठी बँक कर्ज घेतल्यास त्यावरील व्याजाची रक्कम शासन भरेल. ■ सर्व नव्या सवलती डीबीटीद्वारे यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून सुरू करण्यात आल्या आहेत.

**ही योजना पुढील व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी लागू आहे.**

## उच्च व तंत्र शिक्षण विभाग

**पदविका –** दहावीनंतर इंजिनिअरिंग डिप्लोमा, १२ वीनंतर फार्मसी डिप्लोमा, १२ वीनंतर हॉटेल मॅनेजमेंट डिप्लोमा.

**पदवी –** इंजिनिअरिंग, फार्मसी, हॉटेल मॅनेजमेंट व केटरिंग टेक्नॉलॉजी, आर्किटेक्चर.

**पदव्युत्तर पदवी –** एम.बी.ए./एम.एम.एस., एम.सी.ए.

## वैद्यकीय शिक्षण विभाग

**पदवी –** एमबीबीएस, बीडीएस, बीएएमएस, बीएचएमएस, बीयूएमएस, बीपीटीएच, बीओटीएच, नर्सिंग.

## कृषी विभाग

**पदविका –** कृषी पदविका

**पदवी –** कृषी, फलोत्पादन, जैवतंत्रज्ञान, अन्न तंत्रज्ञान, शेती व्यवस्थापन.

**पदव्युत्तर पदवी –** कृषी व संलग्न अभ्यासक्रम

## पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग

**पदविका –** दुग्धव्यवसाय व्यवस्थापन, पशुसंवर्धन व्यवस्थापन.

**पदवी –** प्राणिशास्त्र व पशुसंवर्धन, दुग्धतंत्रज्ञान, मत्स्यविज्ञान.

**पदव्युत्तर पदवी –** प्राणिशास्त्र.

७ ऑक्टोबर २०१७ च्या शासन निर्णयानुसार बीए, बीकॉम सारख्या बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी देखील ही योजना लागू आहे.

## पात्र महाविद्यालये

राज्यातील सर्व खासगी विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमांची महाविद्यालये/तंत्रनिकेतने (खासगी अभिमत/स्वयंअर्थसाहाय्य विद्यापीठे वगळून) आणि सरकारी, सरकार अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालये/तंत्रनिकेतनांमधील (सरकारी अभिमत विद्यापीठांसह) या योजनेंतर्गत निर्धारित केलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी सक्षम प्राधिकरणामार्फत केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश घेणारे विद्यार्थी पात्र असतील.

## अधिक माहितीसाठी

या योजनेसंदर्भात राज्य शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने ७ ऑक्टोबर २०१७ आणि ३१ मार्च २०१८ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे. या दोन्ही शासन निर्णयांमध्ये विस्तृतपणे या योजनेविषयी सविस्तर माहिती व निकष नमूद करण्यात आले आहेत.

# शेतीपूरक कौशल्य प्रशिक्षण

स्वयंरोजगारासाठी सामान्यपणे कोणतीही व्यक्ती प्रवृत्त होत नाही. कारण त्या व्यक्तीस भविष्यात आर्थिक स्थैर्य प्राप्त होण्याची खात्री वाटत नाही. स्वयंरोजगाराकरिता सामान्यपणे समाजात अनुकूल बदल घडवून आणावयाचे असतील तर स्वयंरोजगार करणाऱ्यास भविष्यकाळासाठी आर्थिक स्थैर्याची शाश्वती देण्याची आवश्यकता आहे. या अनुषंगाने शासनाने राज्यातील बेरोजगार उमेदवारांना

स्वयंरोजगारासाठी प्रोत्साहित करण्यासाठी विविध विभागांतर्गत महामंडळामार्फत उमेदवारांना स्वयंरोजगाराकरिता कर्ज उपलब्ध करून देते.

शेतकरी आणि तरुणांसाठी स्वयंरोजगार आणि व्यवसायाकरिता संधी निर्माण होण्यासाठी, कौशल्य प्रशिक्षण देण्यात येणार आहे. अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या विविध योजनांच्या माध्यमातून, कौशल्य प्रशिक्षण योजना राबवण्यात येणार आहे. या महामंडळाच्या माध्यमातून, केंद्र शासनाच्या साहाय्याने शेतकऱ्यांच्या मुलांना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देण्यात येईल. बँकेमार्फत कर्ज उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

शेतकऱ्यांना आधुनिक आणि प्रयोगशील करण्यासाठी विविध उपक्रम राबवण्यात येत आहे. शेतकरी आणि तरुणांसाठी स्वयंरोजगार आणि व्यवसायाकरिता कौशल्य प्रशिक्षण देण्यात येते. यामध्ये प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत विविध ३४ कृषीविषयक अभ्यासक्रम प्रशिक्षण देण्यात येते. यामध्ये १६ महिन्यांचा कालावधी आहे. राज्यातील ग्रामीण भाग आर्थिकदृष्ट्या समृद्ध करण्यासाठी येणाऱ्या काळात कृषी क्षेत्रात मोठ्या प्रमाणात कौशल्य विकास करण्यावर भर देण्यात येत आहे. महामंडळामार्फत कृषी गट प्रशिक्षण, कृषी वैयक्तिक प्रशिक्षण, गट प्रकल्प कर्ज योजना, बीज भांडवल कर्ज योजना आणि स्पर्धा प्रशिक्षण योजना अशा ५ योजना नव्याने सुरू करण्यात आल्या आहेत. महाराष्ट्रातील तरुणांना शेती व शेतीपूरक व्यवसायासाठी प्रवृत्त करणे, शेती करणाऱ्यांना प्रशिक्षण देणे, गट शेतीला प्रोत्साहन देणे, गट प्रकल्प यांना आर्थिक साहाय्य करून कार्यान्वित करणे, शेती उत्पादकता वाढवणे आणि शाश्वत शेतीसाठी प्रवृत्त करणे, प्रशिक्षणांतर्गत शेतकऱ्यांना उपलब्ध बाजारपेठेची माहिती देणे आदी बाबी अंतर्भूत आहेत.


कृषीविषयक संशोधन करताना अभ्यासक.

## माहिती आणि प्रशिक्षण

कृषी गट प्रशिक्षणांतर्गत शेतकऱ्यांना आणि तरुणांना कृषी आणि संलग्न उद्योगाशी निगडित माहिती आणि प्रशिक्षण देण्यात येणार आहे. महसूल मंडळ स्तरावर प्रशिक्षणाचे ठिकाण असेल. सध्या महाराष्ट्रात एकूण १८०० मंडळे आहेत आणि २०० शेतकरी असे धरले तर एकूण ३ लाख ६० हजार शेतकऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येईल. प्रशिक्षणाचा कालावधी एकूण ९ दिवस असेल. यामध्ये ४ दिवस वर्ग प्रशिक्षण, ४ दिवस प्रात्यक्षिक आणि १ दिवस मूल्यमापन व प्रमाणपत्र असे वेळापत्रक असेल. महामंडळामार्फत प्रशिक्षणाचा खर्च करण्यात येईल. कौशल्य विकास आणि उद्योजकता विभाग हे प्रशिक्षण नोडल एजन्सी म्हणून काम बघतील. तर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली असलेली जिल्हा समिती प्रशिक्षणाचे सनियंत्रण व देखरेख करेल.

## अर्हता

कृषी वैयक्तिक प्रशिक्षणामध्ये महाराष्ट्रातील शेतकरी तरुणांना कृषी आणि संलग्न क्षेत्रासंबंधी प्रशिक्षण देणे, कृषी सल्लागार म्हणून ग्रामीण भागांमध्ये काम करता येईल का ते पाहणे किंवा स्वत:चा उद्योग सुरू करण्यासाठी मदत करणे याचा समावेश आहे. कृषी पदविका धारक किंवा बारावी उत्तीर्ण या अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण घेऊ शकणार असून, प्रशिक्षणाचा कालावधी ३ महिन्याचा असेल. यामध्ये २ महिने हा शेतीसंबंधी माहिती देणारा तर १ महिना व्यवहारिक ज्ञान देण्यासाठी असेल. कृषी महाविद्यालय किंवा कृषी विज्ञान केंद्र येथे प्रशिक्षण होईल. कौशल्य विकास आणि उद्योजकता विभाग हे प्रशिक्षण नोडल एजन्सी म्हणून काम पाहणार आहेत. या योजनेंतर्गत अंदाजे ५०,००० प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देण्याचे उद्दिष्ट आहे. या अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण घेतलेल्यांना बीज भांडवल कर्ज योजनेतून प्रत्येकी १० ते १५ लाख रुपये कर्ज देण्यासाठी प्राधान्य देण्यात येईल.

गट प्रकल्प कर्ज योजनेंतर्गत आर्थिकदृष्ट्या मागास घटकातील उमेदवारांचा बचतगट, भागीदारी संस्था, सहकार संस्था आणि इतर दोनपेक्षा जास्त व्यक्ती एकत्र येऊन स्थापन कणारी संस्था यांना; लघू व मध्यम उद्योग व्यवसायासाठी आर्थिक साहाय्य करणे अशी योजना आहे. तर यामध्ये महामंडळामार्फत ४० टक्के, बँकेमार्फत ५० टक्के आणि गट संस्थेमार्फत १० टक्के कर्ज देण्यात येईल. यासाठी ४ टक्के व्याजदर असून, परतफेड कालावधी ७ वर्षांचा असेल. या उद्योगांतर्गत जवळपास ५,००० लाभार्थ्यांना फायदा होईल.

## बीज भांडवल

बीज भांडवल कर्ज योजनेंतर्गत महाराष्ट्रातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील उमेदवारांना वैयक्तिक उद्योग तथा स्वयंरोजगाराकरिता आर्थिक साहाय्य करण्यात येईल. यामध्ये १५ लाख रुपयांपर्यंत कर्ज मिळेल. महामंडळामार्फत ४५ टक्के, बँकेमार्फत ५० टक्के आणि गट संस्थेमार्फत ५ टक्के कर्ज देण्यात येईल. शेती व पूरक साठी २ टक्के आणि इतरसाठी ४ टक्के व्याजदर असून परतफेड कालावधी ७ वर्षांचा असेल.

## स्पर्धा प्रशिक्षण

स्पर्धा प्रशिक्षण योजनेंतर्गत आर्थिकदृष्ट्या मागास युवकांना बँक, रेल्वे, केंद्रीय लोकसेवा आयोग, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, स्टाफ सिलेक्शन कमिशनमार्फत नोकरीसाठी स्पर्धा परीक्षा आणि मुलाखतीचे तंत्र यासाठी विशेष प्रशिक्षण उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यामध्ये प्रतिविद्यार्थी जास्तीत जास्त ५०,००० रुपये देण्यात येतील. विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणाचा कालावधी १ ते ६ महिन्यांचा

असेल. शेतकऱ्यांना प्रशिक्षित करण्यासाठी कौशल्य विकास विभागाने पुढाकार घेतला आहे. या प्रशिक्षण उपक्रमामुळे शेतकऱ्यांना आधुनिक आणि प्रयोगशील शेतीबाबत प्रशिक्षण देण्यात येणार आहे. शेती प्रशिक्षणादरम्यान पीक घेताना नेमके कोणते प्रयोग करणे आवश्यक आहे याबाबत माहिती मिळण्यास मदत होईल. सामूहिक शेतीमधील प्रयोग, आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे शेतकऱ्यांनी शेती करताना दडपण वाटू नये आणि शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण कमी व्हावे यासाठी प्रयत्न केले जातील.

### अधिक माहितीसाठी

या योजनेच्या लाभासाठी www.udyog.mahaswayam.gov.in या संकेतस्थळाला भेट देऊन त्यामधील Entrepreneurship या पर्यायावर कर्ज योजनेचा अर्ज भरता येईल.



योजनेच्या लाभासाठी अर्जदार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असणे आवश्यक आहे. तसेच उमेदवाराचे वय १८ ते ४५ वर्ष असणे आवश्यक आहे. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र कार्यालयात त्या उमेदवाराने नाव नोंदवलेले असणे आवश्यक आहे. अर्जदाराच्या कुटुंबाची वार्षिक उत्पन्न मर्यादा रुपये सहा लाख एवढी असावी.

## छत्रपती राजाराम महाराज उद्योजकता व कौशल्य विकास अभियान

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाची स्थापना २७ नोव्हेंबर १९९८ मध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या सर्वांगीण विकासासाठी करण्यात आली. याबरोबरच रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे हेसुद्धा या महामंडळाचे मुख्य उद्दिष्ट आहे. अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत आर्थिकदृष्ट्या मागास घटकातील उद्योजकांना भरघोस अर्थसाहाय्य करणाऱ्या तीन योजना राबवण्यात येतात. याबाबतचा शासन निर्णय २१ नोव्हेंबर २०१७ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. तसेच www.udyog.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर माहिती उपलब्ध आहे. या योजनेमध्ये वार्षिक उत्पन्नाची मर्यादा ५० हजारांहून आठ लाख रुपये करण्यात आली. महामंडळामार्फत सुरू करण्यात आलेल्या तीन योजना १) वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना, २) गट कर्ज व्याज परतावा योजना, ३) गट प्रकल्प कर्ज योजना..

शेतकऱ्यांच्या मुलांसाठी प्रशिक्षण देण्याकरिता शेतकरी कुशल योजना राबविण्यात येत आहे.

### वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना

ही योजना कृषी, संलग्न आणि पारंपरिक उपक्रम, लघू व मध्यम उद्योग जसे उत्पादन, व्यापार व विक्री आणि सेवा क्षेत्रांसाठी आहे. एकाच कुटुंबातील एकाच व्यक्तीला या योजनेचा फायदा घेता येईल.

यामध्ये कौटुंबिक वार्षिक उत्पन्न ८ लाख रुपयांच्या मर्यादेत असलेल्या आणि बँकेने १० लाख रुपयापर्यंतच्या मर्यादेत कर्ज मंजूर केलेल्या उमेदवाराने वेळेत कर्जाचे हप्ते भरल्यावर; त्यातील व्याजाची रक्कम (१२ टक्क्यांच्या मर्यादेत) त्यांच्या आधार लिंक बँक खात्यात दरमहा जमा करण्यात येईल. पहिला हप्ता अनुदान (मुद्दल आणि व्याज) स्वरूपात लाभार्थ्याला देण्यात येईल. ही योजना संपूर्णपणे संगणीकृत असून, प्रक्रिया सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन (पीएफएमएस) अथवा तत्सम संगणक प्रणालीद्वारे राबवण्यात येत आहे. या योजनेकरिता एकूण प्रस्तावित निधीच्या किमान ४ टक्के निधी दिव्यांगांसाठी (सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाने त्यांच्या अधिसूचनेत नमूद केलेल्या व्याख्येनुसार) राखीव ठेवण्यात आला आहे.

### गट कर्ज व्याज परतावा योजना

ही योजना कृषी, संलग्न आणि पारंपरिक उपक्रम, लघू व मध्यम उद्योग जसे उत्पादन, व्यापार व विक्री आणि सेवा क्षेत्रांसाठी आहे. शासनमान्य बचतगट, भागीदारी संस्था, सहकारी संस्था, आणि कंपनी हे गट या योजनेंतर्गत पात्र असतील. या प्रकल्पासाठी यापूर्वी महामंडळाच्या किंवा इतर महामंडळाच्या कोणत्याही योजनेचा लाभ घेतलेला नसावा.

यामध्ये कौटुंबिक वार्षिक उत्पन्न आठ लाख रुपयांच्या मर्यादेत असलेल्या उमेदवारांना गटासंदर्भात, बँक कर्ज मर्यादा प्रतिगटास जास्तीत जास्त ५० लाख रुपयांपर्यंत आहे. या मर्यादेत देण्यात आलेल्या उद्योग उभारणी कर्जावर, ५ वर्षापर्यंत अथवा कर्ज कालावधी कमी यापैकी जे कमी असेल ते, जास्तीत जास्त १२ टक्के व्याजाने आणि १५ लाख रुपयांच्या मर्यादेत कर्ज मंजूर केलेल्या गटाने वेळेत कर्जाचे हप्ते भरल्यास सवलत देण्यात येईल. असा हप्ता भरल्यावर त्यातील व्याजाची रक्कम त्यांच्या आधार लिंक खात्यात दरमहा महामंडळामार्फत जमा करण्यात येईल. बचत गटांची मयोमर्यादा ४५ वर्षे अशी शिथिल करण्यात आलेली आहे. ही योजना संपूर्णपणे संगणीकृत असून प्रक्रिया सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली (पीएफएमएस) या अथवा तत्सम संगणक प्रणालीद्वारे राबवण्यात येत आहे. या योजनेकरिता एकूण प्रस्तावित निधीच्या ४

टक्के निधी दिव्यांगांसाठी राखीव ठेवण्यात आला आहे.

### गट प्रकल्प कर्ज योजना



ही योजना कृषी, संलग्न आणि पारंपरिक उपक्रम, लघू व मध्यम उद्योग जसे उत्पादन, व्यापार व विक्री आणि सेवा क्षेत्रांसाठी आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी वेब पोर्टलवर नाव नोंदणी करणे आवश्यक आहे. एकाच कुटुंबातील एकाच व्यक्तीला या योजनेचा फायदा घेता येणार आहे. हे कर्ज केवळ मुदत कर्ज असणार असून गट पात्र ठरल्यानंतर त्यांना ऑनलाइन मंजुरी दिली जाईल. बिनव्याजी कर्ज रक्कम परतावा वितरणाच्या खात्यात ७ महिन्यापासून ८४ व्या महिन्यापर्यंत (७ वर्ष) समान हप्त्यात देणे आवश्यक असेल. महामंडळामार्फत या योजनेंतर्गत, नॉन क्रिमिलेअरकरिता असलेल्या कौटुंबिक वार्षिक उत्पन्न मर्यादा ८ लाख रुपयांच्या आत असलेल्या पात्र शेतकरी उत्पादक गटांना (farmers producers organization) १० लाख रुपयांपर्यंत बिनव्याजी दराने कर्जरक्कम उद्योगाकरिता देण्यात येईल. ही योजना संपूर्णपणे संगणकीकृत असून प्रक्रिया सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली (पीएफएमएस) या अथवा तत्सम संगणक प्रणालीदवारे राबवण्यात येईल. या योजनेकरिता एकूण प्रस्तावित निधीच्या किमान ४ टक्के निधी दिव्यांगांसाठी राखीव ठेवण्यात आला आहे. या योजनांचा फायदा महाराष्ट्राचा रहिवासी असणाऱ्या आणि १८ ते ४१ वय असणाऱ्यांना मिळणार आहे. लाभार्थ्यांचे कर्ज खाते आधारकार्ड लिंक असणे आवश्यक आहे. लाभार्थ्यांचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्न ८ लाख रुपयांच्या मर्यादेत असणे आवश्यक आहे. दिव्यांग व्यक्ती असल्यास त्यांच्याकडे सक्षम यंत्रणेने दिलेले प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

**विभागीय संपर्क अधिकारी**

# संधी आणि प्रेरणा

**धनराज माने**

राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील कुटुंबांसमोर मुलांचे शिक्षण पूर्ण करण्याचा मोठा प्रश्न असतो. या स्तरातील कुटुंबातील मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी व केवळ पैशाअभावी त्यांना चांगल्या शिक्षणाची कवाडे बंद होऊ नयेत म्हणून शासनाने शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना सुरू केली, या योजनेला राजर्षी शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना असे संबोधण्यात येते.

व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी विहित अटी व शर्तीनुसार शासकीय, शासन अनुदानित (अकृषी व शासकीय अभिमत विद्यापीठासह) व खासगी विनाअनुदानित (खासगी अभिमत विद्यापीठे व स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे वगळून) महाविद्यालये, तंत्रनिकेतन सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत केंद्रभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (व्यवस्थापन कोटा वगळून) प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी राज्यशासनाने राजर्षी शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती दिली जाते.



### असा घ्या लाभ...

या योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाइन अर्ज भरणे आवश्यक आहे. राज्यातील अधिवासाचे प्रमाणपत्र व शैक्षणिक वर्षाच्या लगतपूर्वीच्या वित्तीय वर्षातील संबंधीत तहसीलदार अथवा सक्षम अधिकाऱ्याने दिलेले कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न प्रमाणपत्र जोडणे अनिवार्य आहे. याप्रमाणे पात्र लाभार्थ्यांना मंजूर करण्यात आलेली अनुज्ञेय शिक्षण शुल्काची रक्कम ही दोन हप्त्यात देण्यात येते. त्यापैकी पहिला हप्ता हा शैक्षणिक वर्षातील ऑक्टोबर महिन्याच्या पाहिल्या आठवड्यापर्यंत व उर्वरीत दुसरा हप्ता फेब्रुवारी अखेरपर्यंत लाभार्थ्याच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा करण्यात येतो.

### योजनेची अंमलबजावणी

या योजनेची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, संचालक, कला संचालनालय आणि संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, संचालक वैद्यकीय शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती यांना संनियंत्रण व समन्वयक अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. तसेच उच्च शिक्षण आणि तंत्र शिक्षण संचालनालयांच्या नियंत्रणाखालील विभागीय सहसंचालक यांना योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी प्राधिकृत करण्यात आले आहे. उच्च व तंत्र शिक्षण विभागाने संस्थांनी शिक्षण शुल्काच्या ५० टक्के रक्कम न घेण्याबाबत पत्र संस्थांना दिले आहे. तंत्रशिक्षण संचालनालयाने विभागनिहाय नोडल अधिकारी नियुक्त केले आहेत. उच्च शिक्षण संचालनालयाने राज्य, विभाग, विद्यापीठ स्तरावर नोडल अधिकारी नेमले असून उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हाधिकारी स्तरावर समिती तयार करण्यात आली आहे. प्रत्येक स्तरावर या योजनेच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यात येत आहे. राज्यातील अधिकाधिक पात्र लाभार्थ्यांना याचा लाभ होण्यासाठी प्रशासनाच्यावतीने विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत.

**संचालक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग.**

**(शब्दांकन : संग्राम इंगळे, विभागीय माहिती कार्यालय, पुणे.)**

**अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती संवर्गातील विद्यार्थ्यांच्या उत्कर्षासाठी राज्य शासनातर्फे विविध योजना राबवण्यात येतात. यामध्ये विविध शिष्यवृत्ती, वसतिगृह निवास, परदेशात शिक्षणासाठी अर्थसाहाय्य, कौशल्य विकास या योजनांचा समावेश आहे. या योजनांचा लाभ घेऊन अनेकांनी करिअरमध्ये उंच झेप घेतली आहे.**

## अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी योजना

# उंच माझा झोका...



### माध्यमिक शिक्षणासाठी शिष्यवृत्ती

**राज्य शासनाची मॅट्रिकपूर्व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजना :** खासगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शाळांमध्ये इ.१ ली ते इ.१० मध्ये शिक्षण घेत असलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना दरवर्षी १० महिन्याच्या कालावधीकरीता शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ती केली जाते. यामध्ये इ.१ली ते ४ थी साठी रु.१००/- दरमहा, इ.५वी ते इ.७वी साठी दरमहा रु.१५०/- व इ.८वी ते इ.१० वी साठी दरमहा रु.२००/- इतकी प्रतिपूर्ती संबंधित जिल्हा परिषदेच्या जिल्हा समाजकल्याण अधिकाऱ्यामार्फत केली जाते.

**माध्यमिक शाळेतील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती :** इ. ५ वी ते ७ वी मधील दोन गुणवत्ताधारक मागासवर्गीय तसेच व इ. ८ वी ते १० वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या पहिल्या दोन मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाते. ही शिष्यवृत्ती दरवर्षी जून ते मार्च या १० महिन्यासाठी मंजूर करण्यात येते. इयत्ता पाचवी ते सातवी दरमहा ५० रुपये/इयत्ता आठवी ते दहावी दरमहा १०० रुपये दिले जातात.

**सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती :** इ. ५ वी ते ७ वी व इ. ८ वी ते १० वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या मुलींच्या गळतीचे प्रमाण कमी व्हावे म्हणून सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती दिली जाते. ही शिष्यवृत्ती दरवर्षी जून ते मार्च या १० महिन्यासाठी मंजूर करण्यात येते. इयत्ता पाचवी ते सातवी दरमहा ५० रुपये/इयत्ता आठवी ते दहावी दरमहा १०० रुपये दिले जातात.

**सैनिक शाळेतील विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता :** नाशिक, पुणे, सातारा येथील सैनिक शाळांमध्ये इयत्ता ५ वी ते १० पर्यंतच्या वर्गात शिकणाऱ्या अनुसूचित जाती व नवबौद्ध विद्यार्थ्यांची शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क, भोजन, निवास, कपडे, घोडेस्वारी, पॉकेट मनी इत्यादीवर होणाऱ्या संपूर्ण खर्चाची प्रतिपूर्ती केली जाते. इतर मान्यताप्राप्त सैनिक शाळांना प्रती विद्यार्थी प्रतिवर्षी रु.१५,०००/- शिष्यवृत्ती दिली जाते.

**भारत सरकारची मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती :** अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांचे शाळेतील गळतीचे प्रमाण कमी व्हावे याकरिता इ.९वी व १० वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना १० महिन्यांसाठी (वसतिगृहात न राहणारे विद्यार्थी - दरमहा १५० रुपये आणि पुस्तके व तदर्थ अनुदान (वार्षिक) ७५० रुपये/ वसतिगृहात राहणारे विद्यार्थी दरमहा ३५० रुपये), पुस्तके व तदर्थ अनुदान (वार्षिक) १००० रुपये) दिले जातात. या शिष्यवृत्तीशिवाय विनाअनुदानित शाळेतील अपंग विद्यार्थ्यांकरिता अतिरिक्त भत्ते दिले जातात.

**राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता पुरस्कार :** इयत्ता १० वी मध्ये ७५ टक्के व त्यापेक्षा जास्त गुण

### तालुकास्तरीय निवासी शाळा

अनुसूचित जातीच्या व नवबौद्ध मुलामुलींकरिता प्रत्येक तालुक्यात एक शासकीय निवासी शाळा सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ३५३ शासकीय निवासी शाळांपैकी प्रथम टप्प्यात १०० शासकीय निवासी शाळा सुरू करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. निवासी शाळेमध्ये इ. ६ वी ते १० वी पर्यंतच्या अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलामुलींना प्रवेश दिला जातो. या निवासी शाळेत मोफत भोजन, निवास, ग्रंथालयीन सुविधा व इतर आवश्यक शैक्षणिक सुविधा पुरवल्या जातात.

मिळवून इयत्ता ११ वी मध्ये प्रवेश घेतलेला अनुसूचित जाती संवर्गातील विद्यार्थी आणि इयत्ता ११ वी व १२ वी मध्ये असणारे अनुसूचित जाती व नवबौद्ध विद्यार्थ्यांसाठी ही शिष्यवृत्ती आहे. १० महिन्यांसाठी इयत्ता ११ वी आणि १२ वी दरमहा ३०० रुपये शिष्यवृत्ती दिली जाते.

**भारत सरकारची मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती :** अनुसूचित जाती प्रवर्गातील कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु.२.५० लाखाच्या मर्यादेत असणाऱ्या विद्यार्थ्यास शालांत परीक्षोत्तर पुढील शिक्षणासाठी शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क, निर्वाह भत्ता व इतर अनुज्ञेय बाबींवरील शुल्क प्रदान केले जाते.

**राज्य शासनाची शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती :** अनुसूचित जाती प्रवर्गातील कुटुंबाचे रु.२.५० लाखापेक्षा जास्त उत्पन्न गटातील विद्यार्थ्यांना शालांत परीक्षोत्तर पुढील शिक्षण घेणासाठी जिल्हास्तरावरील मान्यताप्राप्त संस्थांमध्ये मॅट्रिकोत्तर शैक्षणिक अभ्यासक्रमासाठी शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क व विहित केलेले शुल्क देण्यात येते.

**राजर्षी छत्रपती शाहू महाराज उच्च शिक्षणासाठी देशांतर्गत शिष्यवृत्ती :** अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील कुटुंबाचे रु.६.०० लाख वार्षिक उत्पन्न मर्यादा असलेल्या विद्यार्थ्यांना राज्याबाहेरील नामांकित शैक्षणिक संस्थांमध्ये उच्च शिक्षण घेण्यासाठी राजर्षी शाहू महाराज देशांतर्गत शिष्यवृत्ती योजना सन २००३ पासून सुरू करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत अनुसूचित जातीच्या १०० विद्यार्थ्यांना देशातील नामांकित व शासनमान्य शैक्षणिक संस्थांमध्ये उच्च शिक्षण घेण्यासाठी ही शिष्यवृत्ती देण्यात येते. या शिष्यवृत्तीमध्ये, संस्थेने आकारणी केलेले शैक्षणिक शुल्क, वसतिगृह व भोजन शुल्क दिले जाते. त्याचबरोबर क्रमिक पुस्तके व शैक्षणिक साहित्य यांच्या खर्चासाठी प्रतिवर्षी १०,००० रुपये दिले जातात.

## परदेशात शिक्षणाची संधी




**अनुसूचित जातीच्या मुलामुलींकरिता उच्च शिक्षणासाठी परदेश शिष्यवृत्ती :** अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील ज्या विद्यार्थ्यांना परेदशातील नामांकित विद्यापीठामध्ये पदव्युत्तर व पीएच.डी. अभ्यासक्रमाकरिता क्युएसडब्ल्यूआर ३०० च्या आतील विद्यापीठात प्रवेश मिळाला आहे, अशा ५० विद्यार्थ्यांना (पीएच.डी. २४ व पदव्युत्तर-२६) शिष्यवृत्ती देण्यात येत होती. २०१८-१९ पासून या योजनेंतर्गत ७५ विद्यार्थ्यांना (पीएच.डी. ४७ व पदव्युत्तर-२८) परदेश शिष्यवृत्ती दिली जाणार आहे. यामध्ये विद्यार्थ्यास विद्यापीठाने आकारलेले संपूर्ण शैक्षणिक शुल्क दिली जाते. तसेच वार्षिक निर्वाह भत्ता - अमेरिका व इतर राष्ट्रांसाठी १४००० अमेरिकन डॉलर तर इंग्लंडसाठी ९,००० पौंड इतका अदा करण्यात येतो.

विद्यार्थ्याला अमेरिका व इतर राष्ट्रांसाठी आकस्मिक खर्चासाठी १३७५ अमेरिकन डॉलर आणि इंग्लंडमध्ये १००० पौंड इतके अर्थसाहाय्य देण्यात येते. पुस्तके, अभ्यासदौरा इत्यादी खर्चाचा यात समावेश आहे. विद्यार्थ्यास परदेशात जाताना व अभ्यासक्रम झाल्यानंतर परत येताना विमान प्रवासाचा खर्च तिकीट सादर केल्यानंतर मंजूर करण्यात येतो. दरवर्षी मे महिन्यात या योजनेसाठी अर्ज मागवण्यात येतात.

## शासकीय वसतिगृहांचा आधार

**मागासवर्गीय मुलींसाठी वसतिगृहे :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षानिमित्ताने मागासवर्गीय मुलींना शिक्षण घेणे सोयीचे व्हावे म्हणून विभागीय स्तरावर ७ आणि जिल्हा व तालुकास्तरावर ४३ अशी एकूण ५० नवीन शासकीय वसतिगृहे सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. विभागीय स्तरावरील वसतिगृहे ही २५० विद्यार्थी क्षमतेची आणि जिल्हा व तालुकास्तरावरील वसतिगृहे ही १०० विद्यार्थी क्षमतेची असतील. या वसतिगृहात मोफत निवास, भोजन याबरोबरच अभ्यासाकरिता टेबल-खुर्ची, पुस्तके व वह्या इत्यादी साहित्य ठेवण्यासाठी कपाट, कॉट, गादी, उशी, अंथरूण - पांघरूण, बेडशीट, ब्लँकेट इत्यादी सुविधा पुरवण्यात येत आहे. स्पर्धा परीक्षा केंद्रांमध्ये प्रवेशित मुलींसाठी ५ जागा गुणवत्तेनुसार राखीव ठेवल्या जातात.

**नोकरी करणाऱ्या महिलांसाठी वसतिगृहे :** महानगरात शासकीय, निमशासकीय, खासगी इत्यादी प्राधिकरणात नोकरी करणार्या मागासवर्गीय महिलांकरिता मुंबई, पुणे व नागपूर येथे प्रत्येकी एक शासकीय वसतिगृह सुरू करण्याचा निर्णय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षानिमित्त घेण्यात आला. या वसतिगृहात महिलांच्या निवासाची व्यवस्था करण्यात येऊन त्यांना आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या जातात.


**मुलामुलींसाठी शासकीय वसतिगृहे :** मागासवर्गीय मुलामुलींची शिक्षणाची सोय व्हावी, त्यांना उच्च शिक्षण घेता यावे, त्याचप्रमाणे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील मुलींना विद्यालयीन व

महाविद्यालयीन शिक्षण घेता यावे, यासाठी शासकीय वसतिगृहे सुरू करण्यात आली आहेत. सध्या राज्यात विभागीय, जिल्हा व तालुका पातळीवर ३८१ वसतिगृहे मंजूर असून, त्यांपैकी ३७७ सुरू आहेत. यात मुलामुलींची (मुलांची २१८ + मुलींची १६३) वसतिगृहे कार्यान्वित आहेत. यामध्ये मोफत निवास व भोजन, ग्रंथालयीन सुविधा, प्रतिवर्षी दोन गणवेश, क्रमिक पाठ्य पुस्तके, वह्या, स्टेशनरी तसेच वैद्यकीय आणि अभियांत्रिकी विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासक्रमानुसार स्टेथोस्कोप, ॲप्रन, ड्रॉईंग बोर्ड, बॉयलर सूट व कला निकेतनच्या विद्यार्थ्यांसाठी रंग, ड्रॉईंग बोर्ड, ब्रश, कॅनव्हास इत्यादींचा समावेश आहे. वसतिगृहातील विद्यार्थ्यांना त्यांच्या दैनंदिन खर्चासाठी विभागीय पातळीवर दरमहा रु. ८००, जिल्हा पातळीवर रु. ६०० तर तालुका पातळीवर रु. ५०० निर्वाहभत्ता दिला जातो.

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना :** मागासवर्गीय शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या तथा शासकीय वसतिगृहात प्रवेश न घेतलेल्या विद्यार्थ्यांपैकी अनुसूचित जाती तथा नवबौद्ध घटकांतील इयत्ता ११ वी, १२ वी तसेच इयत्ता १२ वी नंतरच्या व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना पुढील शिक्षण घेता यावे म्हणून भोजन, निवास व इतर शैक्षणिक सुविधा या विद्यार्थ्यांना स्वत: उपलब्ध करून घेण्यासाठी आवश्यक रक्कम विद्यार्थ्याच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये थेट जमा करण्याकरिता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सुरू केली आहे. यामध्ये भोजन भत्ता, निवास भत्ता व निर्वाह भत्ता याकरिता मुंबई शहर, मुंबई उपनगर, नवी मुंबई, ठाणे, पुणे, पिंपरी चिंचवड, नागपूर येथील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांस एकूण रु.६०,०००/–, इतर महसूली विभागातील शहरांतील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी रु.५१,०००/–व इतर जिल्ह्याच्या ठिकाणी तसेच मनपा हद्दीपासून ५ कि.मी.च्या परीसरातील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांस रु.४३,०००/–दिले जातात.

### स्वतंत्र औद्योगिक प्रशिक्षण संस्था

औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये प्रवेशाकरिता अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील उमेदवारांकरिता कमी जागा राखीव असतात. या बाबीचा सातत्याने विचार करून प्रत्येक विभागीय स्तरावर अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यासाठी उच्चस्तर औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरू करण्यात आली आहे. संचालक, व्यवसाय व तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्यामार्फत त्याचे संनियंत्रण केले जाते. प्रवेशितांना मोफत निवास, भोजन व व्यवसाय अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण इ. ची सुविधा दिली जाते. राष्ट्रीय



व्यवसाय प्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांची संलग्नता प्राप्त असलेले एकूण १२ व्यावसायिक अभ्यासक्रम यात समाविष्ट आहेत. यामध्ये मेकॅनिकल, मेडिकल, इलेक्ट्रॉनिक्स, मेकॅनिक यांत्रिक मोटार गाडी, फॅशन टेक्नॉलॉजी (मुलींकरिता), डेंटल लॅब टेक्निशियन, क्राफ्ट्समन फूड प्रॉडक्शन (जनरल), डाटा एन्ट्री ऑपरेटर (मुलींकरिता), ऑपरेटर ॲडव्हान्स मशीन टूल, मेकॅनिक कॉम्प्युटर हार्डवेअर, इंटिरिअर डेकोरेशन ॲण्ड डिझाईनिंग, हेल्थ सॅनिटरी इन्स्पेक्टर, नेटवर्क टेक्निशियन, ड्रायव्हर कम मेकॅनिक या अभ्यासक्रमांचा समावेश.

### तरुणांना व्यवसायाच्या संधी

महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ (मर्यादित), मुंबईतर्फे कर्ज अनुदान योजनेंतर्गत रु. ५०,०००/– पर्यंत गुंतवणूक असणाऱ्या व्यवसायांना आर्थिक साहाय्य केले जाते. बीज भांडवल योजनेंतर्गत रु. ५ लाखापर्यंत गुंतवणूक असणारे प्रकल्प विचारात घेऊन महामंडळाकडून २० टक्के बीज भांडवल रक्कम तर प्रकल्प रकमेच्या ५% रक्कम स्वत:चा सहभाग म्हणून अर्जदाराने भरणे आवश्यक आहे. उर्वरित ७५% रक्कम ही बँकेकडून मंजूर केली जाते. महामंडळामार्फत रु. १०,०००/–चे अनुदान देण्यात येते. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ महामंडळामार्फत विशेष केंद्रीय अर्थ साहाय्य योजना, बीज भांडवल योजना, मुदत कर्ज योजना, लघुऋण वित्त योजना, महिला समृद्धी योजना, शैक्षणिक कर्ज योजना, अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्ती या योजना राबवल्या जात आहेत.

संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळमार्फत ५० टक्के अनुदान योजना, बीज भांडवल आणि प्रशिक्षण या योजना तर राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त व विकास महामंडळ (नवी दिल्ली) यांच्या मुदती कर्ज, सूक्ष्म पत पुरवठा, महिला समृद्धी, महिला किसान, शैक्षणिक कर्ज या योजना राबवल्या जात आहेत.

वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ महामंडळामार्फत बीज भांडवल कर्ज, थेट कर्ज, अनुदान, प्रशिक्षण या योजना राबवल्या जात आहेत. महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळामार्फत थेट कर्ज व २०% बीज भांडवल कर्ज योजना राबवल्या जात आहेत . त्याचबरोबर या महामंडळामार्फत राष्ट्रीय मागासवर्ग वित्त आणि विकास महामंडळ (नवी दिल्ली) यांच्या मुदती कर्ज, ४५% मार्जिन मनी, महिलांसाठी स्वर्णिमा, शैक्षणिक कर्ज, सूक्ष्म पतपुरवठा आणि महिला समृद्धी योजना राबवल्या जात आहेत.

# अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांसाठी योजना

आदिवासी विकास विभागामार्फत आदिवासींच्या विकासासाठी अनेक योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. यामध्ये प्रामुख्याने आदिवासींच्या शिक्षणावर भर देण्यात आला आहे. अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शालेय व उच्च शिक्षणाच्या संधी सहज मिळाव्या यासाठी विविध योजना राबवल्या जात आहेत.

## शालेय स्तरावरील शिष्यवृत्ती योजना

**पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती :** राज्यातील अनुसूचित जमातीच्या १ ली ते १० वी मध्ये आश्रमशाळेव्यतिरिक्त शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहित करणे तसेच शैक्षणिक व इतर किरकोळ खर्च भागवण्यासाठी सुवर्णमहोत्सवी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजनेंतर्गत शिष्यवृत्ती देण्यात येते. विद्यार्थ्यांना १ ली ते ४ थी पर्यंत १ हजार रुपये आणि ५ वी ते ७ वी पर्यंत दीड हजार रुपये तर ८ वी ते १० पर्यंत २ हजार रुपये शिष्यवृत्ती दिली जाते.

**शालांत परीक्षोत्तर शिष्यवृत्ती :** कला, विज्ञान, वाणिज्य या शाखेतील पदवीपूर्व, पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण किंवा अनुत्तीर्ण झाल्यावर मान्यताप्राप्त व्यावसायिक किंवा तांत्रिक प्रमाणपत्र, पदविका, पदवी अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना भारत सरकार शालांत परीक्षोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत शिष्यवृत्ती देण्यात येते. ज्या पालकांचे वार्षिक उत्पन्न अडीच लाखापेक्षा जास्त असेल अशा विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क देण्यात येते. यात विज्ञान, अभियांत्रिकी अभ्यासक्रमासाठी वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना महिन्याला १२०० रुपये आणि वसतिगृहात न राहणाऱ्या विद्यार्थ्यांना ५५० रुपये देण्यात येते. तांत्रिक, आयुर्वेदिक, अभियांत्रिकी प्रमाणपत्र, वास्तुकला, उपयोगिताशास्त्र प्रमाणपत्र या अभ्यासक्रमांसाठी वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना महिन्याला ८२० रुपये आणि वसतिगृहात न राहणाऱ्या विद्यार्थ्यांना ५३० रुपये, पदवीचे सामान्य अभ्यासक्रम द्वितीय वर्षापासून पुढे वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना महिन्याला ५७० रुपये, वसतिगृहात न राहणात्या विद्यार्थ्यांना महिन्याला ३०० रुपये आणि ११ वी १२ पदवीच्या प्रथम वर्षासाठी वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना महिन्याला ३८० रुपये आणि वसतिगृहात न राहणाऱ्या विद्यार्थ्यांना दरमहा २३० रुपये निर्वाह भत्ता दिला जातो.

**सैनिकी शाळेतील विद्यार्थ्यांना विद्यावेतन :** सैनिकी शाळेत शिकणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न भारत सरकार शालांत परीक्षोत्तर शिष्यवृत्तीकरिता निर्धारित केलेल्या उत्पन मर्यादेत असल्यास, अशा विद्यार्थ्यांचा शिक्षणाचा संपूर्ण खर्च सरकारतर्फे केला जातो. शालेय शिक्षण विभागाच्या निर्णयानुसार सैनिकी शाळांमध्ये आदिवासी विद्यार्थ्यांना जादा तुकडीद्वारे इयत्ता ५ वी पासून पुढे शिक्षण घेण्यासाठी मदत केली जाते. त्यानुसार सैनिकी शाळेतील वसतीगृह निर्वाह खर्च भागवण्यासाठी प्रती विद्यार्थी रु.१५,०००/- या प्रमाणे वार्षिक अनुदान, या व्यतिरिक्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्षात दीर्घ सुटीचे कालावधीत सैनिकी शाळेतून मूळ गावी येण्या-जाण्यासाठी प्रवास खर्च व दैनंदिन किरकोळ खर्च (यात शालेय व कवायत गणवेश, नाईट ड्रेस, बूट व मोजे, टॉवेल, तेल, साबण, दंतमंजन, लेखनसाहित्य इत्यादी) साठी प्रती विद्यार्थी रु.५,०००/- असे एकूण वार्षिक रु.२०,०००/- एवढे अनुदान आदिवासी विभागाकडून सैनिकी शाळांना दिले जाते. राज्यस्तरीय योजनेंतर्गत संबंधित प्रकल्प अधिकारी यांच्यामार्फत हे अनुदान उपलब्ध करून दिले जाते.

## उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती

**केंद्रीय शिष्यवृत्ती :** आदिवासी वैद्यकीय व अभियांत्रिक अभ्यासक्रमातील निवासी विद्यार्थ्यांना ७४० रुपये आणि अनिवासी विद्यार्थ्यांना दरमहा ३३० रुपये दिले जातात. तांत्रिक, आयुर्वेदिक, होमिओपॅथिक इ. शास्त्र अभ्यासक्रमातील निवासी विद्यार्थ्यांसाठी ५१० रुपये व अनिवासी विद्यार्थ्यांसाठी दरमहा ३३० रुपये दिले जातात. पदवीचे सामान्य अभ्यासक्रम, अभियांत्रिकी पदविका प्रमाणपत्र वास्तुकला अभ्यासक्रमासाठी निवासी विद्यार्थ्यांसाठी ३५५

## चांगल्या शिक्षणाची हमी

एकलव्य रेसिडेशियल (केंद्रपुरस्कृत पब्लिक स्कूल) अंतर्गत अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमातून शिक्षण मिळावे, त्यासाठी ६ वी ते १२ वी पर्यंत सीबीएसई अभ्यासक्रमाच्या इंग्रजी माध्यमाच्या १४ निवासी शाळा सुरू करण्यात आल्या आहेत. या आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना निवास, भोजन, गणवेश, आंथरूण, पांघरूण, पुस्तके व इतर लेखन साहित्य या सुविधा मोफत पुरवण्यात येतात.



**खासगी शाळेत प्रवेश :** राज्यातील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना इतर सर्वसाधारण विद्यार्थ्याप्रमाणे व त्यांच्यासोबत शहरातील इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळांमध्ये इयत्ता १ ली पासून इयत्ता १२ पर्यंत शिक्षण देण्याची योजना आदिवासी विभागातर्फे राबवण्यात येत आहे. आदिवासी विभागाच्या २१ एप्रिल, २०१५ च्या शासन निर्णयानुसार इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळांमध्ये दरवर्षी पाठवण्यात येत असलेल्या २५०० विद्यार्थ्यांच्या संख्येत १० पटीने वाढ करण्यात आली असून हा लक्ष्यांक आता दरवर्षी २५,००० विद्यार्थी इतका वाढवण्यात आला आहे. भोसला मिलिटरी स्कूल, पोद्दार स्कूल, नॅशनल पब्लिक स्कूल, विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट आदी शाळांमध्ये आता अनुसूचित जमातीतील विद्यार्थी आपल्या भविष्याचे धडे गिरवू लागले आहेत.

रुपये, अनिवासी विद्यार्थ्यांना १८५ रुपये एवढी रक्कम दिली जाते. ११ वी, १२ वी आणि पदवीच्या पहिल्या वर्षातील निवासी विद्यार्थ्यांसाठी दरमहा २३५ रुपये, अनिवासी विद्यार्थ्यांना १४० रुपये एवढा निर्वाह भत्ता देण्यात येतो.

**परदेशात शिक्षणाची संधी :** परदेशातील उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जमातीच्या १० विद्यार्थ्यांना पदवी आणि पदव्युत्तर शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्याची योजना शासनातर्फे राबवण्यात येत आहे. शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरणाऱ्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबाची वार्षिक उत्पन्न मर्यादा जास्तीत जास्त ६ लाख रुपयापर्यंत ठेवली आहे. या योजनेंतर्गत एम.बी.ए, वैद्यकीय अभ्यासक्रम, बी. टेक, विज्ञान, कृषी व इतर विषयांच्या अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येते.

## कौशल्य विकास

राष्ट्रीय कौशल्य विकास परिषदेंतर्गत कौशल्य विकास धोरणानुसार उत्पादन व प्रक्रिया, टेक्सटाइल्स, प्रोसेसिंग, ऑटोमोबाइल्स, रिटेल मार्केटिंग, माहिती तंत्रज्ञान (आय.टी), हॉस्पिटॅलिटी, मनुष्यबळ विकास, आरोग्य संवर्धन या क्षेत्रात स्थानिक गरजेनुसार प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले जातात. आदिवासी उमेदवार यांच्यात असलेले कौशल्य विकसित करणे व त्यांना रोजगार व स्वयंरोजगारास सक्षम करणे हा योजनेचा मुख्य उद्देश आहे.



## पोलीस व सैन्यदल भरतीपूर्व प्रशिक्षण

राज्यातील आदिवासी युवकांना राज्य पोलीस दल व लष्कर तथा तत्सम विविध सुरक्षा दलात संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने राज्यात ९ ठिकाणी पोलीस तथा सैन्यदल भरतीपूर्व केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. यामध्ये जव्हार, घोडेगाव, नाशिक, नंदुरबार, धारणी, राजूर, किनवट, चंद्रपूर, गडचिरोली या केंद्रांचा समावेश आहे. यात आदिवासी प्रशिक्षणार्थींना जेवण, राहणे, गणवेश, खेळाचे साहित्य, बूट मोजे, अंथरूण-पांघरूण इत्यादी सुविधा मोफत दिल्या जातात.

## विशेष साहाय्य

विशेष केंद्रीय साहाय्यातून अतिदुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासी बांधवांचे जीवनमान सुधारावे त्यांच्यासाठी रोजगार निर्मिती व्हावी, त्यांचे आर्थिक उत्पन्न वाढावे, यासाठी विशेष केंद्रीय साहाय्य निधीमधून क्षेत्रविकास, सिंचन, प्रशिक्षण, उत्पन्नवाढीच्या योजना राबवण्यात येतात. त्याचबरोबर सांस्कृतिक संवर्धनासाठी आदिवासी भागात २९ प्रकल्प कार्यालयामार्फत आदिवासींच्या पारंपरिक नृत्यस्पर्धा व हस्तकला प्रदर्शन यांचे आयोजन केले जाते.

## औद्योगिक प्रशिक्षण

राज्यातील ५६ आदिवासी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये नवीन व्यवसाय अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत. कमी मागणीचे व्यवसाय अभ्यासक्रम बंद करून त्याजागी जादा मागणीचे व्यवसाय अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत. आदिवासी आश्रमशाळेचे रूपांतर व्यावसायिक शिक्षण आश्रमशाळांमध्ये करण्यात आले आहेत. औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या नजीकच्या परिसरातील आश्रमशाळेमधील आदिवासी विद्यार्थ्यांसाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये ८ वी ते १० वी स्तरावर पूर्व व्यावसायिक शिक्षण देण्यात येते. १० वी नंतर या विद्यार्थ्यांसाठी व्यवसाय प्रशिक्षणांच्या संधी निर्माण केल्या जातात. औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील वसतिगृहात राहणाऱ्या व वसतिगृहाबाहेर राहणाऱ्या आदिवासी उमेदवारांना निर्वाह भत्ता दिला जातो. आदिवासी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये वसतिगृहाची सोय केली जाते. आदिवासी विद्यार्थ्यांसाठी पुस्तकपेढी विकसित केली जाते. व्यवसाय प्रशिक्षणाद्वारे आदिवासी महिलांचे सक्षमीकरण केले जाते. आदिवासी शिकाऊ उमेदवारांना निर्वाह भत्ता दिला जातो. बेरोजगार आदिवासी उमेदवारांसाठी मागेल त्याला व्यवसाय प्रशिक्षण दिले जाते.

## मोटार वाहन चालक प्रशिक्षण

महाराष्ट्र राज्यमार्ग परिवहन महामंडळ व इतर शासकीय/ निमशासकीय कार्यालयातील वाहनचालक पदांचा अनुसूचित जमातीचा अनुशेष भरण्यात येत आहे. त्यासाठी अशा उमेदवारांना वाहनचालकांचे प्रशिक्षण देऊन रोजगाराची संधी उपलब्ध करून दिली जात आहे. राज्यमार्ग परिवहन महामंडळ व आदिवासी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने हे मोफत प्रशिक्षण दिले जाते. प्रशिक्षणादरम्यान उमेदवारांना निवास, भोजन मोफत दिले जाते. इतर खर्चासाठी दरमहा रु.४५०/- विद्यावेतन दिले जाते. यासाठी उमेदवाराचे वय २३ ते २५, उंची किमान १६३ सें.मी. असावी, शिक्षण किमान इ.७ वी उत्तीर्ण व तो शारीरिक व मानसिकदृष्ट्या वाहनचालकाच्या कामाकरिता सक्षम असणे आवश्यक आहे. पांढरकवडा (जि.यवतमाळ) व गडचिरोली (जि.गडचिरोली) येथील दोन प्रशिक्षण केंद्रांवर प्रशिक्षण दिले जाते. अधिक माहितीसाठी संबंधित प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांच्याशी संपर्क साधता येईल.

**शासनामार्फत विविध योजना राबवण्यात येतात. या योजनांचा लाभ घेऊन अनेक व्यक्ती आपल्या जीवनात नवे चैतन्य फुलवत असतात. अशा काही चैतन्यदायी आणि प्रेरणादायी यशकथा..**

# यशाची चैतन्यदायी प्रेरणा

## स्वयंसिद्ध



उमेश कामडी

सरकारी नोकरी प्रत्येकाला मिळू शकत नाही. तशी परिस्थिती आज राहिली नाही. या नोकऱ्यांमध्ये स्पर्धा निर्माण झाली आहे. मात्र, तुमच्याकडे उत्तम शिक्षण असेल, काही करण्याची धडपड असेल तर विविध शासकीय योजना तुमची वाट पाहत आहेत.. हे आत्मविश्वासयुक्त वक्तव्य आहे. भद्रावतीच्या उमेश श्रावण कामडीचे. आजच्या पिढीला दिलेला हा त्याचा गुरुमंत्र आहे.

उमेश कामडी याला स्पर्धापरीक्षेची आवड होती. त्याचा अभ्यासही सुरू होता. तथापि, यश आले नाही. मात्र अभ्यासाच्या गोडीतून उमेशने आपले जीवन उभे केले. स्पर्धा परीक्षा किंवा अर्ज करण्यासाठी विद्यार्थीदशेत नेट कॅफेचा, संगणक यंत्रणेचा संपर्क अनिवार्य आहे. उमेशने अनेकांना नोकरीचा मार्ग दाखवणाऱ्या कॉम्प्युटर इन्स्टिट्यूटलाच आपल्या यशाचा महामार्ग बनवले. परीक्षा देतादेताच त्याने हिमतीने एका कॉम्प्युटर इन्स्टिट्यूटची सुरुवात केली. या इन्स्टिट्यूटची वाढ व्हावी, त्यातून अधिक आर्थिक स्थैर्य मिळावे, यासाठी त्याची धडपड सुरू होती. इतरांना मार्गदर्शन करतानाच व्यवसायात बरकत यावी अशी महत्त्वाकांक्षा बळावली आणि सुरू झाला एक यशाचा प्रवास. उमेशने यासाठी मदत घेतली ती अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या व्यक्तिगत कर्ज व्याज परतावा योजनेची. यासाठी त्याला मदत झाली जिल्हा रोजगार केंद्रातील या ठिकाणच्या समन्वयक अमरीन मॅडम यांची. त्यांचे नाव तो आदराने घेतो. त्यांनी सांगितल्याप्रमाणे 'महास्वयंम पोर्टल'वर लॉगिन करून संपूर्ण आवश्यक दस्तवेज त्याने अपलोड केले. या योजनेतून प्रथमता कर्ज मिळण्यासाठी त्याने अर्ज केला. कर्ज त्वरित उपलब्ध झाल्यामुळे व्यवसाय वृद्धिंगत करण्यास त्याला संधी प्राप्त झाली. पैसा हाती आल्याने भद्रावतीमध्येच आपल्या आधीच्या कॉम्प्युटर इन्स्टिट्यूटला जोड देण्यासाठी त्याने नवीन कॉम्प्युटर इन्स्टिट्यूट सुरू केले. यासाठी त्याने शासनाच्या एका योजनेची मदत घेतली. शासनाने २०१५ मध्ये सेवा हमी कायदा आणला. सामान्य नागरिकांना आवश्यक असणारे दस्तवेज ताबडतोब मिळावे व त्यांच्या दैनंदिन आवश्यक कागदपत्रांची पूर्तता अगदी मर्यादित वेळेत व्हावी, यासाठी या सेवा हमी कायद्याची अंमलबजावणी २०१५ मध्ये सुरू केली. स्पर्धा परीक्षा आणि या परीक्षेला स्वत:च्या परिसरातील मुले बसावी यासाठी कॉम्प्युटर इन्स्टिट्यूट चालवणाऱ्या उमेशने सेवा हक्क कायद्याला आपल्या रोजगाराचे नवे साधन बनवले. शिव कॉम्प्युटरच्या जोडीला केंद्र शासन पुरस्कृत सेवा केंद्र आणि राज्य सरकार द्वारा चालवण्यात येणारी महा ऑनलाइन सेतू केंद्राची परवानगी मिळवली.




व्यवसाय वृद्धिंगत करण्यास त्याला संधी प्राप्त झाली. या कर्जातून त्याने सेवा व्यवसाय केंद्रासाठी कॉम्प्युटर, स्कॅनर व अन्य आवश्यक वस्तूंची खरेदी केली. नेट कॅफेसोबतच 'सरकार सेतू केंद्र' सुरू केले.

आपली यशाची पायवाट उलगडताना उमेश सांगतो, 'अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाची व्यक्तिगत कर्ज व्याज परतावा योजना सर्वांसाठी खुली आहे. योग्य प्रस्ताव सादर करा आणि योग्य व्यवसायात गुंतवणूक करा. आपोआपच यशाचा मार्ग सापडेल.' उमेशला एखाद्या सरकारी नोकरीमधील कर्मचाऱ्यांच्या मिळकती प्रमाणे रोजगार मिळत असल्याचा आनंद आहे.

## स्वप्न साकारले दुग्धव्यवसायाचे

'नोकरीचा मार्ग पत्करण्यापेक्षा स्वयंरोजगार करावा आणि आपल्या गावीच राहून कुटुंबांची जबाबदारी सांभाळावी, असे आधीपासूनच माझ्या मनात होते. माझी ही मनीषा अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या माध्यमातून पूर्ण झाली,' असे वैभव कळंबे यांनी सांगितले.

वैभव कळंबे हे तिवसा तालुक्यातील निंभोऱ्यानजीकच्या उंबरखेड या गावाचे रहिवासी आहेत. वैभवचे वडील शेतकरी. घरी केवळ दोन

एकर शेती. आईवडिलांनी कष्ट करून वैभवला शिकवले. वैभवने तंत्रनिकेतनमधून मेकॅनिकल अभियांत्रिकीची पदविका मिळवली. त्यानंतर नागपूरला महिंद्रा ॲण्ड महिंद्रामध्ये दोन वर्षे नोकरी केली. मात्र, तिथला करार संपल्यानंतर पुन्हा नोकरीचा शोध घ्यायचा, दुसऱ्या शहरात जायचे हे करण्यापेक्षा स्वयंरोजगार करावा, असा विचार वैभवच्या मनात आला. त्यानंतर ते गावी परतले.

उंबरखेड हे छोटे गाव आहे. शेती हाच तेथील मुख्य व्यवसाय. अशा परिस्थितीत कुठलातरी पूरक व्यवसाय करायचाच जेणेकरून, स्वत:च्या गावात व कुटुंबात राहता येईल आणि आर्थिक प्रगतीही साधता येईल, असा निर्धार वैभवने केला. कुटुंबीयांनीही वैभवला त्यासाठी पाठिंबा दिला.

गावातच राहून चांगले उत्पन्न मिळू शकेल, असा दुग्धव्यवसाय करण्याचा मार्ग वैभवने निवडला. वैभवच्या कुटुंबाकडे एक गाय होती. त्यातून थोडेफार उत्पन्न मिळत असे. त्यांनी आणखी काही गायी विकत

## जिद्दीला योजनेची चाके !



शिक्षण कमी, संधी कमी आणि ग्रामीण पार्श्वभूमी, यामुळे सामान्यतः अनेक जण हताश होतात. अशा परिस्थितीत जिथे सुशिक्षितांना नोकऱ्या नाहीत तिथे आपल्याला काय नोकरी मिळेल असा विचार करून हताशा आणखीन वाढते. मात्र काही बहाद्दर अशा परिस्थितीत जिद्द सोडत नाहीत. अशाच एका जिद्दी तरुणाने आपल्या यशाची कथा चंद्रपूर जिल्ह्यातील चंदनखेडा परिसरात रचली आहे. या तरुणाचे नाव आहे हेमराज बालाजी उरकांडे. आता हा तरुण या भागातील अशिक्षित, अल्पशिक्षित व बेरोजगार तरुणांचा आयकॉन झाला आहे. आपल्याभोवती असणाऱ्या नकारात्मक बाबींवर रडत बसण्यापेक्षा, जिद्दीने व जोमाने कामी लागल्यानंतर काय होतं याचे उत्तर हेमराजचा ई–रिक्षा देतो....

शासनाने मागास घटकांसाठी असणाऱ्या योजनांप्रमाणेच खुल्या प्रवर्गात मोडणाऱ्या या जातीतील तरुणांसाठी अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाची स्थापना केली आहे. आता या महामंडळातून खुल्या प्रवर्गातील अनेक तरुणांना रोजगारासाठी कर्ज मिळत आहे. हेमराज या तरुणाची यशकथादेखील अनेकांसाठी प्रेरणादायी आहे. शिक्षण न झाल्यामुळे नोकरी मिळणार नाही हे हेमराजला माहिती होतं. शेतीतूनही काही होत नाही याची शाश्वती होती. मात्र यासोबतच आपण जिद्दीने काही केल्यास मागे येणार नाही याबाबत त्याचा स्वतःवर विश्वास होता. जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र चंद्रपूर या ठिकाणी चौकशी करून रोजगार करता येईल का



हेमराज उरकांडे

याबाबतची माहिती हेमराजने घेतली. सुरुवातीपासून व्यवसायाकडे कल असणाऱ्या हेमराजकडे एका धंद्याबाबत होमवर्क चांगले होते. त्याने यापूर्वी सायकलवर गूळपट्टी विकण्याचे काम केले होते. मात्र सायकलला इंजिनची साथ मिळाली तर बरे होईल असे त्याला नेहमी वाटायचे... कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता केंद्रामध्ये नेमका त्या स्वप्नाला चाके लावण्यासाठी जणू तो आला होता. या ठिकाणी शासनाच्या योजनेमुळे त्याच्या महत्त्वाकांक्षेला बळ मिळाले. महामंडळात मिळणाऱ्या कर्जाबाबतची माहिती मिळाली. जिल्हा समन्वयकाच्या मार्गदर्शनामुळे आणि बँकेच्या सहकार्यामुळे महामंडळ कर्ज परतावा योजनेतून दीड लाख रुपयांचे कर्ज हेमराजला मिळाले. आणि मग या स्वप्नाला विनापेट्रोलच्या ई –रिक्षाचे पंख फुटले. आता हेमराज सहा गावांमध्ये फिरून व्यवसाय करतो. गूळपट्टीचा व्यवसाय साखरपट्टी व अन्य काही जिन्नस विकण्यापर्यंत व्यवसाय वाढत गेला... आणखीही वाढणार आहे. ही बरकत आली हेमराजच्या लढाऊ बाण्यामुळे. हेमराजने जी ही हिंमत दाखवली यासाठी त्याचा नुकताच १५ जुलैला जागतिक युवा कौशल्य दिनादिवशी सपत्नीक सत्कार झाला. हेमराज आता खूश आहे. त्याचा व्यवसाय शंभर टक्के पर्यावरणपूरक आहे. त्याच्या शेंगदाण्याची गुळपट्टी दर्जेदार आहे. हेमराज चंदनखेडा आणि परिसरातील लोकांचा सध्या आयकॉन झाला आहे.

**– प्रवीण टाके**
जिल्हा माहिती अधिकारी, चंद्रपूर



वैभव कळंबे

घेण्याचे ठरवले. मात्र, त्यासाठी पैशांची विवंचना होती. दरम्यान, वैभवला दूरदर्शनच्या माध्यमातून अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या योजनांची माहिती मिळाली. त्यानंतर त्याने महामंडळाचे कार्यालय गाठले. जिल्हा समन्वयक सोनाली मोटघरे यांची भेट घेतली. श्रीमती मोटघरे यांनी वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेची माहिती दिली. या व्याज परताव्याची तरतूद वैभवला दिलासा देणारी ठरली. त्याने महामंडळाच्या माध्यमातून कुऱ्हा येथील भारतीय स्टेट बँकेकडे संपर्क साधला. वैभवची इच्छा आणि प्रयत्न जाणून घेतल्यावर बँकेने त्याला एक लाख रुपयांचे कर्ज मंजूर केले. या निधीतून वैभवने तीन गायी विकत घेतल्या. घरची एक गाय आणि खरेदी केलेल्या तीन गायी अशा पूर्णवेळ दुग्धव्यवसायाचे भांडवल निर्माण झाल्यावर कुटुंबीयांनाही दिलासा मिळाला.

उंबरखेडजवळच वरखेडला जिल्हा प्रशासनाच्या प्रोत्साहनातून साकारलेले मदर डेअरीचे दूध संकलन केंद्र आहे. तिथे वैभव नियमितपणे दूध विक्री करतो. या व्यवसायामुळे त्याला खात्रीशीर उत्पन्न व आर्थिक स्थैर्य मिळाले आहे.

**– हर्षवर्धन पवार,**
जिल्हा माहिती कार्यालय, अमरावती

## पहिले मराठा वसतिगृह कोल्हापुरात!

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या विचारांचा वसा आणि वारसा जोपासून वाटचाल करणाऱ्या पुरोगामी कोल्हापूर जिल्ह्यात शासनाने राज्यातील मराठा समाजातील विद्यार्थ्यांसाठी पहिले डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह सुरू केले आहे. यासाठी जिल्ह्याचे महसूलमंत्री चंद्रकांत पाटील यांनी पुढाकार घेतला. यापुढे राज्यात ठिकठिकाणी मराठा विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे उभी राहतील.

७२ विद्यार्थी क्षमता असणारे वसतिगृह कोल्हापुरात कार्यान्वित झाले आहे. आजमितीस या वसतिगृहात १९ विद्यार्थी वास्तव्यास आहेत. या वसतिगृहाचे प्रवेश व्यवस्थापन सध्या शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर यांच्याकडे असून सध्या रेक्टर म्हणून निवृत्त कॅप्टन महादेव यादव हे सेवाभावी वृत्तीने काम करीत आहेत. त्यामुळे या वसतिगृहातील शिस्त आणि शांतता वाखाणण्यासारखीच आहे.

मराठा समाजाच्या उन्नतीसाठी शासनाने ज्या काही योजना हाती घेतल्या आहेत, त्यामध्ये प्रामुख्याने जिल्हास्तरावर या समाजातील विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे उभारणे तसेच या विद्यार्थ्यांसाठी निम्मे शुल्क भरून प्रवेश देणे आणि मराठा समाजातील तरुण–तरुणींसाठी अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्यावतीने बँकाकडील १० लाखापर्यंतच्या कर्जाची हमी घेऊन १० लाखापर्यंतचे व्याज शासनामार्फत भरणे अशा पूरक योजनावर भर देऊन त्यांची प्रभावीपणे अमंलबजावणी करण्यास प्राधान्य दिले आहे.

विद्यार्थ्यांचा प्रतिसाद पाहून ही व्यवस्था १०० विद्यार्थ्यांपर्यंत वाढवण्याचा मानस आहे. सदरबाजार परिसरातील राजर्षी शाहू कॉलेजजवळ शासकीय निवासस्थान परिसरात नेटके आणि दर्जेदार सुविधायुक्त वसतिगृह अवघ्या दीड महिन्यात विकसित केले आहे. नजिकच्या काळात कोल्हापुरात मुलींसाठीही स्वतंत्र वसतिगृह विकसित करण्यात येणार आहे. मराठा समाजातील विद्यार्थ्यांसाठी सर्व जिल्ह्यात वसतिगृहे उभारण्याचा निर्णय शासनाने घेतला असून येत्या महिन्याभरात राज्यातील १० जिल्ह्यांत अशी वसतिगृहे सुरू होतील. पुणे येथे लवकरच मुलींचे वसतिगृह सुरू होत असून, महिन्याभरात मुलांचेही वसतिगृह सुरू करण्यात येईल.

शासकीय यंत्रणा आणि लोकसहभागातून हे वसतिगृह सुरू करण्यात आले. सदरबाजार परिसरात शासकीय निवासस्थाने होती. कालांतराने वापरात नसल्याने ही निवासस्थाने बंद पडली आणि या इमारती मोडकळीस आल्या, यामुळे या परिसराला अवकळा आली होती. सध्या रिकाम्या असलेल्या या शासकीय इमारतींमध्ये वसतिगृहे सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयानुसार या बाजार परिसरातील रिकाम्या असलेल्या या निवासस्थानातील तीन मजली इमारत प्रशासनाने ताब्यात घेऊन, त्या ठिकाणी वसतिगृह सुरू करण्यात आले. या परिसराची सार्वजनिक बांधकाम विभागाच्यावतीने स्वच्छता आणि इमारतींची देखरेख ठेवण्यात येऊन, शासन यंत्रणा आणि लोकसहभागातून या इमारतीची दुरुस्ती करण्यात आली.



**वसतिगृहामुळे राहण्याची सोय झाली... विद्यार्थी**

गगनबावडा तालुक्यातील खेरिवडे गावचा विद्यार्थी नितीन बाळू पाटील हा कोल्हापुरातील डॉ. पंजाबराव देशमुख मराठा विद्यार्थी वसतिगृहामध्ये सध्या राहत असून शासनाने मराठा वसतिगृह सुरू केल्याने आपली कोल्हापूरसारख्या शहरामध्ये राहण्याची सोय झाल्याबद्दल समाधान व्यक्त केले आहे. या वसतिगृहात विद्यार्थ्यांसाठी देण्यात येत असलेल्या सुविधा उच्च दर्जाच्या असून शिस्त आणि शांततेमुळे मनापासून अभ्यासही होत असल्याचे मत त्याने व्यक्त केले. शाहूवाडी तालुक्यातील कापशी गावचा नितीन कदम या विद्यार्थ्यांनेही या वसतिगृहाबद्दल शासनास धन्यवाद दिले आहेत. सर्वच विद्यार्थी या वसतिगृहामुळे समाधान व्यक्त करत आहेत.

या वसतिगृहाची सुरुवात कोल्हापूर येथे ३ ऑगस्ट २०१८ पासून करण्यात आली. या वसतिगृहात विद्यार्थ्यांना पिण्याचे शुद्ध पाणी, आंघोळीसाठी गरम पाणी, नव्या कॉट व गाद्या, बादल्या-मग, २४ तास सिक्युरिटी आदी सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. या वसतिगृह इमारतीमध्ये तळमजल्यावर पार्किंग करण्यात आले असून सर्व खोल्यांना आकर्षक फरशा, कपाटे, शौचालय, बाथरूम अशा आवश्यक गोष्टी उपलब्ध करून दिल्या आहेत.

## स्वप्न सत्य झाले..



रामकृष्ण घाडगे

राज्य शासनाने आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी ईबीसी सवलत योजनेची उत्पन्न मर्यादा १ लाखावरून थेट ८ लाख केल्याने गोरगरीब विद्यार्थ्यांना शिक्षण घेणे शक्य झाले आहे. राजर्षी शाहू महाराज शिक्षण शुल्क योजनेचा लाभ घेऊन रामकृष्ण ज्ञानदेव घाडगे या विद्यार्थ्यांसारख्या हजारो विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्याची ऐपत नसतानाही शासनाच्या या योजनेमुळेच शिक्षण घेणे शक्य झाले आहे.

येथील महाराणी ताराबाई अध्यापक विद्यालयामध्ये बी.एड.चा शिक्षण घेणारा सोलापूर जिल्ह्याच्या माढा तालुक्यातील वरवडे गावचा विद्यार्थी रामकृष्ण ज्ञानदेव घाडगे याने, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क योजनेमुळेच आपल्यासारख्या गरीब शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्याला बी.एड. शिक्षण घेणे शक्य झाल्याचे मत व्यक्त केले. अन्यथा गावातच शेती किंवा रोजगार अथवा गुरे राखत बसावे लागले असते. या योजनेच्या लाभासाठी उत्पन्न मर्यादा वाढवल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना लाभ होत असल्याचे त्याने निदर्शनास आणले. कोल्हापूर विभागातील कोल्हापूर, सांगली, सातारा या जिल्ह्यातील जवळपास १७ हजार विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात ६ कोटी ८२ लाखांवर शिष्यवृत्ती जमा करण्यात आल्याची माहिती शिक्षण सहसंचालक डॉ. अजय साळी यांनी दिली.

माढा तालुक्यातील वरवडे गावात शेतकरी कुटुंबात जन्माला आलेल्या रामकृष्ण ज्ञानदेव घाडगे याने आपले पदवीपर्यंतचे शिक्षण आता पूर्ण केले आहे. वडील ज्ञानदेव घाडगे हे शेतकरी, वडिलोपार्जित ५ एकर जिरायत शेती, तीही पावसावर अवलंबून! काबाडकष्ट करून शेतीतून कुटुंबाचा चरितार्थ चालवताना श्री. घाडगे यांना तारेवरची कसरत करावी लागायची. पण शासनाने ईबीसी सवलतीची मर्यादा १ लाखावरून थेट ८ लाख केल्याने उच्च शिक्षण घेणे आता सर्वसामान्यांना शक्य झाले आहे. पदवीपर्यंतचे शिक्षण घेऊन बी.एड.चे शिक्षण घेत आहे. नवी पिढी घडवण्यात योगदान देण्याचा निर्धार करून रामकृष्ण ज्ञानदेव घाडगे कोल्हापूरात दाखल झाला. पण बी.एड.चे शुल्क पाहून थोडा चिंताग्रस्त झाला. शासनामार्फत राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क योजनेद्वारे शुल्कामध्ये सवलत मिळत असल्यामुळे, त्याची चिंता दूर झाली आणि कोल्हापुरातील महाराणी ताराबाई अध्यापक विद्यालयामध्ये बी.एड.चे शिक्षण घेण्याची संधी त्याला उपलब्ध झाली.

निसर्गाच्या दुष्टचक्रात अडकलेल्या शेतीमधून कुटुंबाच्या पोटाला पुरेल एवढंही उत्पन्न मिळत नव्हते, उच्च शिक्षणाचे शुल्कही

## पुढे शिकण्याची संधी



आरती यादव

'मी शासकीय तंत्रनिकेत, कराड येथे टीवाय कॉम्प्युटर या वर्षात शिकत आहे. डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेंतर्गत २०१७-१८ मध्ये माझ्या बँक खात्यात २० हजार रुपये जमा झाले आहेत. मला १ भाऊ व १ बहीण असून त्यांचेही शिक्षण सुरु आहे. माझी घरची परिस्थिती तशी हलाखीची असल्यामुळे पुढील शिक्षण घेता येईल की नाही याबाबत मला शंका होती. मात्र मिळालेल्या शिष्यवृत्तीमुळे पुढे शिकण्याची संधी मिळाली.'

**- आरती संजय यादव, शिरंबे (ता. कोरेगाव जि. सातारा)**

'राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती शिष्यवृत्ती योजना व डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेचा मला लाभ मिळाला आहे.

मी एस.वाय.मॅकेनिकल या वर्गात शिकत आहे. माझ्या वडिलांचा शेती हाच व्यवसाय. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती शिष्यवृत्ती योजना व डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता या दोन्ही योजनेचा लाभ मिळाल्याने पुढील शिक्षण घेता येत आहे.'

**- गणेश शंकर सावंत, भिवडी (ता. कडेगाव जि. सांगली)**

परवडणारी नसल्याने शिक्षण अर्धवट राहते की काय? ही भीती मनात डोकावत होती. पण या योजनेने माझ्यासारख्या गरीब शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांस बीएडचे शिक्षण घेण्याची संधी मिळाली. बी.एड.च्या पहिल्या वर्षीची जवळपास ९ हजार ९० रुपयांचे शुल्क शासनाने माफ केले, तर या वर्षीचे शुल्क शासनामार्फत माफ झाल्याने मी भविष्यात शिक्षक बनणार ही उमेद आणि उर्मी मनात ठेवून सातत्यपूर्वक अभ्यास करून उत्तमोत्तम गुण पटकावले.

या योजनेमुळे गोरगरीब विद्यार्थ्यांना शिक्षणाचं बळ मिळत असून उच्च शिक्षण घेणे सहज शक्य झाल्याची प्रतिक्रिया रामकृष्ण घाडगे यांनी दिली आहे. या योजनेचा लाभ झाल्याबद्दल श्री. घाडगे यांनी शासनास धन्यवाद दिले आहेत. माझ्यासारख्या कित्येक विद्यार्थ्यांना या योजनेमुळे उच्च शिक्षणाची दारे खुली झाली आहेत. या योजनेमुळे आम्ही मोठ्या हुद्द्यावर जाण्याची स्वप्ने सत्यात उतरवू शकू, असा आत्मविश्वास त्याने व्यक्त केला.

**– एस. आर. माने,**
जिल्हा माहिती अधिकारी, कोल्हापूर

## आर्थिक सुबत्ता




सुनील मेश्राम



सुधाकर बोधनकर

अण्णासाहेब पाटील व्याज परतावा योजनेत अश्विन शेंडे ४० हजार, पवन खांडेकर ४ लाख ९० हजार, चेतन भैरम ९ लाख ९७ हजार, मार्तंड टेंभुरने २ लाख, सुनील मेश्राम ४५ हजार, विजय पखमोडे १ लाख ५० हजार, सुधाकर बोधनकर ४ लाख अनुपकुमार शिंगाडे २ लाख ५० हजार व पंकज मुंदडा यांनी ७ लाख ५० रुपये कर्ज मिळवून आपला उद्योग व्यवसाय सुरू केला आहे. यात कपडे व्यवसाय, स्पर्धा परीक्षा वर्ग, पतंजली स्टोर्स, धान्य व्यापार, झेरॉस सेंटर, स्टेशनरी दुकान, फॅब्रिकेशन वर्क आदी व्यवसायाचा समावेश आहे.

आर्थिकदृष्ट्या मागास घटकातील उद्योजक बनू इच्छिणाऱ्या व तशी क्षमता असलेल्या तरुण वर्गाला आर्थिक साहाय्य पुरवण्याच्या दृष्टीने अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळातर्फे वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना राबवण्यात येत असून या योजनेचा लाभ भंडारा जिल्ह्यातील अनेक तरुणांना मिळाला आहे. या होतकरू तरुणांना ३८ लाख १७ हजार ६६१ रुपयांचे कर्ज मंजूर झाले आहे. या कर्जाच्या व्याज परताव्याची रक्कम शासन भरणार आहे.

या योजनेत उद्योग व्यवसायासाठी १० लाखापर्यंत कर्ज देण्याची सोय आहे. या कर्जाचे व्याज शासन भरते. लाभार्थ्यांच्या कर्जाची मुद्दल व व्याजाचा पहिला हप्ता प्रोत्साहन म्हणून शासन भरणार आहे. दुसऱ्या हप्त्यापासून व्याजाचा परतावा देण्याची तरतूद या योजनेत आहे.

या योजनेमुळे झेरॉक्सचा माझा व्यवसाय उत्तमरीत्या सुरू आहे. अधिकचे चार पैसे मिळत असल्यामुळे आर्थिक प्रगतीला हातभार लागत आहे. बेरोजगारांच्या सक्षमीकरणासाठी ही योजना जीवनदायी ठरत आहे. अशी प्रतिक्रिया सुनील मेश्राम याने व्यक्त केली आहे.

■ माझ्यासारख्या सर्वसाधारण बेरोजगार व्यक्तीला व्यवसायासाठी आर्थिक मदत या योजनेतून मिळाली. यामुळे मला माझा फॅब्रिकेशनचा व्यवसाय करणे सोयीचे झाले. कर्जाचे व्याज शासन भरत असल्यामुळे मुळ रक्कम परतफेड करणे सुकर झाले आहे. ही योजना माझ्या कुटुंबासाठी आर्थिक विकास घेऊन आल्याची प्रतिक्रिया सुधाकर बोधनकर यांनी व्यक्त केली आहे.

**– रवी गिते,**
जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

## स्वप्न साकार

आर्थिकदृष्ट्या मागास घटकातील विद्यार्थ्यांना शिक्षण घेणे सोयीचे व्हावे यासाठी शासनाने २०१६ मध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना सुरू केली.

या योजनेचा लाभ उच्च व तंत्रशिक्षणासोबतच वैद्यकीय व औषधी द्रव्य, अभियांत्रिकी, कृषी, पशुसंवर्धन मत्स्यव्यवसायाशी संबंधित अभ्यासक्रमासोबतच विविध ६०५ अभ्यासक्रमासाठी लागू आहे.

वर्धा जिल्ह्यात आर्थिक परिस्थिती नाजूक असलेल्या होतकरू विद्यार्थ्यांना याचा फायदा होत आहे. जिल्ह्यात २०१७–१८ मध्ये २१२ विद्यार्थ्यांना राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजनेचा लाभ मिळाला आहे. या योजनेमुळे अनेक गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला दिशा मिळाली. अनेक होतकरू विद्यार्थी याचा लाभ घेऊन उज्वल भविष्य घडवतील. लाभ मिळालेल्या काही विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रिया :

**शुभम जुगलकिशोर शुक्ला :** 'मी बी.ए. द्वितीय वर्षाला यशवंत महाविद्यालयात शिकत आहे. माझे वडील पांडित्याचे काम करतात. वर्षाकाठी ७० हजार रुपये वार्षिक उत्पन्न मिळत. त्यामुळे माझ्या घरची परिस्थिती अतिशय हलाखीची आहे. मला राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजनेचा लाभ मिळाला आहे. शिष्यवृत्ती योजनेचा लाभ मिळाल्यामुळे मला पुढील शिक्षण घेणे शक्य झाले आहे.'





**मोहम्मद नासीर :** 'माझे वडील भंगार विकण्याचा व्यवसाय करतात. घरची परिस्थिती गरिबीची असल्यामुळे मीसुद्धा कॉलेज संपल्यानंतर संध्याकाळी एका हॉटेलमध्ये काम करतो. मी बी.ए. तृतीय वर्षाला शिकत असून माझा शिक्षणाचा खर्च राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजनेतून शक्य झाला आहे.'

**– मनीषा सावळे,**
जिल्हा माहिती अधिकारी, वर्धा

## संधी आणि आधार

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत कृषी संलग्न व पारंपरिक उपक्रमांसाठी, लघु व मध्यम उद्योगांमधील उत्पादन व व्यापार व विक्री, सेवा क्षेत्रासाठी या तीन योजना राबवण्यात येत आहेत.

वैयक्तिक कर्ज परतावा योजनेत १० ऑगस्ट २०१८ पर्यंत सांगली जिल्ह्यात एक हजार तिनशे बावन्न प्रकरणे शासनाने मंजूर केली आहेत. त्यापैकी २८ प्रकरणांत लाभार्थींना कर्ज वितरण करण्यात आले आहेत. या माध्यमातून हे महामंडळ तरुण, होतकरू, कष्टाळू, सुशिक्षित बेरोजगारांसाठी आशेचा नवीन किरण बनत असल्याची प्रतिक्रिया जिल्हा समन्वयक सर्जेराव पाटील यांनी दिली आहे.

नोकरी मिळत नाही, म्हणून हताश झालेल्या तरुणाईला स्वयंरोजगारासाठी प्रेरित करून, त्यांना आर्थिक साहाय्य या महामंडळामार्फत करण्यात येत आहे. त्यातून अनेकांनी उद्योग – व्यवसाय सुरू केले आहेत. दोन वर्षांपूर्वी कोणता व्यवसाय करायचा, असा प्रश्न पडलेल्या पलूस तालुक्यातील खंडोबाची वाडी या लहानशा गावातील सुनीता बाबर यांनी पोल्ट्री (कुक्कुट पालन) व्यवसायाची माहिती घेतली.

सुरुवातीला घरामध्ये असलेल्या जागेत २०० ते ५०० पक्षी आणून त्यांचे संगोपन केले. हा व्यवसाय चांगला असल्याचे निदर्शनास येताच, मोठ्या प्रमाणात करण्याचे ठरवले. पण, जामीन नसल्यामुळे बँका कर्ज द्यायला तयार होईना. अशा वेळी त्यांनी


सुनीता बाबर

आपल्या शेजारी १० गुंठे जागा भाडेतत्त्वावर घेतली व या महामंडळाच्या माध्यमातून तीन लाख ७५ हजार रुपयांचे आयडीबीआय बँकेचे कर्ज त्यांना मिळाले. या पैशातून २०० x २० चौरस फुटाची शेड उभी केली आणि पोल्ट्री व्यवसायास सुरुवात केली. या व्यवसायातून दरमहा ८ ते १० हजार रुपयांचा त्यांना निव्वळ नफा होतो. सुनीता बाबर व त्यांचे पती दोघे मिळून हा व्यवसाय करतात. यापुढे १० हजार पक्षिपालनाचे त्यांचे उद्दिष्ट आहे.

## सुरभी वडापाव



संपत चव्हाण

तासगाव तालुक्यातील सिद्धेवाडी येथील संपत चव्हाण हे उद्योगाच्या शोधात होते. घरची परिस्थिती बेताची होती. जमीन सात ते आठ एकर होती. पण पाणी नसल्यामुळे शेती करणे अवघड होते. त्यामुळे तासगाव येथे त्यांनी छोट्या जागेत सुरभी वडापाव या व्यवसायाची सुरुवात केली. या व्यवसायात जम बसल्यामुळे त्यांना तो वाढवण्यासाठी भांडवल आवश्यक होते. तेव्हाच त्यांना अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या योजनेची माहिती मिळाली. महामंडळामार्फत त्यांना दोन दिवसात अडीच लाख रुपयांचे कर्ज मिळाले. या भांडवलावर त्यांनी व्यवसाय वाढवला. कर्जाचे व्याजही शासनामार्फत भरण्यात येत असल्याने त्यांना फार मोठी मदत झाली आहे.

**– वर्षा पाटोळे,**
जिल्हा माहिती अधिकारी, सांगली

## कौशल्य विकास

आर्थिकदृष्ट्या मागास घटकातील उद्योजक बनू इच्छिणाऱ्या व तशी क्षमता असलेल्या तरुणांना आर्थिक साहाय्य पुरवण्याच्या

## आदी एन्टरप्राईजेस

मार्केटिंग आणि सेल्स या विषयात एमबीए पर्यंत शिक्षण घेतल्यानंतर स्वत:चा उद्योग किंवा व्यवसाय करण्याची इच्छा दिनेश मांगलेकरला होती पण आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने हे त्याला जमले नाही. त्यामुळे घरची आर्थिक परिस्थिती पाहता शिक्षणासोबत नोकरी हा दुहेरी संगम साधावा लागला. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर नोकरीतून मिळाणाऱ्या पैशांची जुळवाजुळव करत



दिनेश मांगलेकर

मार्च २०१७ साली 'आदी एन्टरप्राईजेस' नावाने व्यवसाय सुरू केला. त्यातून खाद्य पदार्थांचे वितरण करणाऱ्या कंपन्यांना सहकार्य करण्याचे काम सुरू केले. हे काम करताना भांडवलाची कमतरता भासत होती. काही मित्रांनी त्यांना छत्रपती राजाराम महाराज उद्योजकता व कौशल्य विकास अभियानाची माहिती दिली.

युवा उद्योजकांना या अभियानाच्या माध्यमातून कशा पद्धतीने अगदी सुलभतेने कर्ज उपलब्ध करून देण्यात येते, याची माहिती घेतल्यावर कर्ज प्राप्तीसाठी अर्ज सादर केला आणि काही दिवसातच दिनेशला ५ लाख रुपयांचे कर्ज मंजूर झाले. या अभियानातून मिळालेल्या कर्जाच्या रकमेतून मी विविध कंपन्यांच्या खाद्यपदार्थांचे वितरणाची प्रक्रिया सुलभतेने सुरू झाली आहे.

**– अनिल गडेकर,**
जिल्हा माहिती अधिकारी, नागपूर

दृष्टीने छत्रपती राजाराम महाराज उद्योजकता व कौशल्य विकास अभियानांतर्गत अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळातर्फे तीन योजना राबवण्यात येत आहेत.

या विविध योजनांचा लाभ घेऊन अनेक तरुण यशस्वी उद्योजक बनत आहेत. नागपूर विभागात अनेक युवकांनी या योजनांचा लाभ घेऊन व्यवसाय सुरू केले आहेत तर काहींनी व्यवसाय विस्तारले आहेत.



पवन खांडेकर

आधुनिक युग हे स्पर्धेचे असून सर्वच क्षेत्रात त्याला पर्याय नाही. नोकऱ्यांसाठी स्पर्धा परीक्षा द्याव्या लागतात. भंडारा जिल्ह्यातील लाखनी येथील पवन खांडेकर यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा देता याव्यात व या संदर्भातील अन्य सुविधांचाही लाभ देण्यासाठी, युनिक स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राची निर्मिती लाखनी येथे केली. या केंद्राच्या उभारणीसाठी भांडवलाची आवश्यकता होती. श्री. खांडेकर यांना अण्णासाहेब महामंडळाच्या वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेची माहिती मिळाली. विदर्भ कोकण ग्रामीण बॅंकेने त्यांना कर्ज उपलब्ध करून दिले. यातून या स्पर्धा परीक्षा केंद्राच्या उभारणीसाठी आवश्यक साधने त्यांनी खरेदी केली. व स्पर्धा परीक्षा केंद्राची उभारणी केली. आज अनेक विद्यार्थी या सुविधांचा लाभ घेत आहेत.

**– केशव करंदीकर,**
विभागीय माहिती केंद्र, नागपूर

## इंजिनिअर झालो...

प्रतीक कांताराव पोटे हा औरंगाबाद जिल्ह्यातील शंकरपूरचा. आजोबा रघुनाथ, वडील शंकर व त्यांचे तीन भाऊ असे त्याचे एकत्रित १९ जणांचे संयुक्त कुटुंब. वडिलोपार्जित ४ एकर शेती, औरंगाबाद येथील एमआयडीसीमध्ये कुटुंबीयांच्या मालकीचे लिथो मशीनचे वर्कशॉप, अंगणवाडी सेविका असलेल्या प्रतीकच्या आईचे मानधन ही कुटुंबीयांच्या अर्थार्जनाची साधने. त्यात शेतीमध्ये विहीर असूनही तिला पुरेसे पाणी नसल्याने कापूस आणि मका यांसारखी पिके घेतली जातात. त्यातून मिळणारे उत्पन्नही जेमतेम. त्यामुळे १९ जणांचे कुटुंब चालवण्यासाठी मोठी कसरत करावी लागते. अशी सगळी पार्श्वभूमी असलेल्या कुटुंब प्रतीकच्या मोठ्या भावाने, सुयोगने २०१० मध्ये औरंगाबाद येथे अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाला प्रवेश घेतला. या अभ्यासक्रमाची तीन वर्षे व पदवी अभ्यासक्रमाची तीन वर्षाचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी कुटुंबीयांना मोठी कसरत करावी लागली. चुलत भाऊ स्वप्नीलच्या इंजिनिअरिंगच्या शिक्षणाच्या वेळीसुद्धा हीच परिस्थिती होती.

प्रतीकचे पहिली ते दहावीचे शिक्षण आजोळी श्रीरामपूर येथे मॉडेल इंग्लिश स्कूलमध्ये झाले. प्रत्येक वर्षी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होणाऱ्या प्रतीकला दहावीमध्ये ८४ टक्के गुण मिळाले. त्यानंतर इंजिनिअर बनायचे हे मनाशी ठरवून, त्याने औरंगाबाद येथील देवगिरी कॉलेजमधून विज्ञान शाखेतून बारावीचे शिक्षण पूर्ण केले. आता इंजिनिअरिंगला प्रवेश घ्यायचा, हे पक्क होते. पण घरची आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने शासकीय कोट्यातून प्रवेश मिळाला तरच पुढील इंजिनिअरिंग करायचे, अशी अट कुटुंबीयांनी घातली होती.

अखेर प्रतीकला शासकीय कोट्यातून वाशिम येथील शासकीय पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये मॅकेनिकल अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाला प्रवेश मिळाला. घरापासून सुमारे ३०० किलोमीटर दूर असलेल्या या कॉलेजमध्ये प्रवेश घेतल्यानंतर भाड्याने खोली घेऊन राहावे लागणार होते. जेवणाचा व इतरही खर्च होताच. हे सगळे गणित कसे जुळवायचे याचा प्रश्न प्रतीक व त्याच्या कुटुंबाला सतावत होता. तरीही त्यांनी धाडस करून शिक्षण सुरू केले. कुटुंबाच्या आर्थिक परिस्थितीमुळे एखाद्या वेळेस शिक्षणाला ब्रेक लागतो की काय, अशी भीती होतीच. मात्र याच वर्षी २०१६-१७ पासून शासनाने मान्यताप्राप्त व्यावसायिक व उच्च



प्रतीक पोटे

शिक्षण अभ्यासक्रमात शिकणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी, राजर्षी शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना लागू केली. या दोन्ही योजनेंचा प्रतीकला लाभ मिळाला.

या योजनेतून शिक्षण शुल्काची ५० टक्के प्रतिपूर्ती करण्यात आली. तर पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेच्या माध्यमातून प्रतिमहिना २००० रुपये निर्वाह भत्ता मिळू लागला. या दोन्हीही योजनांमुळे प्रतीकसमोर उभा ठाकलेला आर्थिक प्रश्न सुटला. निर्वाह भत्ता मिळाल्याने राहण्याचा व जेवण्याच्या खर्चाचा भार आता कुटुंबावर पडणार नव्हता. त्यामुळे त्याचे शिक्षण अखंडित सुरू राहण्यासाठी आता कोणतीही अडचण नव्हती. याविषयी बोलताना प्रतीक सांगतो की, वाशिम येथे प्रवेश घेतल्यापासून, शिक्षणासाठी कुटुंबीयांना आर्थिक ओढाताण करावी लागणार असल्याची जाणीव सातत्याने होत होती. त्यात राहण्याचा, जेवणाचा खर्च प्रत्येक महिन्याला होणार होताच. अशा परिस्थितीत तीन वर्षाचा पदविका अभ्यासक्रम कसा पूर्ण होणार, याची काळजी वाटत होती. कधी–कधी वाटायचे की अर्ध्यातून शिक्षण सोडून गावी जाण्याची वेळ तर आपल्यावर येणार नाही ना. जर तसे झाले तर माझे इंजिनिअरिंगचे स्वप्न अपूर्ण राहिले असते. त्यामुळे अभ्यासात लक्ष लागत नव्हते. मात्र कॉलेज सुरू झाल्यानंतर काही दिवसातच कॉलेजमध्ये दोन्ही योजनांची माहिती कळली. या योजनांचा लाभ मिळाल्यामुळे गेल्या दोन वर्षात माझ्या शिक्षणात कोणतीही आर्थिक अडचण आली नाही. आता माझे मॅकॅनिकल अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाचे शेवटचे वर्ष सुरू आहे. यानंतर पदवी अभ्यासक्रम पूर्ण करणार आहे. या वेळी सुद्धा या दोन्ही योजनांचा मला लाभ होईल.

**– तानाजी घोलप,**
माहिती सहायक, वाशिम

## स्कूल बसची मालकी..

नितीन इंगळे हे जळगाव येथील कोल्हेनगर परिसर राहतात, आर्थिक स्थिती बेताचीच, वडील खासगी गाडीवर ड्रायव्हर, घरात आईवडील, भाऊ असा परिवार. भावाचे बारावीपर्यंत शिक्षण झाल्यावर पुरे झाले शिक्षण, आता पोटाचे पाहा असे नितीनला सांगण्याची घरात वेळ आली. मोठा भाऊ चौकस. जीवनात काहीतरी करावे, या विचारात असताना त्याला मित्राने सल्ला दिला की, एखाद्या महामंडळाकडून कर्ज काढ, त्याने अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास महामंडळाच्या योजनांची माहिती मिळवली. आर्थिकदृष्ट्या मागास घटकांतील तरुणांना उद्योजक बनू इच्छिणाऱ्या आणि तशी क्षमता असलेल्या तरुणांना आर्थिक साहाय्य पुरवण्याचे काम हे महामंडळ करते. वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेंतर्गत कर्ज मिळेल हे नितीनला सांगण्यात आले. नितीन मुळात कष्टाळू, यशाची स्वप्न पाहणारा, त्याने भावाला लगेच होकार दिला.

जळगाव शहर झपाट्याने विस्तारत आहे. बंद पडलेली एसटीची शहर वाहतूक, त्यामुळे रिक्षांवर पडणारा ताण पाहता शाळेत जाणारी मुले घरी सुखरूप परत यावी यासाठी आईवडिलांचा नेहमीच आटापिटा असतो. आज मोठ्या प्रमाणावर व्हॅन आणि स्कूल बसचा आधार घेतला जातो. शहरात शाळेत मुले पोहोचवण्यासाठी आणि आणण्यासाठी अशा स्कूल बस, व्हॅनची बरीच संख्या असली तरी मागणीचा विचार करता त्यांची गरजदेखील मोठ्या



प्रमाणावर असल्याचे मोठ्या भावाने नितीनच्या मनात बिंबवले आणि शाळेत जाणाऱ्या मुलांसाठी एक स्कूल बस व्हॅन घेण्याचे ठरवत, दोघे भाऊ महामंडळाच्या कार्यालयात गेले. कर्जाबाबत चौकशी केली असता तेथे त्यांना वैयक्तिक कर्ज घेण्याबाबत महामंडळाच्या अधिकाऱ्यांकडून संपूर्ण माहिती व कर्जाबाबत लागणारी कागदपत्रे व पात्रता याबाबत मार्गदर्शन केले गेले. नितीनने महामंडळातून सशर्त प्रमाणपत्र मिळवले व बँकेकडून पाच लाख रूपये कर्ज उचलण्याचा निर्णय घेतला. पाहता पाहता नितीनच्या दारात स्कूल व्हॅन उभी राहिली.

सकाळी सहापासून शाळेत मुलांना पोहोचवणे आणि शाळेतून घरी आणणे यात नितीन गुरफटून गेला. घड्याळाच्या काट्यावर दिनक्रम ठरला. त्याचा प्रत्येक मिनिट महत्त्वाचा ठरला. विवेकानंद शाळेत नेण्यासाठी मानराज पार्क, एसएमआयटी, पिंप्राळा गेट यापरिसरातील मुलांना शाळेत नेणे आणि सुखरूप घरी आणणे हा त्याचा आनंददायी व्यवसाय बनला. आज नितीन या व्यवसायात पूर्णपणे रमला आहे. न चुकता दरमहा दहा हजाराचा हप्ता बँकेत जमा होत आहे. याच्या पावलावर पाऊल टाकत भावाने दुसरी गाडी खरेदी केली. स्वत:च्या पायावर उभे राहण्यास साहाय्य केल्याबद्दल महामंडळाचे तो आभार मानतो.

**– विजय पाठक**
ज्येष्ठ पत्रकार, जळगाव


दीपक शेटे

## कायापालट

शेतीवर अवलंबून असणाऱ्या अकोट येथील दीपक शेटे यांचे जीवन अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास महामंडळाच्या योजनेमुळे बदलून गेले आहे. ३७ वर्षीय दीपक यांचे पत्नी, २ मुले असे छोटसे कुटुंब आहे. त्याच्याकडे २ एकर शेतीशिवाय दुसरे उत्पन्नाचे साधन नव्हते. बारावीपर्यंत शिक्षण घेतल्यानंतर ते शेती करू लागले. मात्र, पावसाची अनियमितता आणि शेतमालाला मिळणारा कमी भाव यामुळे कुटुंब चालविणे जिकिरीचे झाले होते. अशा वेळी शेळीपालनाचा जोडधंदा करण्याचे त्यांनी ठरवले.

योगायोगाने समाज माध्यमातून त्यांना अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास महामंडळाच्या व्याज परतावा योजनेची माहिती मिळाली. शेळीपालन व्यवसायासाठी त्यांनी अकोट येथील सेंट्रल बँकेत सात लाख रुपये कर्जाचा प्रस्ताव दाखल केला. कर्ज मंजूर झाल्यानंतर त्यांनी शेळी खरेदी केल्या. शेतीबरोबर जोडधंदा म्हणून शेळीपालन सुरू केल्यामुळे दीपक यांच्या जीवनाचा कायापालट झाला आहे.

## सुवर्णसंधी

'खुल्या गटातील सामान्य तरुणाला स्वयंरोजगाराची संधी अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामुळे मिळाली आहे. मुख्यमंत्र्यांनी या महामंडळाचे पुनरुज्जीवन करून तरुणाईसाठी प्रगतीचा मार्ग मोकळा केला आहे.' नाशिक जिल्ह्यात पाथर्डीच्या बाळकृष्ण शिरसाठ यांची ही प्रतिक्रिया बरीच बोलकी आहे. वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेमुळे वयाच्या अवघ्या ३२ व्या वर्षी त्याच्या एकूणच जीवनात मोठा बदल घडून आला आहे.

> 'वैयक्तिक कर्ज परतावा योजनेचा लाभ घेण्यासाठी अत्यंत कमी कागदपत्रांची आवश्यकता आहे. कर्ज तात्काळ मंजूर झाल्याने व्यवसाय वाढवून, दोन जणांना रोजगार देता आला. शासनाला धन्यवाद द्यायला हवे. एका व्यक्तीला कर्ज मिळाल्यावर सुरू होणाऱ्या व्यवसायामुळे पाच तरुणांना रोजगार मिळू शकतो. माझ्यासारख्या तरुणाला प्रगतीचा एक नवा मार्ग गवसला आहे.'
>
> **– बाळकृष्ण शिरसाठ**

बाळकृष्ण याला शाळेत असल्यापासून व्यवसायाची ओढ होती. कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेतल्यावर एका पिलो कंपनीची उत्पादने विकताना दिवसाला ६०० रुपये ते मिळवत. कालांतराने छायाचित्रणाच्या छंदामुळे त्यांनी व्यवसाय बदलला. ग्रामीण भागात विविध कार्यक्रमांचे छायचित्रण करताना त्यांच्या उत्तम संवाद कौशल्यामुळे शेतकऱ्यांशी परिचय वाढला.

परिसरातील १० गावात त्यांचा संपर्क होता. ५०० वर्गफुटाचे लहान दुकान भाड्याने घेऊन त्यात कटलरी व फोटोग्राफीचा व्यवसाय सुरू करण्याचा त्यांचा प्रयत्न असताना शेतकरी मित्रांनी

## स्वयंपूर्ण

आर्थिकदृष्ट्या मागास घटकातील उद्योजक बनू इच्छिणाऱ्या व तशी क्षमता असलेल्या तरुण वर्गाला आर्थिक साहाय्य पुरवण्यासाठी अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास महामंडळाच्या या योजनेंतर्गत बँकेतून व्यवसायासाठी घेतलेल्या कर्जाचे हप्ते वेळेवर अदा केल्यास लाभार्थ्यांना तसेच गटांना व्याजाचा परतावा त्यांच्या आधार लिंक बँक खात्यावर दिला जातो.

या योजनेचा लाभ घेऊन अकोला जिल्ह्यातील अनेक बेरोजगार तरुण स्वयंपूर्ण झाले आहेत. अकोल्यातील शैलेश दुबे या २७ वर्षीय तरुणाने योजनेचा लाभ घेऊन, ऑटोरिक्षा खरेदी केला. आता तो आर्थिकदृष्ट्या सक्षम झाला आहे. हलाखीच्या आर्थिक परिस्थितीमुळे शैलेश नववीपर्यंतच शिकू शकला. सुरुवातीला उपजीविकेसाठी त्याने अनेक ठिकाणी


शैलेश दुबे

रोजंदारीवर कामे केली. मात्र कमी पैसे मिळत असल्याने वैयक्तिक व कुटुंबाच्या गरजा भागवणे शक्य होत नव्हते. त्याच वेळी नोकरी सोडून स्वत:चा व्यवसाय करावा, असे त्याने निश्चित केले. मात्र भांडवलाची चिंता त्याला सतावू लागली. दूरचित्रवाणीवरून प्रसारित झालेल्या महामंडळाच्या व्याज परतावा योजनेच्या जाहिरातीतून, त्याच्या आशा पल्लवित झाल्या. तत्काळ त्याने महामंडळाच्या कार्यालयाशी संपर्क साधून योजनेची माहिती घेतली. या योजनेमुळे कर्जावरील व्याज परतावा मिळणार असल्याने त्याने ऑटो रिक्षा खरेदीसाठी कॅनरा बँकेत प्रस्ताव दाखल केला. त्याचा प्रस्ताव मंजूर झाला. दीड लाखाचे कर्ज मंजूर झाल्यानंतर स्वत:ची रिक्षा खरेदी करून तो स्वयंपूर्ण झाला. या व्यवसायातून तो आज आईवडील, भाऊ, बहीण, पत्नी यांच्या गरजा भागवण्यास सक्षम झाला आहे.

**– प्रमोद धोंगडे,**
प्र. जिल्हा माहिती अधिकारी, अकोला



बाळकृष्ण शिरसाठ

त्यांना कृषी निविष्ठांचा व्यवसाय करण्याचे सुचवले. १२ वी पूर्ण केल्यावर कृषी पदविकादेखील मिळवली असल्याने त्यांनी उपलब्ध भांडवलात खते, बियाणे, रासायनिक औषधांचा व्यवसाय सुरू केला.

वार्षिक उलाढाल ३० लाखापर्यंत नेऊनही लाभ दोन लाखाच्या वर जात नव्हता. दुकानात विविध प्रकारची उत्पादने ठेवता येत नव्हती. अशातच नातेवाईकासोबत बँकेत गेले असताना त्यांना अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती मिळाली. त्यांनी www.mahaswyam.in या संकेतस्थळावर नोंदणी करून 'लेटर ऑफ इंटेन्ट' मिळवले. आवश्यक कागदपत्रे सादर केल्याने बँक ऑफ महाराष्ट्रच्या प्रतिनिधींनी दहा दिवसात दुकानाला भेट देऊन कर्ज प्रकरण मंजूर केले. उपलब्ध दहा लाखाच्या कर्जात त्यांनी १४०० वर्गफुटाचे नवे दुकान भाड्याने घेऊन, व्यवसाय वाढवला. भांडवल उपलब्ध झाल्याने तीन नव्या कंपन्यांच्या उत्पादनांचे वितरण त्यांना शक्य झाले. व्यवसायातील उलाढाल वाढून मिळणाऱ्या लाभाचे प्रमाण दोन टक्क्यावरून सात टक्क्यापर्यंत पोहोचले आहे. बाळकृष्ण यांना पाच वर्षांनंतर केवळ मूळ कर्ज रकमेची परतफेड करायची आहे. त्यावरील व्याज शासन भरणार आहे. ईएमआय भरायचे नसल्याने लाभाचे प्रमाणही वाढले आहे. वार्षिक उत्पन्न दहा लाखांपर्यंत वाढले आहे. व्यवसाय वाढता ठेवून कर्ज वेळेत फेडले जाईल, असा विश्वास त्यांना आहे. मिळालेल्या संधीचा उपयोग करून त्यांनी आपले जीवनमान उंचावले आहेच, त्याचबरोबर तरुणांना स्वयंरोजगाराचा आणि प्रगतीचा मार्ग दाखवला आहे.

**– डॉ.किरण मोघे,**
जिल्हा माहिती अधिकारी, नाशिक

## आम्ही उद्योजक

यश कथा

उद्योजक बनू इच्छिणाऱ्या व कौशल्य विकास योजनेच्या माध्यमातून प्रशिक्षण घेतलेल्या १३ नवीन युवकांना स्वत:चा व्यवसाय सुरू करण्यासाठी अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळातर्फे कर्ज उपलब्ध करून दिल्यामुळे स्वयंरोजगाराच्या माध्यमातून स्वत:चा व्यवसाय करण्यास सुरुवात झाली आहे.

या महामंडळामार्फत आर्थिकदृष्ट्या मागास घटकातील उद्योजक बनू इच्छिणाऱ्या व तशी क्षमता असलेल्या युवकांसाठी आर्थिक साहाय्याचे बळ मिळावे यासाठी बीज भांडवल कर्ज योजना व गट प्रकल्प कर्ज योजना राबवण्यात येत आहे. त्यासोबतच वैयक्तिक कर्ज व्याज परतावा या योजनेंतर्गत नॉन क्रिमिलेअरकरिता असलेल्या कौटुंबिक वार्षिक उत्पन्न मर्यादेतील युवकांना १० लाखापर्यंतच्या मर्यादेत कर्ज उपलब्ध करून देण्यात येते. गट कर्ज व्याज परताव्या योजनेंतर्गत किमान १० लाख ते जास्तीत जास्त ५० लाखांपर्यंतचे कर्ज उद्योग उभारणीसाठी उपलब्ध होत असल्यामुळे, विविध क्षेत्रात उद्योगाच्या विकासाला चालना मिळत आहे.

जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता केंद्राच्या माध्यमातून १४५ युवकांनी स्वयंरोजगारासाठी पुढाकार घेतला असून, त्यापैकी अल्पावधीत १५ कर्ज प्रकरणे मंजूर झाली आहेत. विविध कौशल्य प्राप्त केलेल्या १३ युवा उद्योजकांना विविध राष्ट्रीयकृत तसेच खासगी बँकांमार्फत १ कोटी २ लाख ७ हजार रुपयांची कर्ज मंजूर झाले आहेत. त्यापैकी ७६ लाख ६० हजार युवकांना प्रत्यक्ष कर्जाचे वितरण झाले आहे.



गट कर्ज व्याज परतावा योजनेंतर्गत युवा उद्योजकांना २४ लाख रुपयांचे कर्ज मंजूर करण्यात आले आहे.

या महामंडळांतर्गत जिल्ह्यातील पात्र युवकांना प्रशिक्षण देऊन उद्योग सुरू करण्यासंदर्भात जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता केंद्रामार्फत मार्गदर्शन तसेच प्रशिक्षण दिले जाते. या आधारे उमेदवारांना रोजगार, स्वयंरोजगार करण्यास सक्षम केले जाते. त्यामध्ये कृषी, संलग्न व पारंपरिक उपक्रम, लघू व मध्यम उद्योग यामध्ये उत्पादन, व्यापार व विक्री तसेच सेवा क्षेत्राचा समावेश असल्यामुळे, नागपूरच्या मस्कासाथ भागात राहणाऱ्या भास्कर पराते या युवकाने पर्यटनाच्या माध्यमातून टुर्स अॅण्ड ट्रॅव्हल्स सुरू केले आहे. सेंट्रल बँक ऑफ इंडियाने त्याला ६ लाख

४० हजार रुपयांचे कर्ज मंजूर केले. यशवंत पांडे या युवकाने ७ लाखाचे कर्ज घेऊन स्वत:चा टॅक्सी व्यवसाय सुरू केला आहे. या महामंडळातर्फे विविध बँकांकडे १४५ प्रकरणे सादर करण्यात आली आहेत. जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी, जिल्हा कौशल्य विकास अधिकारी तसेच विविध बँकांच्या प्रतिनिधींसोबत अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास मंडळामार्फत सादर करण्यात आली आहेत. कर्ज प्रकरणासंदर्भात नियमित आढावा घेण्यात येत असल्यामुळे बँकांचाही सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. या योजनेच्या लाभासाठी उमेदवारांना शासनाच्या अधिकृत वेब पोर्टलवर अर्ज सादर करणे बंधनकारक आहे. प्रस्ताव सादर केल्यानंतर पात्रतेनुसार उमेदवारांना संगणकीकृत सशर्त मंजुरीपत्र दिले जाते. या आधारावरच बँकांकडून कर्ज मंजूर होते. या योजनेच्या लाभासाठी साहाय्यक संचालक, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राशी संपर्क साधावा.

## समृद्धीचा 'रंग'

'शिकून काही नोकरी लागत नाही.. काय फायदा शिक्षण घेऊन.. शेवटी नोकरच व्हायचे आहे ना.. मग कशाला पडता या शिक्षणाच्या फंद्यात.. मग काय करावे.. धंदा, व्यवसाय करा.. पण मग भांडवल कसे मिळवावे.. कोणता उद्योग टाकावा.. उद्योग टाकला तर चालेल काय.. हा प्रश्नोत्तरी संवाद आहे एका मध्यमवर्गीय कुटुंबातील.. हा संवाद बहुतांश कुटुंबामध्ये ऐकावयास मिळतो. बुलडाणा येथील पराग काचकुरे यांचे कुटुंबही यास अपवाद नाही.

पण इच्छाशक्ती दांडगी असल्यास काहीही करता येऊ शकते. याचा प्रत्यय पराग काचकुरे यांना आला आहे.

पराग याने बीकॉम.पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर तीन वर्ष खासगी नोकरी केली. या अनुभवानंतर, त्यांचे नोकरीत मन रमत नव्हते. नोकरीतील नैराश्य ही मानसिकता झाली. दुसऱ्या नोकरीच्या मागे न लागता.. स्वत:चा व्यवसाय सुरू करावा ही भावना बळावली. ही ध्येयपूर्ती करण्यासाठी त्याने संघर्ष करीत सातत्याने प्रयत्न केले. या प्रयत्नांना बळ मिळाले अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेचे. या महामंडळाने सुशिक्षित कर्ज व्याज परतावा योजनेचा लाभ पराग काचकुरे याने घेतला आहे. रंग विक्रीचा छोट्या स्तरावर व्यवसाय सुरू करून स्वत:च्या पायावर उभे राहण्याची धडपड सुरू केली. पराग याने बुलडाणा शहरातील चिंचोले चौकात भाड्याने दुकान घेऊन रंग व बांधकाम साहित्याची विक्री सुरू केली. सुरुवातीला अपयश आले, विक्री होत नव्हती, मोठे दुकान व माल वाढवण्यासाठी पैसे नव्हते. शेवटी हा व्यवसाय बंद करावा की, काय इथपर्यंत विचार आला. मात्र अशा विवंचनेत असतानाच वृत्तपत्रात या महामंडळाच्या योजनांची माहिती वाचली आणि कार्यालयाकडे धाव घेतली. कर्ज प्रकरण केले. त्याला साथ दिली आयडीबीआय बँकेने. चिंचोले चौकात लागलीच मोठे दुकान घेतले व रंगाचा माल वाढवला. 'रत्नमोहन कलर कॉम्बिनेशन' या नावाने दुकान सुरू झाले.



पराग काचकुरे

त्यांना महामंडळाच्या वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेनुसार १० लक्ष रुपये १५ जूनला मिळाले. मोडकळलेल्या व्यवसायाला उभारी मिळाली. माल वाढल्यामुळे ग्राहक वाढले. मोठ्या बांधकाम कंत्राटदारांसोबत संबंध आला. रंगाची मागणी मोठ्या प्रमाणावर येऊ लागली. व्यवसाय बहरला आणि समृद्धी आली. आज पराग याचा महिन्याकाठी ५ ते ६ लक्ष रुपयांची उलाढाल गेली आहे. जो सुरुवातीला केवळ ६० हजार रूपयांचा होता. व्यवसाय वाढला ग्राहकसंख्या वाढली.. पराग याने केवळ यावर विसंबून न राहता पुढे शिकण्याचा निर्धार केला. इमारत बांधकाम पर्यवेक्षक क्षेत्रात पदविका करून विकासक व्हायचे ध्येय त्यांनी ठेवले आहे. त्यासोबत ऑनलाइन पद्धतीने वास्तूकला अभ्यासक्रम करण्याचे ठरवले. त्या पद्धतीने प्रवेश प्रक्रियेत त्यांनी सहभाग नोंदवला आहे.

फक्त १० बाय १२ आकाराच्या दुकानात व्यवसाय सुरू करणाऱ्या परागने आज दुकान तर मोठे केलेच पण मनही मोठे केले. पर्यावरण संवर्धनाच्या वृक्षारोपण कार्यक्रमातही त्याने सहभाग घेतला. पर्यावरण दिंडीला प्रतिसाद दिला. रंग कंपनीच्या विपणन विभागाने विदर्भात दुसऱ्या क्रमांकाचा व्यवसाय केल्याबद्दल त्याचा गौरवही केला. शासनाच्या योजनेमुळे सावरलेल्या व्यवसायाचे अनुकूल परिणाम निदर्शनास आणून देते. बुलडाणासारख्या मागासलेल्या शहरात पराग याने स्वत:चा व्यवसाय करून, केवळ नोकरी नाही.. म्हणून वणवण करणाऱ्या मुलांसाठी आदर्श निर्माण करून दिला आहे. त्यांच्याकडे बघून केवळ नोकरीच्या मागे न लागता स्वत:चा व्यवसाय उभारण्याची प्रेरणा मिळते.

**– निलेश तायडे,**
माहिती सहायक, जिमाका, बुलडाणा

## मी बॉस प्रयोगशाळेचा...



राहुल सातपुते

राहुल सातपुते याने सर्वसाधारण कुटुंबात जन्माला आल्यामुळे जमेल तसे आणि सोईचे शिक्षण घेऊन जैवतंत्रज्ञान या विषयात बी. टेकचा अभ्यास पूर्ण केला. इतरांची चाकरी करण्यापेक्षा स्वत:चा उद्योग सुरू करून दुसऱ्यांना रोजगार देण्याचे स्वप्न लहानपणापासूनच त्याने उराशी बाळगले होते. पण कुटुंबाची आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याने ते कधी जमलेच नाही. यादरम्यान घराची आर्थिक परिस्थिती सुधारावी, यासाठी राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी संशोधन संस्था, नागपूर आणि त्यानंतर अरविंद कृषी विद्यापीठात कृषी तज्ज्ञ म्हणून काम करताना स्वत:चे काहीतरी सुरू करावे, ही भावना कायम मनाला बोचत होती. हिंमत करून २०१७ साली सावनेर तालुक्यातील मालेगाव येथे भूमित्र लॅबॉरेटोरी आणि सॉईलकेअर कंपनी सुरू केली. कंपनी सुरू झाली पण तिच्या विस्ताराची चिंता सतावत असताना, गावातील काही व्यक्तींनी अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाची माहिती दिली. महामंडळाच्या कार्यालयाशी संपर्क साधून वैयक्तिक कर्ज योजनेतून, ५ लाख रुपयाचे कर्ज उपलब्ध झाले. या योजनेच्या माध्यमातून मिळालेल्या कर्जाने उद्योग आर्थिक समस्यातून बाहेर आला. जैविक खत निर्मितीच्या उद्योगात खत निर्मितीसोबतच शेतकरी जनजागृती कार्यक्रम राबवण्यासाठी मदत झाली आहे.

**– अनिल गडेकर,**
जिल्हा माहिती अधिकारी, नागपूर

## काजू प्रक्रिया उद्योग

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुडाळ तालुक्यातील सांगिर्डेवाडी येथील तरुण उद्योजक दीपेश दिलीप परब यांनी काजू प्रक्रिया उद्योग साकारला आहे. सुरुवातीस काजूच्या व्यापारामध्ये असणारे दीपेश परब यांनी काजूचा उद्योग सुरू करण्याचे स्वप्न उराशी बाळगले होते. काजूच्या व्यापार म्हणजे ते फक्त काजूची विक्री करत, पण त्यातून मिळणारे उत्पन्न अत्यल्प होते. साधारण दोन वर्षे त्यांनी या व्यापाराचा अनुभव घेतला. मग स्वतःचा काजू प्रक्रिया उद्योग सुरू करण्याचे त्यांनी ठरवले. पण, महत्त्वाचा प्रश्न समोर होता तो भांडवलासोबतच उभारलेल्या कर्जाच्या परताव्याचा व व्याजाचा. पण दीपेश परब यांनी हे आव्हान स्वीकारले. उद्योगासाठी कर्ज उभारण्यासाठी त्यांनी विविध पर्यायांचा शोध सुरू केला. त्यावेळी त्यांच्या आणखी एक गोष्ट लक्षात आली की आपण उभारत असलेल्या उद्योगाविषयीचे प्रशिक्षण असणे गरजेचे आहे. त्यांनी त्याविषयीही माहिती घेण्यास सुरुवात केली. त्यातून त्यांना सावंतवाडी येथील हेडगेवार संस्थेतील प्रशिक्षणाविषयी माहिती मिळाली. या संस्थेकडून त्यांनी १५ दिवसांचा काजू प्रक्रिया उद्योग व मार्केटिंग असे दोन्ही प्रशिक्षण घेतले. त्याच वेळी त्यांनी अण्णासाहेब पाटील महामंडळातर्फे राबवण्यात येणाऱ्या वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेविषयी माहिती मिळाली. या योजनेसाठी त्यांनी जिल्हा कौशल्य विकास कार्यालयाशी संपर्क साधला. या कार्यालयाकडून मिळालेल्या सकारात्मक प्रतिसादामुळे त्यांनी ही योजना राबवण्याचा निर्णय घेतला.

या योजनेतून त्यांना ९ लाख ५० हजार रुपयांचे कर्ज मंजूर झाले. स्वतः जवळील काही भांडवलाची त्यांनी गुंतवणूक केली. ७५० चौरस फुटांचा कारखाना उभारला. स्वतःजवळील भांडवलामधून त्यांनी एक टो कटर, २० किलो क्षमतेचे २ ड्रायर आणि ४० किलो क्षमतेचा एक ब्रॉयलर अशी यंत्रसामग्री खरेदी केली. मिळालेले कर्ज खेळते भांडवल म्हणून वापरले. त्यातून त्यांनी वर्षभरासाठी लागणाऱ्या काजू बी चा साठा केला. वर्षाकाठी १२ टन काजू बी वर प्रक्रिया करण्याचा प्रकल्प त्यांनी यातून साकारला.

काजू प्रक्रिया उद्योग हा तसा किचकट उद्योग. काजू बी खरेदी ते काजू गर विक्री या पर्यंतचा प्रवास मोठा आहे. १ टन काजू बी वर प्रक्रिया करण्यासाठी साधारण १५ दिवसांचा कालावधी लागत असल्याचे दिपेश परब यांनी सांगितले. यामध्ये काजू बी सुकवणे, ब्रॉयलरमध्ये प्रोसेस करणे, पुन्हा सुकवणे, कटिंग करणे, ग्रेडिंग करणे आणि पुन्हा सुकवून पॅकिंग करणे या सर्वांचा अंतर्भाव आहे. काजूचे ग्रेडिंग डब्लु टू ४००, डब्लु ३२०, डब्लु २४०, डब्लु २१०, डब्लु १८० अशा प्रकारात केले जाते. यातील डब्लु २१० व डब्लु १८० ग्रेडच्या काजूला चांगला भाव असल्याचेही त्यांनी सांगितले.



दीपेश परब

तसेच यातून तुकडा काजूही तयार होते. या सर्व प्रक्रियेनंतर १६५ ते १८० रुपये प्रतिकिलो दराने खरेदी केलेली काजू बी सुमारे ८५० रुपये किलो दराने काजू गर बनून विक्री केली जाते. कारखान्यामध्ये दोन कामगारही ठेवले आहेत. या उद्योगातून सुरुवातीस ८० ते ९० हजार रुपये निव्वळ नफा झाला आहे.

कारखाना सुरू होऊन आता फक्त एक वर्ष झाले आहे. त्यामुळे जसजसा उद्योग वाढत जाईल तसतसे उत्पन्नही वाढत जाईल असे श्री. परब यांनी सांगितले.

**– हेमंतकुमार चव्हाण,**
माहिती सहायक, जिल्हा माहिती कार्यालय, सिंधुदुर्ग.

## माझी मोबाइल शॉपी

राज्यातील आर्थिकदृष्ट्या मागास घटकातील उद्योजक बनू इच्छिणाऱ्या व तशी क्षमता असलेल्या तरुणवर्गाला आर्थिक साहाय्य पुरवणाच्या दृष्टीने अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत बीज भांडवल योजना व गट प्रकल्प कर्ज या योजना राबवण्यात येत असून, याच योजनेचा फायदा घेऊन जालना जिल्ह्याच्या भोकरदन तालुक्यातील बेरोजगार युवक मोबाइल शॉपीचा मालक बनला आहे.

भोकरदन तालुक्यातील तांदूळवाडी हे तालुका मुख्यालयापासून ११ किलोमीटरवर असलेले छोटेसे गाव. गावाचा उदरनिर्वाहाचा स्रोत हा शेती आहे. याच गावातील समाधान पंढरीनाथ चिकटे या तरुणाने इच्छाशक्तीच्या जोरावर तसेच अणासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या साहाय्याने गावातच मोबाइल शॉपीचा व्यवसाय उभारून, स्व:तबरोबरच कुटुंबाचा आधार बनला आहे. समाधानचे शिक्षण बारावीपर्यंत झालेले असून उच्चशिक्षणाची इच्छा असतानासुद्धा कौटूंबिक परिस्थिती हालाकीची असल्यामुळे पुढील शिक्षण घेता आले नाही. परंतु काही तरी करून दाखवण्याची इच्छा त्याला स्वस्थ बसू देत नव्हती. आजघडीला मोबाइलचा वापर मोठ्या प्रमाणात होत असून त्याच्याच रिपेअरिंगचे प्रशिक्षण घेण्याचे ठरवून समाधानने भोकरदन येथील उपजीविका विकास केंद्र आणि व्यावसायिक प्रशिक्षण केंद्रातून मोबाइल रिपेअरींचा कोर्स पूर्ण केला.

मोबाइल रिपेअरींगचा कोर्स पूर्ण केल्यानंतर दुकानासाठी पैशाची निकड होती. त्यातच समाधानला अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेबद्दल माहिती मिळाली. त्या माहितीच्या आधारे ऑनलाइन अर्ज करून द चिखली अर्बन को–ऑपरेटिव्ह बँक शाखा, भोकरदन येथून समाधानला




४ लक्ष रुपयांचे कर्ज मंजूर झाले. या कर्जाच्या माध्यमातून एस.सी., मोबाइल शॉपीचा प्रारंभ केला

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेतून घेतलेल्या कर्जातून समाधानने विविध कंपनीचे मोबाइल, आणि त्यासाठी लागणारे साहित्य खरेदी केले. अल्पावधीतच समाधानच्या मोबाइल शॉपीला गावात भरभरून प्रतिसाद मिळाला. आजघडीला सर्व खर्च जाऊन दिवसाकाठी ५०० ते ७०० रुपये निव्वळ नफा मिळत आहे.

समाधानचा व्यवसाय आजघडीला जरी छोट्या स्वरूपात असला तरी भविष्यात या मोबाइल शॉपीचे रुपांतर आधुनिक अशा शोरूममध्ये करण्याचा मानस आहे. स्वत:च्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहाबरोबरच येणाऱ्या काळात गावातील बेरोजगार असलेल्या मित्रांनाही रोजगार मिळवून देण्याची समाधानची इच्छा आहे.

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेच्या माध्यमातून समाधानच्या कुटुंबाचा आर्थिक स्तर उंचावला असून गावातील प्रत्येक बेरोजगाराने नोकरीच्या मागे न लागता शासनाच्या योजनांचा लाभ घेऊन आपल्या पायावर उभे राहावे अशी इच्छा समाधानने व्यक्त केली असून शासनाचे त्याने आभारही मानले आहेत.

सर्वसामान्यांचे जीवन सुकर व्हावे, त्यांचा आर्थिक स्तर उंचवावा यासाठी शासन अनेक कल्याणकारी योजना राबवत आहे. या योजनांचा लाभ प्रत्येक गरजू लाभार्थ्यांपर्यंत पोहोचून त्यांचे जीवनमान उंचवावे या अपेक्षेने सुरु केलेल्या या योजनांचा लाभ घेण्यासाठी गरज आहे ती फक्त एक पाऊल पुढे येण्याची. या योजनेच्या लाभासाठी आपल्या जिल्ह्यातील जिल्हाधिकारी कार्यालयात असलेल्या अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या कार्यालयाशी संपर्क केल्यास याचा लाभ आपणास निश्चित मिळू शकेल. एवढेच या निमित्ताने...

**– अमोल शिवकांत महाजन**
माहिती सहायक, जिल्हा माहिती कार्यालय, जालना.

## वाहन सर्व्हिस सेंटर



दत्ता मोहिते

उस्मानाबाद येथील दत्ता दुर्गादास मोहिते यांनी दुचाकी गाड्यांचे सर्व्हिस सेंटर सुरू केले आहे. या व्यवसायात महिन्याला दहा ते पंधरा हजार रुपयांचे उत्पन्न मिळत असल्याने दत्ताचा आत्मविश्वास वाढला आहे. टू व्हीलरचे सर्व्हिसिंगच्या कामासोबतच त्याच्याकडे चारचाकी वाहनेही सर्व्हिसिंग करण्यास येऊ लागली. पण यासाठी आवश्यक असणारी यंत्रसामग्री घेणे गरजेचे होते. त्यानुसार त्याने या बाबींचा नीट अभ्यास केला. त्याप्रमाणे त्याने माहिती घेण्यास सुरुवात केली.

जिल्हा उद्योग केंद्र, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रालाही भेट दिली. त्याला अण्णासाहेब पाटील विकास महामंडळाची माहिती मिळाली. या कार्यालयांनी दत्ता मोहितेस प्रोत्साहन देऊन युनियन बँकेशी संपर्क साधण्यास सुचवले. त्याला युनियन बँकेने चार लाख रुपयांचे कर्ज मंजूर केले. यावर त्याने चारचाकी वाहनासाठीचे सर्व्हिस सेंटर सुरू केले. दत्ताने नव्या उत्साहाने काम सुरू केले असून त्याला महिन्याकाठी पंचवीस ते तीस हजार रुपयांची मिळकत होत आहे.

**– मनोज शिवाजी सानप,**
जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद.

## शिष्यवृत्तीचे बळ


अमोल उगले

जालना जिल्ह्यातील मस्त्योदरी अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थी अमोल उगले आणि ज्योती पवार हे अभियांत्रिकी शिक्षण घेत आहेत. जालना जिल्ह्याच्या घनसावंगी तालुक्यातील यावल पिंप्री या गावचा मूळ रहिवाशी असलेला अमोल शेषेराव उगले हा विद्यार्थी. घरची परिस्थिती अत्यंत नाजूक. शेतीच्या उत्पन्नावर व कर्ज काढून वडिलांनी अमोलला अभियांत्रिकीच्या शिक्षणासाठी जालना येथे पाठवले. शिक्षणासाठी राहणे, खासगी शिकवणी आदींसाठीचा मोठा खर्च असून हा खर्च मोठा आहे. अमोलसह एक बहीण व एका भावाच्या शिक्षणाचा खर्चही वडिलांना शेतीच्या उत्पन्नावरच करावा लागतो. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेमुळे अभियांत्रिकीचे शिक्षण घेण्यास मोठी मदत झाली. अमोल बी.ई. (मेकॅनिकल) च्या तिसऱ्या वर्षात शिक्षण घेत आहे. भविष्यात एम.टेक. करून पीएचडी करण्याचा मानस आहे. याच महाविद्यालयात बी.ई. तृतीय वर्षात शिक्षण घेत असलेल्या ज्योती राजू पवार या विद्यार्थिनीला या योजनेचा लाभ मिळाला आहे. तिचे वडील फळांच्या गाड्यावर मजुरी करतात.


ज्योती पवार

ज्योतीबरोबरच तिच्या दोन भावांनाही वडिलांनी उच्चशिक्षण दिले आहे. या शिष्यवृत्तीमुळे उच्च शिक्षण घेऊन स्वत:च्या पायावर उभे राहण्याचे बळ मिळाल्याची भावना ज्योतीने व्यक्त केली आहे.

**– अनिल आलुरकर,**
जिल्हा माहिती अधिकारी, जालना.

## स्टेशनरी दुकान

लाखनी, (जि. भंडारा) येथील प्रीती उके यांना अण्णासाहेब व्याज परतावा या योजनेत ४ लाख ७५ हजार रुपयांचे कर्ज मंजूर झाले असून, त्यांनी लाखनी येथे स्वत:चे स्टेशनरी दुकान सुरू केले आहे. यातून आपला आर्थिक विकास झाल्याचे त्यांनी सांगितले. कर्जाची मुद्दल आम्ही भरतो आणि व्याज शासन भरते असे त्यांनी सांगितले. या योजनेच्या माध्यमातून उन्नतीचा मार्ग गवसल्याची भावना प्रीती उके यांनी व्यक्त केली.


प्रीती उके

नोंदी

## राहण्यायोग्य देशातील शहरांच्या यादीत महाराष्ट्राची बाजी

**देशात** राहण्यायोग्य आणि जगण्यायोग्य शहरांच्या यादीमध्ये (ईज ऑफ लिव्हिंग इंडेक्स) महाराष्ट्राने बाजी मारली असून पहिल्या दहा क्रमांकामध्ये अव्वल स्थानासह राज्यातील सर्वाधिक चार शहरांचा समावेश आहे. या यादीमध्ये पुण्याने अव्वल क्रमांक तर नवी मुंबई आणि मुंबईने अनुक्रमे दुसरा व तिसरा क्रमांक पटकाविला आहे. देशाच्या या यादीत पहिल्या तिन्ही क्रमांकावर महाराष्ट्राने मोहोर उमटवली आहे.

केंद्रीय गृहनिर्माण आणि नागरी कार्य मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी नवी दिल्ली येथे देशातील जीवन सुलभ निर्देशांकामध्ये असणाऱ्या शहरांची यादी जाहीर केली. या यादीत ठाणे शहराने सहावा क्रमांक मिळवला आहे.

सुलभ जीवन निर्देशाकांचे (ईज ऑफ लिव्हिंग इंडेक्स) मूल्यांकन हे राष्ट्रीय तसेच जागतिक स्तरावरील राहण्यायोग्य शहरांच्या आणि शाश्वत विकासाच्या मानांकनाच्या आधारावर करण्यात आले आहे. जून २०१७ मध्ये सुलभ जीवन निर्देशांक ठरवण्यात आले होते. १९ जानेवारी २०१८ पर्यंत १११ शहरांचे मूल्यांकन करण्यात आले. यामध्ये संस्थात्मक, सामाजिक, आर्थिक, भौतिक हे चार मुख्य निकष लावण्यात आले.

देशातील १११ शहरांमध्ये राज्यातील १२ शहरांनी सहभाग घेतला होता. त्यातील पहिल्या दहामध्ये सर्वाधिक चार शहरांचा समावेश असणारे महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे. पहिल्या २० शहरांमध्येही राज्यातील सर्वाधिक ६ शहरांनी क्रमांक पटकाविला आहे. यामुळे राज्यातील सहभाग घेतलेल्या १२ शहरांपैकी पहिल्या वीस मध्ये ५० टक्के म्हणजे ६ शहरांनी बाजी मारली आहे. यामध्ये पुणे (१), नवी मुंबई (२), मुंबई (३), ठाणे (६), अमरावती (१६) व वसई विरार (२०) यांचा समावेश आहे.



पुणे : देशात राहण्यासाठी सर्वोत्कृष्ट शहर

नाशिक (२१), सोलापूर (२२), नागपूर (३१), कल्याण डोंबिवली (५०), पिंपरी चिंचवड (६९) तर औरंगाबाद (९७) या शहरांनी पहिल्या शंभर क्रमांकामध्ये स्थान मिळवले आहे.

संस्थात्मक आधारावर सुलभ जीवन निर्देशाकांमध्ये निवड झालेल्या शहरांमध्ये नवी मुंबई व पुणे ही दोन शहरे महाराष्ट्र आहेत. सामाजिक आधारावर निवड झालेल्या निर्देशाकांमध्ये नवी मुंबई, पुणे, बृहन्मुंबई, वसई–विरार या ४ शहरांचा समावेश आहे.

आर्थिक आधारावर निवडलेल्या शहरांमध्ये पुणे आणि ठाणे या २ शहरांचा सामवेश झालेला आहे.

भौतिक आधारावर निवडलेल्या शहरांमध्ये बृहन्मुंबई, पुणे, ठाणे, नवी मुंबई या चार शहरांचा समावेश करण्यात आला आहे.

याशिवाय ४० लाख लोकसंख्येपेक्षा अधिक असलेल्या शहरांमध्ये उत्कृष्ट व्यवस्थापनामध्ये बृहन्मुंबई, चेन्नई, सुरत या शहरांचा समावेश आहे. ४० लाख लोकसंख्येपर्यंतच्या शहरांमध्ये पुणे, नवी मुंबई, ठाणे या शहरांचा सामावेश आहे.

अन्य मानांकनांमध्ये महाराष्ट्रातील सोलापूर, औरंगाबाद, कल्याण–डोंबिवली, नागपूर, अमरावती, नाशिक, पिंपरी–चिंचवड या शहरांचा समावेश आहे.

### स्थानके स्वच्छतेत अग्रेसर

**देशातील** स्वच्छ रेल्वे स्थानकांचा अहवाल नुकताच रेल्वे मंत्री पियुष गोयल यांनी जाहीर केला. महाराष्ट्रातील एकूण ३६ रेल्वे स्थानकांचा यात समावेश असून श्रेणी 'अ १' मध्ये वांद्रे रेल्वे स्थानकाने ७ वा क्रमांक पटकावत देशात पहिल्या १० मध्ये स्थान मिळवले आहे.

गुणांकनात सुधार झालेल्या रेल्वे स्थानकांच्या श्रेणी 'अ१' मध्ये मुंबई–छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस स्थानकाने ९ व्या तर दादर रेल्वे स्थानकाने १० व्या क्रमांकावर झेप घेतली आहे. 'स्वच्छ रेल स्वच्छ भारत' अहवालांतर्गत देशातील ४०७ रेल्वे स्थानकांची नावे जाहीर करण्यात आली. यात श्रेणी 'अ १' मध्ये एकूण ७५ रेल्वे स्थानकांत महाराष्ट्रातील १० रेल्वे स्थानकांचा तर, श्रेणी 'अ' मध्ये एकूण ३३२ रेल्वे स्थानकांत राज्यातील २६ अशा एकूण ३६ रेल्वे स्थानकांचा समावेश आहे.

**३६ स्वच्छ रेल्वे स्थानके**

**अ १ श्रेणी –** मुंबई छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, पुणे, नागपूर, लोकमान्य टिळक टर्मिनस, मुंबई सेंट्रल, सोलापूर, दादर,

ठाणे आणि कल्याण.

**अ श्रेणी** – अकोला, नाशिक रोड, दौंड, बल्लारशाह, अमरावती, वर्धा, भुसावळ, शेगाव, कोल्हापूर, चाळीसगाव, मनमाड, अहमदनगर, नांदेड, कुर्डुवाडी, जालना, जळगाव, गोंदिया, मिरज, सांगली, लातूर, शिर्डी, चंद्रपूर, पनवेल, लोणावळा, परभणी, कोपरगाव, औरंगाबाद.

मुंबई–छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस व दादर रेल्वे स्थानकांच्या गुणांकनात सुधार झाला आहे. देशातील रेल्वे स्थानकांवर स्वच्छतेबाबत या अहवालात मोठ्या प्रमाणात सुधारणा झाली आहे. मुंबई–छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस व दादर रेल्वे स्थानकांची मागील वर्षापेक्षा स्वच्छता यादीत सुधारणा झाली आहे. गेल्यावर्षीच्या ६७९.१ गुणांहून मुंबई–छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस रेल्वे स्थानकाने ८९३.४ अंकावर झेप घेतली आहे. दादर रेल्वे स्थानकाने गत वर्षीच्या ५५२.२ गुणांहून सुधार करत ९१३ गुण मिळवले आहे.



छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस स्वच्छता गुणांकनात सुधार.

### मुंबई उपनगरीय रेल्वेची आघाडी

स्वच्छ रेल्वे स्थानकांच्या अहवालात मुंबई उपनगरीय रेल्वेच्या एकूण ८ रेल्वे स्थानकांचा समावेश आहे. यात 'अ १' श्रेणी मध्ये वांद्रे, मुंबई छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई सेंट्रल, ठाणे, लोकमान्य टिळक टर्मिनस, दादर आणि कल्याण या रेल्वे स्थानकांचा समावेश आहे. तर 'अ' श्रेणीत पनवेल रेल्वे स्थानकाचा समावेश आहे.

### असे झाले सर्वेक्षण

रेल्वे मंत्रालयाच्या वतीने २०१६ पासून 'स्वच्छ रेल स्वच्छ भारत' योजनेंतर्गत देशभरातील रेल्वे स्थानकांचे विविध मानकांवर नामांकित संस्थेच्यावतीने सर्वेक्षण करण्यात येते. या वर्षीही देशातील रेल्वे स्थानकांचे दोन श्रेणींमध्ये सर्वेक्षण करण्यात आले. ज्या रेल्वे स्थानकांहून वर्षाकाठी ५० कोटींपेक्षा जास्त प्रवाशी प्रवास करतात अशा रेल्वे स्थानकांना 'अ १' श्रेणी मध्ये तर ६ ते ५० कोटी प्रवाशी प्रवास करणाऱ्या रेल्वे स्थानकांना 'अ' श्रेणी मध्ये ठेवण्यात आले. रेल्वे स्थानका शेजारील खुल्या परिसरात स्वच्छतागृह, मुख्य प्रवेशद्वाराशेजारी स्वच्छतागृह व अन्य स्वच्छता. तसेच रेल्वे स्थानकावर खुल्या ठिकाणी आसन व्यवस्था, विक्रेत्यांची व्यवस्था, स्वच्छतागृहांची व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची सोय, प्रतिक्षालय, रेल्वे रूळ आणि पादचारी आदी बाबींचे सर्वेक्षण होऊन या रेल्वे स्थानकांचे मानांकन ठरवण्यात आले आहे.

## घाटांमधील अपघात रोखण्यासाठी तज्ज्ञ समिती

**राज्यातील** घाटांमधील वाढते अपघात रोखण्यासंदर्भात उपाययोजना सुचवण्यासाठी एका तज्ञ समितीची स्थापना करण्याचा निर्णय राज्य रस्ते सुरक्षा परिषदेच्या नुकत्याच झालेल्या बैठकीत घेण्यात आला. आंबेनळी घाटात झालेल्या गंभीर अपघाताबाबत परिवहन मंत्री दिवाकर रावते यांनी यावेळी काळजी व्यक्त केली. समितीमध्ये संबंधीत विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी, रस्ता संरक्षासंदर्भातील तज्ञ आदींचा समावेश करण्यात यावा आणि समितीने सहा महिन्यात शासनास अहवाल सादर करावा, अशा सूचना या वेळी मंत्रिमहोदयांनी दिल्या.

महाराष्ट्रातील ६६ टक्के अपघाती मृत्यू हे मोटारसायकल, सायकल आणि पादचाऱ्यांच्या अपघातातील आहेत. अपघाती मृत्यूंच्या संख्येत देशात महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर आहे. महाराष्ट्रात महामार्गांची संख्या १५ टक्के असली तरी महामार्गांवर होणाऱ्या अपघातांची संख्या ५७ टक्के इतकी आहे. इतर मार्गांवरील अपघातांची संख्या ३३ टक्के इतकी आहे, अशी माहिती या वेळी झालेल्या सादरीकरणात देण्यात आली. रस्त्यांचा दर्जा सुधारतो तसा त्यावर चालणाऱ्या वाहनांचा वेग वाढतो. महामार्गांवरील रस्ते अपघातामध्ये वाहनांचा अती वेग हे एक प्रमुख कारण ठरत असून हे रोखण्यासाठी परिवहन, सार्वजनिक बांधकाम, वाहतूक पोलीस आदींनी एकत्र येऊन समन्वयाने काम करणे आवश्यक आहे.

## बाईक ॲम्ब्युलन्समुळे रुग्णांना जीवनदान

**मोटार** बाईक ॲम्ब्युलन्स सेवा सुरू झाल्यानंतरच्या एक वर्षाच्या कालावधीत सुमारे ३ हजार ६०० रुग्णांना जीवनदान मिळाले आहे. वर्षभरात मुंबईत नव्याने १० तर मेळघाट आणि पालघर येथे प्रत्येकी पाच अशा एकूण ३० बाईक ॲम्ब्युलन्स राज्यात रुग्णांना सेवा देत आहेत.

गेल्या वर्षी दोन ऑगस्ट ला मुंबईत १० बाईक

नोंदी

## नोंदी

ॲम्ब्युलन्सचा शुभारंभ करण्यात आला. ही सेवा सुरू झाल्याच्या काही तासातच मुंबईतील रेल्वे स्टेशन आणि अरुंद गल्ली, रस्ते येथून वैद्यकीय मदतीसाठी कॉल येऊ लागले. ज्या भागात चार चाकी रुग्णवाहिका पोहचण्यास अडचण निर्माण होते अशा ठिकाणी बाईक ॲम्ब्युलन्स सेवा उपयुक्त असल्याचे दिसून आले. या बाईक ॲम्ब्युलन्सचे चालक डॉक्टर असल्याने आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांना प्रथमोपचार तातडीने मिळत आहेत.

वर्षभराच्या कालावधीत विविध वैद्यकीय आपत्कालीन परिस्थितीत २ हजार ७०० रुग्णांवर उपचार करण्यात आले. अपघाताच्या ३९० रुग्णांना वेळीच वैद्यकीय मदत देण्यात आली. ४२ गरोदर मातांना या ॲम्ब्युलन्सच्या माध्यमातून तत्काळ उपचार करण्यात आले. अन्य ४४२ रुग्णांवर वेळेवर उपचार झाल्याने वर्षभरात सुमारे ३ हजार ६०० रुग्णांना या सेवेमुळे जीवनदान मिळू शकले.

प्रायोगिक तत्त्वावर मुंबई येथे १० बाईक ॲम्ब्युलन्सद्वारे सेवेचा शुभारंभ करण्यात आला. त्याची आवश्यकता लक्षात घेता दोन महिन्यापूर्वी नव्याने आठ ॲम्ब्युलन्स मुंबईत सुरू करण्यात आल्या. आता एकूण १८ ॲम्ब्युलन्सच्या मदतीने रुग्णांना अत्यावश्यक सेवा दिली जात आहे. राज्यातील दुर्गम भागात ही सेवा देण्यासाठी नव्याने १० ॲम्ब्युलन्स सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार मेळघाट येथे पाच आणि पालघर येथे पाच अशा एकूण १० ॲम्ब्युलन्स सुरू करण्यात आल्या.

अमरावती जिल्ह्यातील बैरागड, हरीसाल, हातरु, काटकुंभ, टेंभ्रु सोंडा या प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये ही सुविधा करण्यात आली आहे. गडचिरोली जिल्ह्यातील वडसा देसाईगंज आणि पंढरपूर येथे प्रत्येकी एक बाईक ॲम्ब्युलन्स देण्यात आली. पालघर जिल्ह्यातील गंजाड, मालवाडा, मासवन, नंदगाव, तलवाडा या प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये ही सेवा सुरू करण्यात आली आहे. मुंबईतील वांद्रे पूर्व, मालाड पूर्व, विलेपार्ले पश्चिम, जोगेश्वरी पूर्व, कांदिवली पश्चिम, बोरीवली पूर्व, अंधेरी पश्चिम, प्रभादेवी जी दक्षिण वॉर्ड, मरीन लाईन्स सी वॉर्ड, माहिम पश्चिम, वांद्रे पश्चिम, विक्रोळी पूर्व, सांताक्रूझ पूर्व, कुर्ला पश्चिम, धारावी पोलीस स्टेशन, गोवंडी पश्चिम आणि भांडूप पश्चिम या ठिकाणी बाईक ॲम्ब्युलन्स सेवा देण्यात आली आहे.




**मोटार बाईक ॲम्ब्युलन्स सेवा**

### मुद्रा योजना: महाराष्ट्राची आघाडी

**प्रधानमंत्री** मुद्रा योजनेंतर्गत महाराष्ट्रात जुलै २०१८ अखेर ५७ हजार ४४३ कोटी रुपयांचे कर्ज वितरित करण्यात आले असून आतापर्यंत १ कोटीहून अधिक कर्ज प्रकरणे मंजूर करण्यात आली आहेत. तरुण कर्ज प्रकारात सर्वाधिक १६ हजार ५२९ कोटींचे कर्ज वितरित करून महाराष्ट्र देशात अव्वल राज्य ठरले आहे.

देशातील असंघटित लघू उद्योगांच्या विकासासाठी व त्यांच्या वित्तीय गरजा पूर्ण करण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी एप्रिल २०१५ मध्ये मुद्रा योजना सुरू केली. या योजनेंतर्गत शिशू, किशोर व तरुण या तीन कर्ज प्रकारात ५० हजार ते १० लाख रुपयांपर्यंत कर्ज पुरवठा करण्यात येतो.

मुद्रा योजनेंतर्गत एप्रिल २०१५ ते जुलै २०१८ या कालावधीत १३ कोटी ३७ लाख ८५ हजार कर्ज प्रकरणे मंजूर करण्यात आली. ६ लाख ३२ हजार कोटी रुपयांचे कर्ज आतापर्यंत मंजूर करण्यात आले. जुलै २०१८ अखेर ६ लाख १० हजार कोटीचे कर्ज वितरित करण्यात आले.

महाराष्ट्रात एप्रिल २०१५ ते जुलै २०१८ अखेर मुद्रा योजनेची १ कोटी १४ लाख ४७ हजार २३७ प्रकरणे मंजूर करण्यात आली आहेत. या कर्ज प्रकरणांसाठी आतापर्यंत ५९ हजार कोटी रुपये मंजूर करण्यात आले. प्रत्यक्षात ५७ हजार ४४३ कोटीचे कर्ज वितरण जुलै २०१८ अखेरपर्यंत करण्यात आले.

असंघटित लघू उद्योगांना तरुण कर्ज प्रकारात ५ ते १० लाख रुपयांचे कर्ज देण्यात येते. महाराष्ट्रात या कर्ज प्रकारात गेल्या तीन वर्षात २ लाख २५ हजार २२३ कर्ज प्रकरणे मंजूर करण्यात आली. यासाठी १७ हजार ११९ कोटी रुपये मंजूर करण्यात आले व जुलै अखेर १६ हजार ५२९ कोटी रुपये वितरित करण्यात आले.

शिशू कर्ज प्रकारात ५० हजारापर्यंत कर्ज पुरवठा

करण्यात येतो. महाराष्ट्रात या कर्ज प्रकारात आजपर्यंत १ कोटी ४ लाख ८ हजार प्रकरणे मंजूर करण्यात आली. जुलै अखेर या कर्ज प्रकारात २४ हजार १६८ कोटी




रुपयांचे कर्ज मंजूर करण्यात आले. प्रत्यक्षात २३ हजार ७८२ कोटी रुपये वितरित करण्यात आले.

किशोर कर्ज गटात ५० हजार ते ५ लाख रुपयांचे कर्ज देण्यात येते. महाराष्ट्रात एप्रिल २०१५ ते जुलै २०१८ या कालावधीत ८ लाख ३ हजार ९५० कर्ज प्रकरणे मंजूर करण्यात आली. या कर्ज प्रकरणांसाठी १७ हजार ७४१ कोटी रुपये कर्ज मंजूर करण्यात आले. जुलै अखेरपर्यंत १७ हजार १३० कोटी रुपये वितरित करण्यात आले.

मुद्रा योजनेत महाराष्ट्रात जानेवारी ते जुलै २०१८ या सात महिन्याच्या कालावधीत १४ हजार ५८२ कोटी रुपयांचे कर्ज वितरण करण्यात आले. तरुण कर्ज प्रकारात गेल्या सात महिन्यात ४ हजार ३५३ कोटी, किशोर कर्ज गटात ५ हजार १७४ कोटी आणि शिशू कर्ज गटात गेल्या सात महिन्यात ५ हजार ५५ कोटी रुपयांचे कर्ज देण्यात आले.

## निर्भया फंड : मुंबईसाठी २२५ कोटी

**देशातील** प्रमुख आठ शहरांमधील महिलांना अधिक सुरक्षा प्रदान करण्यासाठी, केंद्रशासनाने महत्त्वाचे पाऊल उचलत निर्भया फंड अंतर्गत २ हजार ९१९ कोटी ५५ लाख रुपयांचा निधी वितरित केला असून मुंबई शहरासाठी २२५ कोटींचा निधी दिला आहे.

केंद्रीय महिला व बाल कल्याण मंत्रालयाने, महिलांसाठी सुरक्षित शहर बनवण्यासाठी देशातील प्रमुख आठ शहरांची निवड केली. मुंबईसह, दिल्ली, चैन्नई, अहमदाबाद, कोलकत्ता, बंगळुरू, हैदराबाद आणि लखनऊ या शहरांचा समावेश आहे.

निर्भया फंड अंतर्गत मुंबई शहरातील गुन्हे प्रवण भागात जीआयएस मॅपिंग सेवा उभारण्यासाठी, सीसीटीव्ही



कॅमेरे लावण्यासाठी, गुन्हे तपास अधिकारी व विधी विभागाच्या अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी निधी देण्यात आला.

## स्वातंत्र्यसैनिकांचा सन्मान

**'भारत छोडो'** आंदोलन, गोवा मुक्ती, हैदराबाद मुक्ती आंदोलनात मोलाचे योगदान देणाऱ्या महाराष्ट्रातील १० स्वातंत्र्यसैनिकांचा राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या हस्ते राष्ट्रपती भवन येथे सन्मान करण्यात आला.

क्रांतिदिनाचे औचित्य साधून भारत छोडो आंदोलनाच्या ७६ व्या स्मृतिदिनानिमित्त राष्ट्रपती भवनात स्वातंत्र्यसैनिकांच्या सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.

सन्मान झालेल्या स्वातंत्र्य सैनिकांमध्ये महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्यातील कुपवाड येथील देवाप्पा खोत, नागपूर जिल्ह्यातील गणपतराव गभणे, परभणी जिल्ह्यातील डॉ. अवधूतराव डावरे आणि वसंत अंबुरे, मुंबईतील गदाधर गाडगीळ आणि अनंत गुरव, पुणे जिल्ह्यातील बाळासाहेब जांभूळकर, अरविंद मनोलकर, वसंत प्रसादे तसेच कोल्हापूर जिल्ह्यातील वसंतराव माने यांचा समावेश आहे.

स्वातंत्र्यसैनिक देवाप्पा खोत हे सांगली जिल्ह्यातील कुपवाड येथील आहेत. सध्या ९९ वर्षांचे आहेत. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात श्री. खोत यांनी कुपवाड सेंटर (चावडी) येथे झालेल्या बॉम्बस्फोटामध्ये सहभाग घेतला होता. कुपवाड येथून जवळ असणारे माधवनगर येथे रेल्वेरुळ त्यांनी उद्ध्वस्त केले होते. तसेच तत्कालीन धुळे कोषागार कार्यालयालाही हानी पोहोचवली होती.

स्वातंत्र्यसैनिक गणपतराव गभणे, नागपूर जिल्ह्यातील आहेत सध्या ते सुमारे ८० वर्षांचे असून आजही त्यांच्या आवाजात दम आहे. गोवा मुक्ती आंदोलनात श्री. गभणे यांनी सक्रिय सहभाग नोंदवला होता. १५ ऑगस्ट १९५५ ला कॉम्रेड हेमंतकुमार बसू यांच्या नेतृत्वामध्ये दोडामार्गे आईखेडा येथून त्यांनी गोव्याच्या जंगलात जाऊन सत्याग्रह केला. पोर्तुगीज पोलिसांनी त्यांना खूप मारहाण केली होती. हैदराबाद मुक्ती आंदोलनातही श्री. गभणे त्यांनी हिरिरीने भाग घेतला होता.

स्वातंत्र्यसैनिक डॉ. अवधूतराव डावरे हे परभणी जिल्ह्यातील आहेत. श्री. डावरे यांनी १९३८ ते १९४८ पर्यंत झालेल्या विविध आंदोलनात भाग घेतला होता. १९४२ च्या 'चले जाव' आंदोलनात सत्याग्रहींना त्यांनी मार्गदर्शन केले तसेच परभणीमध्ये झालेल्या या आंदोलनाचे नियोजन केले. तत्कालीन इंग्रजी शाळा, महाविद्यालयामध्ये जनजागृती करून त्यांनी शाळा बंद पाडल्या. विदेशी वस्त्र आणि वस्तूंची होळी केली होती. झेंडा सत्याग्रहातही श्री. डावरे यांनी सक्रिय सहभाग घेतला होता. शासकीय कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा कोषागार कार्यालय, पोलीस अधीक्षक कार्यालय,

नोंदी

# नोंदी

जिल्हा कारागृहात पोलीस स्टेशनवर तिरंगा ध्वज फडकविला होता. त्यांनी २ वर्ष सक्तमजुरीची शिक्षा भोगली. हैदराबाद मुक्ती


अरविंद मनोलकर


बाळासाहेब जांभुळकर


देवाप्पा खोत



डॉ. अवधूतराव डावरे


गदाधर गाडगीळ


गणपतराव गभणे


अनंत गुरव


वसंत अंबुरे


वसंत प्रसादे


वसंतराव माने

संग्रामात त्यांनी लोणी कॅम्पमध्ये रझाकारांशी मुकाबला केला होता.

स्वातंत्र्यसैनिक वसंत अंबुरे हे परभणी जिल्ह्याचे आहेत. त्यांचे वडील चंद्रनाथ अंबुरे हे सक्रिय स्वातंत्र्यसैनिक होते. १९४७ मध्ये वसंत अंबुरे यांचे वडील परभणी आणि औरंगाबाद या तुरुंगात होते. त्या वेळी श्री. वसंत अंबुरे यांनी भूमिगत राहून स्वातंत्र्यसंग्रामाचे कार्य पूर्ण केले. हैदराबादमुक्ती संग्रामातही वसंत अंबुरे यांनी सक्रिय सहभाग घेतला होता.

स्वातंत्र्यसैनिक गदाधर गाडगीळ मुंबई येथे स्थायिक असून सध्या ८८ वर्षांचे आहेत. श्री. गाडगीळ हे आपल्या काही मित्रांसोबत गोवा मुक्ती संग्राममध्ये सहभागी झाले होते. १५ ऑगस्ट १९५४ ला 'पोर्तुगीज चले जाव' या नाऱ्याने सत्याग्रहाची सुरुवात केली. या संग्रामात गोळीबार झालेला होता. १९ सप्टेंबर १९५४ मध्ये त्यांना कैदही झाली होती.

स्वातंत्र्यसैनिक वसंत प्रसादे, अरविंद मनोलकर आणि बाळासाहेब जांभुळकर या तिन्ही स्वातंत्र्यसैनिकांनी दादरा-नगर हवेलीच्या संग्रामात १९५४ मध्ये सक्रिय सहभाग नोंदवून लढा यशस्वी केला.

स्वातंत्र्यसैनिक अनंत गुरव यांनी १९५४ च्या दादरा नगरहवेलीच्या आंदोलनात भाग घेतला. फ्रान्सिस मस्करान्स आणि तानाजी रावराणेजींच्या नेतृत्वात सत्याग्रही तुकडीसोबत दादरा नगरहवेलीमध्ये शिरले. यामध्ये पोलिसांद्वारे झालेल्या गोळीबारात श्री. गुरव यांच्या उजव्या हातावर गोळी लागली होती. ३ जानेवारी १९५५ ला श्री. गुरव यांनी होडीतून तानाजी रावराणेजी यांच्या सोबत गोव्याच्या हद्दीत प्रवेश केला आणि राष्ट्रध्वज फडकविला. ऑगस्ट १९५५ च्या पहिल्या आठवड्यात बांदा-पत्रादेवी येथे झालेल्या सत्याग्रहात सामील झाले होते. या सत्याग्रहात श्रीमती सहोदरा रॉय या जखमी महिलेला वाचविताना श्री. गुरव यांना पायावर गोळी लागली. श्री गुरव हे मुंबईत वास्तव्यास आहेत.

स्वातंत्र्यसैनिक वसंतराव माने हे कोल्हापूर जिल्ह्यातील आहेत. ते आपल्या २७ सहकाऱ्यांसोबत गोवा मुक्ती आंदोलनात सहभागी झाले. महात्मा गांधीजींच्या अहिंसात्मक मार्गाने या आंदोलनाचे नेतृत्व त्यांनी केले. यामध्ये पोर्तुगीज सैन्याकडून आंदोलनकर्त्यांवर गोळ्या घातल्या गेल्या होत्या. मात्र, श्री. माने यांच्या नेतृत्वात असणाऱ्या सत्याग्रहींनी जीवाची पर्वा न करता गोवा मुक्ती संग्रामचे आंदोलन सुरू ठेवले. गोव्यातील एका गावात या सत्याग्रहींनी राष्ट्रध्वज फडकविला. याची माहिती जेव्हा पोर्तुगीज सैनिकांना मिळाली. तेव्हा, त्यांनी श्री. माने यांच्यासह त्यांच्या सहकाऱ्यांना बेदम मारहाण करून गोव्याच्या सीमेबाहेर हाकलून लावले.

## उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती

**खुल्या** तसेच अन्य मागास प्रवर्गातील गुणवंत विद्यार्थ्यांना आर्थिक परिस्थितीमुळे परदेशातील नामांकित विद्यापीठातील उच्च शिक्षणापासून वंचित राहावे लागू नये, यासाठी राज्य शासनाकडून अशा विद्यार्थ्यांना परदेशी शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे. याबाबतच्या योजनेस मंत्रिमंडळ बैठकीत नुकतीच मंजुरी देण्यात आली.

अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना लागू असलेल्या परदेशी शिष्यवृत्तीच्या धर्तीवर खुल्या तसेच अन्य मागास प्रवर्गातील मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्यासाठी यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून ही योजना सुरू करण्यात येणार आहे. या योजनेच्या लाभार्थ्यांची कमाल मर्यादा प्रतिवर्षी २० इतकी राहील. त्यापैकी १० विद्यार्थी खुल्या प्रवर्गाचे असतील तर उर्वरित १० विद्यार्थी इतर मागास वर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गाचे एकत्रितरीत्या राहतील. खुल्या प्रवर्गातून लाभ घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी त्यांचे व त्यांच्या पालकांचे सर्व प्रकारचे एकत्रित वार्षिक उत्पन्न २० लाख रुपयांपेक्षा जास्त नसावे. या योजनेखाली इतर मागास वर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातून लाभ घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहणार आहे. या योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्याने अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर त्याच्या शिक्षणाचा फायदा राज्य शासनास या

योजनेंतर्गत, खुल्या व अन्य मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना परदेशातील नामांकित विद्यापीठामध्ये पदवी, पदव्युत्तर पदवी व पी.एच.डी. या अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी शिष्यवृत्ती देण्यात येईल.

शिष्यवृत्तीचा कमाल कालावधी पी.एच.डी. साठी ४ वर्ष, पदव्युत्तर पदवीसाठी २ वर्ष आणि पदव्युत्तर पदविकेसाठी १ वर्ष इतका राहणार आहे. एकूण लाभार्थ्यांपैकी ३० टक्के जागा मुलींसाठी राखीव ठेवण्यात येतील. योजनेच्या लाभासाठी दहावी, बारावी, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांमध्ये मिळालेले गुण आणि प्रवेश मिळालेल्या विद्यापीठाचे जागतिक नामांकन विचारात घेऊन गुणवत्ता यादी तयार करण्यात येणार आहे. ही योजना राबवण्यासाठी अंदाजे २० कोटींची तरतूद करण्यात येईल.



## सेंद्रिय शेतीच्या प्रसारासाठी मिशन

**राज्यातील** शेती क्षेत्रात रासायनिक खतांचा असंतुलित वापर तसेच किटकनाशकांचा अतिप्रमाणात आणि अनावश्यक वापर रोखण्यासाठी सेंद्रीय शेतीला मोठ्या प्रमाणावर चालना देण्यात येणार आहे. त्यानुसार सेंद्रीय शेती–विषमुक्त शेतीच्या राज्य पुरस्कृत योजनेंतर्गत 'डॉ.पंजाबराव देशमुख जैविक शेती मिशन,' स्थापन करण्यात येईल. या मिशनच्या माध्यमातून सेंद्रीय शेतीच्या प्रसारासोबतच त्यातील शेती मालाच्या वितरणासाठी व्यवस्था निर्माण करण्यात येईल. यामुळे विषमुक्त फळे, भाजीपाला आणि अन्नधान्य उपलब्ध होणार आहे.

पहिल्या टप्प्यात बुलडाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ व वर्धा या विदर्भातील शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांपासून योजनेची अंमलबजावणी करण्यात येईल. त्यानंतर टप्प्याटप्प्याने इतर जिल्ह्यातही व्याप्ती वाढवण्यात येईल. सेंद्रीय शेतीसाठी कमी खर्चाचे तंत्रज्ञान विकसित करून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यात येईल.

## बियाणे उत्पादकांना फरकाची रक्कम

**राज्याला** बियाणे उत्पादनात स्वयंपूर्ण करण्यासह आगामी हंगामात शेतकऱ्यांना माफक दरात पुरेसे बियाणे उपलब्ध करून देण्यासाठी, शासनाकडून शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यात येईल. त्याअंतर्गत प्रमाणित व पायाभूत बियाण्यांचे उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांना किमान आधारभूत किंमत व कृषी उत्पन्न बाजार समितीने घोषित केलेला सरासरी दर यामधील फरकाची रक्कम देण्यासाठी नवी योजना लागू करण्याचा निर्णय नुकताच घेण्यात आला.

अकोला येथील महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित (महाबीज) आणि पुणे येथील राष्ट्रीय बीज निगम यांच्यामार्फत बिजोत्पादक शेतकऱ्यांकडून प्रमाणित व पायाभूत दर्जाच्या बियाण्यांचे दरवर्षी मोठ्या प्रमाणावर उत्पादन करून घेतले जाते. त्यानंतरच्या हंगामात ते राज्यातील शेतकऱ्यांना माफक दरात उपलब्ध करून दिले जाते. परंतु सध्याच्या स्थितीमध्ये कृषी उत्पन्न बाजार समितीमधील जवळपास सर्वच पिकांचे अधिकाधिक असलेले बाजारभाव हे किमान आधारभूत किंमतीपेक्षा कमी असल्यामुळे बाजारभाव व किमान आधारभूत किंमत यामध्ये यावर्षी मोठ्या प्रमाणात तफावत येत आहे. त्यामुळे बियाणे उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान सोसावे लागून त्याचा परिणाम पुढील हंगामात बियाण्यांच्या उपलब्धतेवर होऊ शकतो.

या पार्श्वभूमीवर बियाणे उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहित करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला.

## ऊर्जा कार्यक्षमता : महाराष्ट्र अग्रेसर

**ऊर्जा** बचत व कार्यक्षमता क्षेत्रात नवी नाम मुद्रा उमटवत महाराष्ट्र देशात अग्रेसर ठरले आहे. देशात ऊर्जा बचतीच्या दिशेने महत्त्वाचे पाऊले उचलत निती आयोगाने प्रथमत:च राज्यांचा ऊर्जा कार्यक्षमता सज्जता निर्देशांक तयार केला आहे. केंद्रीय ऊर्जा मंत्रालयांतर्गत कार्यरत ऊर्जा दक्षता ब्यूरोच्या सहकार्याने देशातील सर्वच राज्यांकडून माहिती संकलित करण्यात आली. या माहितीच्या आधारावर ऊर्जा बचतीच्या क्षेत्रातील अग्रेसर राज्यांची निवड करण्यात आली असून, यात महाराष्ट्राचा समावेश आहे. महाराष्ट्रासह अग्रेसर राज्यांमध्ये आंध्रप्रदेश, केरळ, पंजाब आणि राजस्थान या राज्यांचाही समावेश आहे.

या निर्देशांकात बांधकाम, उद्योग, कृषी, महानगरपालिका आणि वाहतूक क्षेत्रांमध्ये विविध ६३ निकष व ४ विश्लेषणात्मक निर्देशाकांनुसार परीक्षण करण्यात आले. त्यानुसार देशातील सर्व राज्यांना चार श्रेणींमध्ये विभागण्यात आले. अग्रेसर राज्य, साध्यक राज्य, स्पर्धक आणि आकांक्षित अशा चार श्रेणींमध्ये ही विभागणी करण्यात आली आहे.

नोंदी

# समस्या इलेक्ट्रॉनिक कचऱ्याची

**पूर्वी विहिरींमधून पाणी उपसून कोणत्याही प्रकारच्या शुद्धीकरणाशिवाय पिण्यासाठी वापरात येत असे. मात्र, आज सर्व ठिकाणी शुद्धीकरणाच्या विविध प्रक्रिया केल्याशिवाय पाणी पिण्यायोग्य होत नाही. असे का? पर्यावरणातील इतर असंख्य कारणांपैकी एक कारण म्हणजे, इलेक्ट्रॉनिक-कचरा किंवा आपण 'इलेक्ट्रॉनिक-वेस्ट', असे म्हणू. नेहमीच्या घरगुती कचऱ्यामध्ये तुम्ही जी बिघडलेली इलेक्ट्रॉनिक उपकरणं, संपलेल्या बॅटरीज किंवा सेल टाकता त्यामुळे त्या इलेक्ट्रॉनिक वस्तूंमध्ये असलेले निरनिराळे धातू, मुख्यतः, 'शिसे' हा विषारी आणि स्वास्थ्याला हानिकारक असा धातू असतो, जो जमिनीशी संपर्कात आला की, भूमिगत पाण्यामध्ये सहजरीत्या मिसळला जातो. ते पाणी दूषित आणि पिण्यासाठी हानिकारक बनते.**

**ॲड. प्रशांत माळी**

ई-वेस्ट या शब्दाचा शोध अलीकडेच लागला आहे, असे म्हणायला हरकत नाही. पर्यावरण विषयक संशोधन करता करता कोणी एका संशोधकाने असे भाकीत केले होते की, २०१७ सालापर्यंत जगातील परिसरात ई-वेस्टचा उकिरडा सुमारे तीन पटींनी वाढेल. या भाकिताचा नेमका संदर्भ माझ्याजवळ जतन केलेला नाही, अन्यथा वाचकवर्गासाठी तो संदर्भ मी नक्कीच उपलब्ध करून दिला असता. अगदीच तिपटीने नसला तरी आज धरतीवरील ई-वेस्ट प्रचंड प्रमाणात वाढत चालले आहे. आता हे ई-वेस्ट का वाढत चालले आहे, तर याचे कारण आहे, जलदगतीने प्रगत होत असणारे तंत्रज्ञान आणि या आधुनिक तंत्रज्ञानाला साजेसे नवीन उपकरण असावे म्हणून निकामी ठरणारी प्रचलित उपकरणे! या अनुषंगाने सर्वोत्तम उदाहरण द्यायचं म्हणजे आपले स्मार्टफोन्स !!

निकामी ठरवून तुम्ही फेकून दिलेल्या प्रत्येक इलेक्ट्रॉनिक वस्तूला ई-वेस्ट असे म्हटले जाते. ई-वेस्टची विल्हेवाट लावण्यासाठी विशिष्ट प्रक्रिया अवलंबिली जाणे आवश्यक आहे. त्यांचा निचरा इतर कचऱ्यासोबत न करता त्याचा निचरा होण्यासाठी भिन्न अशा प्रक्रिया वापरल्या पाहिजेत. परंतु, प्रगत देशांमध्येसुद्धा या विषारी आणि हानिकारक अशा कचऱ्याच्या विल्हेवाटीसंदर्भात कडक नियम आजतागायत अस्तित्वात नाहीत.



अमेरिकेतील पर्यावरण संवर्धन संस्थेच्या म्हणण्यानुसार जवळपास ३० दशलक्ष संगणक दरवर्षी निकामी म्हणून फेकले जातात. यांपैकी, २०% पेक्षाही कमी संगणकांचे पुनर्नविनीकरण करण्यात येते. युरोपमध्ये सुमारे १०० दशलक्ष मोबाइल फोन्स टाकून दिले जातात.

कालबाह्य झालेली आणि फेकून देण्यात आलेली इलेक्ट्रॉनिक उपकरणे पर्यावरणातील जागा वेगाने व्यापत आहेत. निष्काळजीपणे फेकल्या गेलेल्या काही उपकरणांमध्ये बेरिलियम, कॅडमियम, पारा आणि शिसे यांसारखे घातक घटक असतात. या घटकांना वातावरणात संमिश्र होण्यासाठी अवकाश लागत असला तरी खूप जास्त प्रमाणात जेव्हा हे वातावरणात मिसळले जातात, तेव्हा पर्यावरणाची होणारी हानी नक्कीच विलक्षण असते. ई-वेस्टच्या अयोग्य विल्हेवाटीमुळे पर्यावरणाचा ऱ्हास तर होतोच पण त्याचबरोबर त्यांच्या पुनर्वापराची संधी दवडली जाते. जवळजवळ सर्वच ई-वेस्टमध्ये पुनर्वापर करता येईल, असे घटक थोड्या प्रमाणात का होईना, असतातच.

## आरोग्यावर होणारे ई-वेस्टचे दुष्परिणाम

संगणक आणि दूरदर्शन संचामध्ये वापरल्या जाणाऱ्या धातूंचा मानवी आयुष्यावर काय परिणाम होतो, याचा आपण थोडक्यात आढावा घेऊ. संगणकाच्या मदरबोर्डवर आणि टीव्हीमध्ये जो डाकाचा धातू वापरला जातो, त्यात शिस्याचे प्रमाण खूप असते. तसेच संगणकाच्या मॉनिटर्सच्या बॅटरीमध्ये सुद्धा शिसे वापरले जाते आणि हे शिसे सभोवतालची हवा दूषित करते. केवळ हवाच नाही, तर पाणी आणि जमीन देखील दूषित करते. या ई-वेस्टमुळे मानवी मेंदूच्या विकासाच्या प्रक्रियेत विकृती येऊ शकते, मध्यवर्ती मज्जासंस्थेवर तसेच मूत्रपिंडांवरदेखील विपरित परिणाम होऊ शकतो.

शिस्याची ही विषबाधा ई-वेस्टचा सर्वात मोठा दुष्परिणाम

आहे. शिस्याव्यतिरिक्त संगणकाच्या मदरबोर्डमध्ये पारा हा धातू मोठ्या प्रमाणात आढळतो. त्याच्या अयोग्य निचऱ्यामुळे त्वचा आणि श्वसनविषयक विकार होऊ शकतात. पाऱ्याच्या विषबाधेमुळे मेंदूला तीव्र दुखापती होऊ शकतात.

इलेक्ट्रॉनिक उपकरणांमधील विविध केबल्स आणि काचा जेव्हा वातावरणामधील ऑक्सिजन तसेच आर्द्रतेसोबत मिसळतात तेव्हा तेथील माती इतकी हानिकारक बनते की ती घरं बांधण्यासाठी देखील उपयोगात आणली जाऊ शकत नाही. समजा अशी दूषित माती वापरून घरे बांधलीच, तर त्या घरातील हवेचा श्वास घेणारी माणसे प्रजननासंबंधी तसेच शारीरिक अवयवांच्या योग्य विकासासंबंधी अनेक आजारांना बळी पडू शकतात. त्यामुळे रोगप्रतीकारक क्षमतासुद्धा खालावते. काचा आणि अन्य स्वरूपातील प्लास्टिक घटकांमुळे दूषित झालेल्या हवेमुळे तणाव, चिंता आणि इतर मानसिक आजार वाढू शकतात.

संगणकामधील मदरबोर्ड सर्किटमधून निघणाऱ्या तीव्र वासाच्या वायूमुळे फुफ्फुसांचा कर्करोग होऊ शकतो. याव्यतिरिक्त त्वचेचे आजार आणि धोकादायक ॲलर्जीदेखील होऊ शकतात.

## ई-वेस्टचे माहेरघर

इंटरनेटच्या सर्व क्षेत्रातील व्यापकतेमुळे जगभरातील ई-वेस्टचे प्रमाण वाऱ्याच्या वेगाने वाढत चालले आहे, असे म्हणता येईल. इंटरनेट-आधारित इलेक्ट्रॉनिक उपकरणे आणि यंत्रे यांच्यावरील वाढत चाललेली निर्भरता वर्षानुवर्षे प्रचंड प्रमाणात इलेक्ट्रॉनिक कचऱ्याची निर्मिती करीत आहेत. उदाहरणादाखल सांगायचे झाले, तर संयुक्त राष्ट्रसंघाच्या पर्यावरणविषयक कार्यक्रमाच्या अहवालानुसार, २०२० पर्यंत तिथल्या जुन्या संगणकांचे ई-वेस्ट २००७ च्या तुलनेत २००% ते ४००% इतके वाढलेले असेल, तर ५००% पर्यंतची वाढ ही भारतामध्ये असेल. चीनमध्ये जुने मोबाइल फोन्स टाकून देण्याचे प्रमाण २००७ च्या तुलनेत ७ पटींनी वाढलेले असेल आणि भारतात ते १८ पटींनी वाढलेले असेल.

ई-वेस्टच्या एकूण कचऱ्यापैकी फक्त पाव भागाचा पुनर्वापर केला जातो. बाकी सर्व ई-वेस्ट इतर कचऱ्यासोबत जाळले जाते. पर्यावरण आणि आरोग्यासंबंधीच्या मोठ्या अडचणी या कारणामुळेच भविष्यात उभारून येतील. इलेक्ट्रॉनिक वेस्ट जेव्हा कमी तापमानात जाळले जाते, तेव्हा त्यातून अधिक विषारी वायूंची निर्मिती होते. या विषारी वायूंमुळे जीवघेण्या आजारांची लागण मानवी जीवांना होऊ शकते. ई-वेस्टमधील काही घटक ज्वलनानंतरदेखील संपूर्णपणे नष्ट होत नाहीत, ते फक्त त्यांचे स्वरूप बदलतात आणि वातावरणात त्यांचे अस्तित्व कायम ठेवतात.

आशिया खंडामधील चीन, भारत आणि पाकिस्तान हे तीन देश ई-वेस्ट जमा होण्याचे आघाडीचे देश आहेत. ई-वेस्ट जाळून त्या ठिकाणची माती, हवा, पाणी आणि जीवसृष्टी सर्वच दूषित होत चालले आहे. पश्चिम आफ्रिकी किनाऱ्यालगत असलेल्या 'घाना' नामक प्रदेशात तर खूप मोठ्या प्रमाणात ई-वेस्टचा साठा केला जातो.

सायबर गुरू

## ई-वेस्टचा निचरा

ई-वेस्टमुळे निर्माण होणाऱ्या अडचणींवर मात करण्यासाठी अजून तरी प्रतिबंधात्मक उपाय अमलात आणले जात नाही आहेत. माझ्या मते, या ई-वेस्टचा योग्य प्रकारे निचरा करण्यासाठी आपणासमोर दोन पर्याय आहेत, ते म्हणजे पुनर्वापर आणि नूतनीकरण.

ई-वेस्टचा पुनर्वापर म्हणजे टाकून देण्यात आलेल्या इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा विविध प्रक्रिया करून उपयुक्त अशा उपकरणात रूपांतर करणे. पुनर्वापराचा पर्याय अवलंबला गेला तर ई-वेस्ट करवी होणारी मानवी आणि पर्यावरण हानी बऱ्याच प्रमाणात आटोक्यात येईल.

ई-वेस्टमधील बरेच घटक असेही असतील की ज्यांचा पुनर्वापर करून काही उपयुक्त उपकरणे बनणार नाहीत. अशा घटकांचा वापर उत्पादकांनी शक्य तितका टाळावा आणि त्या ऐवजी इलेक्ट्रॉनिक उपकरणांमध्ये पुनर्वापर करता येईल असेच घटक वापरून त्यांची निर्मिती करावी, जेणेकरून इलेक्ट्रॉनिक कचऱ्याचे रूपांतर काही टिकाऊ वस्तूंमध्ये केले जाईल. पर्यावरण आणि जीवसृष्टी या दोन्हींचे संवर्धनदेखील केले जाईल.

टाकाऊ इलेक्ट्रॉनिक वस्तूंचे नूतनीकरण केले तर त्या नवीन वस्तू स्वस्त दरात विकल्या जाऊ शकतात. यामुळे पर्यावरणाचे आणि समाजाचे, दोन्हींचे स्वास्थ्य राखले जाईल. बिघडलेला किंवा जुना टीव्ही असाच कचऱ्यात फेकण्यापेक्षा एखाद्या कारागिराला बोलावून त्यामध्ये काही नूतनीकरण करता येईल का किंवा त्यातील बिघाड दुरुस्त करून कोणा एका गरिबाला टीव्ही दिला जाऊ शकेल का, असा विचार आपण करणे गरजेचे आहे. प्रत्यक्षपणे हा उपाय कितपत लोकांच्या पचनी पडेल ही शंकाच आहे; पण मला वाटते की, प्रत्येक विक्रेत्याने नूतनीकरणाचा पर्याय त्यांच्या ग्राहकांसमोर ठेवावा. मायक्रोसॉफ्ट कंपनीने नूतनीकरणाला अनुसरून एक पाऊल पुढे केले आहे. यामध्ये त्यांच्या ग्राहकांच्या संगणकातील निकामी भाग नवनिर्मित केले जातात आणि संगणक पुन्हा कार्यशील बनवला जातो.

## ई-वेस्ट अडचणीवर मात


ई-वेस्ट समस्येच्या निवारणाची सुरुवात प्रशिक्षण आणि त्याद्वारे होणाऱ्या सवयींमधील बदलांपासून केली जाऊ शकते. वर्तमानपत्रे, बॉटल्स आणि कॅन्स यांचा पुनर्वापर कसा करावा याचे ज्या पद्धतीने प्रशिक्षण दिले जाते तसेच प्रशिक्षण टाकाऊ इलेक्ट्रॉनिक वस्तूंचे टिकाऊ वस्तूंमध्ये करण्यासाठी दिले जाणे आवश्यक आहे. प्रशासनाने या ई-वेस्टचा गांभीर्याने विचार करून त्या संदर्भात कायदेप्रणाली बनवणे ही काळाची गरज आहे.

**(लेखक हे सायबर कायदा आणि सुरक्षा तज्ज्ञ आहेत.)**

# मिशन.. शेतीच्या भविष्यासाठी!

**'राष्ट्रीय शेतकरी आयोगा'च्या शिफारसी प्रधानमंत्र्यांनी गंभीरपणे घेतल्या असून, त्यामधून शेती व शेतकऱ्यांचे नवे भविष्य घडेल...**

**डॉ. एम. एस. स्वामीनाथन**



शेती आर्थिकदृष्ट्या अधिक लाभदायक ठरावी तसेच तरुण पिढीला कृषिउद्योगात रस असावा यासाठी सूचना करण्यासाठी तसेच कृषक कुटुंबांच्या समस्या जाणून घेण्याकरिता अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने राष्ट्रीय शेतकरी आयोग (एनसीएफ) २००४मध्ये नेमला. स्वतंत्र भारताच्या इतिहासात प्रथमच तत्कालीन कृषिमंत्री राजनाथ सिंह यांच्या नेतृत्वाखाली तो काम करू लागला. या आयोगाने २००६ साली दिलेल्या अहवालात केवळ कृषिविकासाच्या शिफारसी नव्हत्या तर शेती करणाऱ्या कुटुंबांच्या आर्थिक सुदृढतेसाठीही अनेक सूचना होत्या. 'एनसीएफ'ने शेतकऱ्यांच्या आर्थिक कल्याणासाठी निश्चित केलेले महत्त्वाचे ध्येय म्हणजे शेतकऱ्याला किमान निव्वळ मिळकत व्हायला हवी आणि कृषिविकास हा त्या मिळकतीत होत असलेल्या वृद्धीनुसार मोजला जावा.

## महत्त्वाची ध्येये

अन्य महत्त्वाची ध्येयेही त्यात अधोरिखित करण्यात आली. त्यातील काही प्रमुख मुद्दे असे–कृषिधोरण आखताना किंवा कृषिसंबंधी कोणताही कार्यक्रम ठरवताना त्यात मानवी स्तरावर कोणताही लिंगभेद नसावा हे पाहणे, शेतकऱ्यांना मुख्य प्रवाहात आणताना ग्रामीण भागात शेतीवर नीट गुजराण करता येईल हे पाहणे, एक नि:संशय लक्ष्य त्यांच्यापुढे ठेवणे, भूमिसुधारणांचा अपुरा अजेंडा पूर्ण करणे आणि सर्वंकष मालमत्ता तसेच मत्स्योत्पादनातील विविध सुधारणा करणे. शेतकऱ्यांना सामाजिक सुरक्षा देणारी व्यवस्था तसेच इतर साह्यभूत सेवा विकसित करणे, यांचाही त्यात समावेश होता.

## तातडीच्या गोष्टी

या झाल्या ढोबळ सुधारणा. या व्यतिरिक्तही अनेक गोष्टी आहेत. संवर्धनातील आर्थिक हिस्सेदारी वाढून कृषिव्यवस्थेत उत्पादकता तसेच नफा व स्थैर्य यांच्या वाढीसाठी काही तातडीच्या गोष्टी करणे गरजेचे होते. त्यात पाणी, जमीन, जैविक विविधता आणि हवामान यांचे रक्षण करणे आणि त्यात सुधारणा करणे हे मुख्य. पिके, पशुधन, मत्स्य आणि जंगले यांची जर उत्पादक साखळी तयार झाली तर त्यातून जैवसुरक्षा तर होतेच शिवाय शेतकरी कुटुंबांच्या मिळकतीत व आर्थिक सुरक्षेत वाढ होते. पर्यायाने देशाच्या आरोग्य व व्यापारसुरक्षेत वाढ होते. त्याचप्रमाणे, ग्रामीण भागात सामुदायिक पातळीवरील अन्न, पाणी व ऊर्जासुरक्षा व्यवस्थांना प्रोत्साहन दिले तर प्रत्येक मूल, महिला व पुरुषांच्या पोषणाचीही हमी घेता येते.

## विक्रीव्यवस्थेत शेतकऱ्यांना अधिकार

तरुणांना शेतीकडे आकृष्ट करण्याच्या दृष्टीने 'एनसीएफ'ने काही शिफारसी केल्या. शेतीचे उत्पादन आणि पीक हाती आल्यानंतरच्या विक्रीव्यवस्थेत छोट्या व भूमिहीन शेतकऱ्यांना अधिकार देणे तसेच अर्थकारणात सहभागी करून त्यांना शेती ही बौद्धिकदृष्ट्या आव्हानात्मक आणि आर्थिकदृष्ट्या फलदायी करणे, हे मुद्दे त्यात होते. शेतीच्या अभ्यासक्रमांची तसेच अध्यापनशास्त्र पद्धतींची फेररचना करून होम सायन्समधील



पदवीधरांना उद्योजक बनवण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत. कृषिशिक्षण लिंगभेदापलीकडे नेण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत. शेवटी, शाश्वत शेतीसाठी आवश्यक असलेल्या कृषी, उत्पादने, जैवतंत्रज्ञान व आयसीटीद्वारे विकसित प्रक्रिया यांच्यासाठी भारताला जागतिक निर्यात केंद्र बनवण्याचेही ध्येय त्यात नमूद आहे.

हा एनसीएफ अहवाल २००६ साली आला असला तरी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील विद्यमान सरकारने सूत्रे हातात घेईपर्यंत त्यावर फारसे काही काम मात्र झाले नव्हते. सुदैवाने, गेल्या चार वर्षांत शेतकऱ्यांची मिळकत आणि त्यांची प्रतिष्ठा सुधारण्यासाठी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले गेले आहेत. कृषिखात्याचे नाव बदलून ते कृषी आणि शेतकरी कल्याण खाते असे केल्याने शेतकऱ्यांचे कल्याण हेच कृषी विकासाचे मानक ठरवण्यावर जोर दिला गेला आहे. 'सॉईल हेल्थ कार्ड' शेतकऱ्यांना देणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण मातीचे आरोग्य (कस) हा वनस्पतीच्या आरोग्याचा आधार असतो आणि वनस्पतीच्या आरोग्याचा आधार हा मानवी आरोग्याचा आधार आहे. ही साखळी महत्त्वाची आहे.

## सूक्ष्म सिंचनाला प्रोत्साहन

प्रधानमंत्री कृषिसिंचन योजनेच्या माध्यमातून सूक्ष्म सिंचनाला प्रोत्साहन देण्यासाठी अर्थसंकल्पीय तसेच बिगर अर्थसंकल्पीय साधने पुरवण्यात आली आहेत. राष्ट्रीय गोकुळ मिशनद्वारे पशुधनाच्या देशी जाती टिकवण्यासाठी आणि त्यात वृद्धी करण्यासाठी प्रोत्साहन दिले जात आहे. प्रधानमंत्र्यांनी पहिल्यावहिल्या आंतरराष्ट्रीय कृषी जैववैविध्य काँग्रेसचेही उद्घाटनही याच हेतूने केले होते.



इलेक्ट्रॉनिक (डिजिटल) राष्ट्रीय कृषी बाजारपेठांना प्रोत्साहन दिले जात असल्याने शेतीमालासाठी एकंदरीच वेगवेगळ्या बाजारपेठा मिळण्यास मदत होत आहे. त्याचप्रमाणे ग्रामीण कृषी बाजारपेठांमुळे किरकोळ तसेच घाऊक प्रमाणात थेट ग्राहकाला माल विकण्याची सुविधा मिळाली आहे. यातली महत्त्वाची घडामोड नोंदवायची म्हणजे 'कृषी उत्पादन आणि पशुधन पणन कायदा २०१७' आणि 'कृषी उत्पादन आणि पशुधन करार शेतीसेवा कायदा २०१८' आणल्याने आणि त्यास इलेक्ट्रॉनिक निगोशिएबल वेअरहाऊस रिसिप्ट सिस्टिमचा आधार दिला गेल्यामुळे शेतीचा संस्थात्मक पतपुरवठा वाढेल.

'एनसीएफ'च्या शिफारसीनुसार किमान आधारभूत किंमत ठरवण्याची पद्धत आणि अधिकाधिक पिके या किमान आधारभूत किंमतीनुसार खरेदी करण्याची हमी खूप महत्त्वाची आहे. रेशन योजना, माध्यान्ह भोजन योजना आणि सर्वंकष बालविकास योजना यांसह अन्य कल्याणकारी योजनांसाठी प्रथिनयुक्त कडधान्ये आणि सत्त्वयुक्त नाचणी यांचा समावेश करणेही लक्षणीय आहे.

मधमाशी पालन, अळंबी उत्पादन, बांबू उत्पादन, वन्यकृषी, गांडुळखत आणि कृषिमाल प्रक्रिया आदी क्षेत्रांना प्रोत्साहन दिले जात असून त्यातून अतिरिक्त नोकऱ्या निर्माण करणे आणि शेतकरी कुटुंबासाठी अतिरिक्त पैसा मिळावा हे हेतू आहेत. प्रधानमंत्र्यांनी असेही सांगितले की, आपल्याला अशा पद्धतीच्या कार्यपद्धती विकसित करायला हव्यात. जेणेकरून शेतकऱ्यांचे उत्पादन पाच वर्षांत दुप्पट व्हावे. अपुरे जलसंधारण प्रकल्प पूर्ण करण्यासाठी, दुग्धप्रक्रिया उद्योगातील पायाभूत सुविधा अद्ययावत करण्यासाठी आणि सागरी तसेच गोड्या पाण्यातील मत्स्यपालनाचे प्रकल्प करणे सोपे व्हावे, यासाठी अनेक कॉर्पस फंड स्थापन केले जात आहेत. या सर्वांपेक्षाही एनसीएफच्या शिफारसीनुसार किफायती दरांची अलीकडेच केली गेलेली घोषणा शेतीच्या व्यवहार्यतेच्या दिशेने ठोस पाऊल आहे. सरकारने आपल्या अधिसूचनेत हे आश्वासन दिले आहे की, खरीप २०१८ पासून सूचीबद्ध पिकांसाठी किमान आधारभूत किमती उत्पादन खर्चाच्या किमान दीडपट असतील आणि भरड कडधान्यासाठी त्या दुप्पट असतील.

## आधारभूत किमतीच्या शिफारसी

शेतकऱ्यांचे आंदोलन अद्याप सुरूच असून त्यांचे कर्ज माफ करावे आणि 'एनसीएफ'च्या किमान आधारभूत किमतीच्या शिफारसी लागू कराव्यात, ही प्रमुख मागणी आहे. या दोन्ही मागण्यांकडे सहानुभूतीने लक्ष दिले जात असून सकारात्मक पावलेही उचलली जात आहेत. 'जय किसान' या संकल्पनेला साकार करण्यासाठी ही काही मोजकी पावले सरकारने उचलली आहेत. वरील सर्व योजना राज्य सरकार आणि केंद्र सरकारने अमलात आणल्या तर शेती आणि शेतकऱ्यांचे भवितव्य यांना आकार देता येईलच, शिवाय देशालाही अन्न आणि पोषणाच्या क्षेत्रात आघाडी घेण्यास मदत होईल. त्याच्याच जोडीला प्रधानमंत्र्यांनी राष्ट्रीय पोषण मिशन जाहीर केले असून, त्याला तीन वर्षांसाठी नऊ हजार कोटी रुपयांचा निधी देऊ केला आहे. ग्रामीण भारताची प्रमुख उद्योगव्यवस्था म्हणून शेतीवर प्रधानमंत्र्यांनी दिलेला भर पाहता शेती हे मिळकतीचे तसेच राष्ट्राभिमानाचे क्षेत्र बनवण्यासाठी शक्य ते सारे करणारी ही धोरणे आहेत, यात शंका नाही. (दिनांक ९ ऑगस्ट २०१८, महाराष्ट्र टाइम्सवरून साभार)

**(लेखक कृषीविषयक राष्ट्रीय आयोगाचे अध्यक्ष होते.)**




**राज्याचा उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा सहभाग व युनिसेफच्या सहकार्याने माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत 'युवा माहिती दूत' हा उपक्रम राबवण्यात येत आहे. विविध शाखांमध्ये पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या महाविद्यालयातील युवकांमार्फत शासकीय योजनांची माहिती लाभार्थ्यांपर्यंत थेटपणे पोहोचवणे हे 'युवा माहिती दूत' उपक्रमाचे वैशिष्ट्य आहे.**

# व्हा... 'युवा माहिती दूत'

**शासन** अनुदानित वैयक्तिक लाभाच्या योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याकरिता त्यांच्याशी थेट संपर्क साधणे आवश्यक असते. दारिद्र्यरेषेखालील तसेच ग्रामीण वा दुर्गम भागातील अशिक्षित व अर्धशिक्षित लाभार्थ्यांपर्यंत त्यांच्यासाठी असलेल्या योजनांची माहिती पोहोचवण्यात वृत्तपत्रे, रेडिओ आणि दूरचित्रवाणी वाहिन्या या माध्यमांना मर्यादा येतात. त्यामुळे या योजना दुहेरी संवादातून त्यांच्यापर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्यास समाजकार्याची आवड असलेल्या उत्साही तरुण वर्गाचे साहाय्य घेण्याच्या हेतूने 'युवा माहिती दूत' हा उपक्रम राबवण्यात येत आहे.

### कार्यक्रमाची अंमलबजावणी

**जिल्हा माहिती अधिकारी :** जिल्हास्तरावर जिल्हा माहिती अधिकारी हे नोडल अधिकारी असतील.

**मार्गदर्शक :** प्रत्येक महाविद्यालयात मार्गदर्शक नेमण्यात येतील. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाकडून देण्यात आलेल्या आयडी आणि पासवर्डच्या माध्यमातून हे मार्गदर्शक महाविद्यालयाची नोंदणी करतील. महाविद्यालयातील अध्यापक व अध्यापकेतर अधिकारी यांची 'मार्गदर्शक' म्हणून महाविद्यालय निवड करतील. ज्या विद्यार्थ्यांनी 'माहितीदूत' होण्याची इच्छा व्यक्त केली आहे, त्या विद्यार्थ्यांना ते माहितीदूत म्हणून मंजूरी देतील किंवा त्यांची विनंती नामंजूर करतील.

**समन्वयक :** शासन यंत्रणेची आणि योजनांची माहिती असलेल्या व समाजसेवेची आवड असलेल्या व्यक्तीची समन्वयक म्हणून निवड करण्यात येणार आहे.

**युवा माहिती दूत :** या उपक्रमासाठी स्वेच्छेने तयार असलेले/ निवडण्यात आलेले विद्यार्थी सहा महिन्यांच्या कालावधीसाठी राज्य शासनाचे 'युवा माहिती दूत' असतील. या कालावधीत किमान ५० प्रस्तावित लाभार्थ्यांच्या घरी जाऊन, त्यांच्याशी संपर्क साधून त्यांच्यासाठी लागू असणाऱ्या योजनांची माहिती देतील. लाभार्थ्यांशी अथवा त्यांच्या परिसराशी निगडित विकास कामांची माहिती देऊन संबंधितांच्या प्रतिक्रियांची नोंद करतील.

'युवा माहिती दूत' च्या माध्यमातून राज्य शासनाकरिता काम करण्याची महत्त्वाची संधी युवकांना मिळणार आहे. राज्य शासनाच्यावतीने त्यांना सहा महिन्यांकरिता 'युवा माहिती दूत' असे ओळखपत्र त्यांना देण्यात येईल. ठरवून दिलेले काम केल्यानंतर त्यांना शासनाचे डिजिटल प्रमाणपत्र देण्यात येईल.

### असे व्हा युवा माहिती दूत

- प्रत्येक महाविद्यालयातील सहभागी विद्यार्थ्यांसाठी त्या महाविद्यालयातील अध्यापक वा अध्यापकेतर अधिकारी/कर्मचारी यापैकी एक 'मार्गदर्शक' म्हणून नेमण्यात येईल.
- या योजनेच्या अंमलबजावणीसाठी विशेष मोबाइल ॲप्लिकेशन तयार करण्यात आले आहे. या मोबाइल ॲप्लिकेशनमध्ये प्रत्येक महाविद्यालयातील मार्गदर्शक, समन्वयक आणि सहभागी युवक यांचे अकाऊंट असेल.
- महाविद्यालयातील विद्यार्थी 'माहितीदूत' होण्यासाठी स्वत:हून या ॲप्लिकेशनवर स्वत:च्या नावाची नोंदणी करतील.
- युवकांनी प्रस्तावित लाभार्थ्यांना कोणत्या योजनांची माहिती द्यावी याकरिता तपशील सांगणारा मजकूर/ व्हिडीओ/ एफएक्यू देण्यात आले आहे. त्याशिवाय योजनेचा लाभ घेण्यासाठी आवश्यक असणारी कागदपत्रे, संबंधित शासकीय कार्यालयाचा संपर्क आदी तपशील असेल.
- प्रस्तावित लाभार्थ्याची भेट घेतल्यानंतर 'युवा माहिती दूत' हे त्या लाभार्थ्यांचा तपशील आपल्या मोबाइलमधील ॲप्लिकेशनमध्ये नोंदवतील. या तपशिलानुसार संबंधित योजनांची माहिती ॲप्लिकेशनमधून घेऊन प्रस्तावित लाभार्थ्यांना ते समजावून सांगतील.
- लाभार्थ्यांना हे ॲप्लिकेशन डाऊनलोड करण्यासाठी माहिती दूत मदत करतील. तसेच या ॲप्लिकेशनच्या माध्यमातून शासनाच्या सर्व योजना, उपक्रमांची माहिती लाभार्थ्यांना एकाच ठिकाणी मिळणे शक्य होणार आहे.
- माहिती व जनसंपर्क महासंचालनालय आणि माहिती दूत यांच्यामध्ये संदेशांची देवाणघेवाण, प्रशिक्षण, पुनर्विलोकन या ॲप्लिकेशनमार्फत होईल. मार्गदर्शक, समन्वयक, माहिती दूत, प्रस्तावित लाभार्थी या सर्वांची नोंदणी मोबाइल क्रमांकाशी निगडित असेल.
- विविध समाजातील (शेतकरी, महिला, आदिवासी, अल्पसंख्याक, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती,) लाभार्थ्यांसाठी वैयक्तिक लाभाच्या किमान २५ ते ३० योजनांचा समावेश या उपक्रमासाठी करण्यात येईल.



संवाद वारीतील चित्रप्रदर्शन पाहताना वारकरी.

**सतत नावीन्याचा स्वीकार करून शासकीय योजना, उपक्रम, निर्णय, अभियान जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचे काम माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत होत आहे. असाच संवादवारी नावीन्यपूर्ण उपक्रम घेऊन यंदाच्या पंढरपूर आषाढी वारी सोहळ्यात माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने शासन योजना जनसामान्यांपर्यंत पोहोचवल्या. या उपक्रमाला वारकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शासन आपल्या दारी आल्याचे समाधान त्यांच्या चेहऱ्यावर पाहावयास मिळाले.**

# शासन आपल्या दारी

पंढरपूरच्या आषाढी वारी सोहळ्यासाठी श्री क्षेत्र आळंदी येथून संत ज्ञानेश्वर माऊली आणि जगद्‌गुरु संत तुकाराम महाराजांची पालखी देहू येथून प्रस्थान करते. या पालखी सोहळ्यात राज्याच्या कानाकोपऱ्यातून लाखो वारकरी भाविक स्वयंप्रेरणेने, उत्स्फूर्तपणे सहभागी होतात. आषाढी वारी पालखी सोहळ्यात सहभागी होणारा वारकरी शेतकरी, कष्टकरी वर्गातील असतो. पालखी सोहळ्यात सहभागी होणाऱ्या वारकरी भाविकांना शासनाची ध्येय धोरणे, योजना, निर्णय, उपक्रम, अभियान याची माहिती व्हावी हा मुख्य उद्देश डोळ्यासमोर ठेऊन माहिती व जनसंपर्क महासंचालनालय 'संवाद वारी पाहो सुखाचा सोहळा' हा नावीन्यपूर्ण उपक्रम घेऊन सहभागी झाले.

## योजना आपल्या दारी

संवादवारी या उपक्रमात चित्ररथ, पथनाट्य, कलापथक, प्रदर्शन, आणि एलईडी स्क्रीनद्वारे शासन योजनांची माहिती वारकरी भाविकांना देण्यात आली. यामध्ये प्रामुख्याने छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना, जलयुक्त शिवार, मागेल त्याला शेततळे, अखंड वीज पुरवठा, गोपीनाथ मुंढे शेतकरी अपघात विमा योजना, प्रधानमंत्री पीक विमा योजना, मुख्यमंत्री सहायता निधी, बाजार समित्यांमध्ये सुधारणा, डिजीटल सातबारा, उन्नत शेती–समृद्ध शेतकरी, महात्मा फुले जन आरोग्य योजना, गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार यांसह विविध लोकोपयोगी कल्याणकारी योजनांचा समावेश होता.

## लोककलेच्या माध्यमातून संवाद

भक्तीरसात चिंब होऊन पंढरीच्या वाटेवर लाडक्या विठुरायाच्या दर्शनाच्या ओढीने निघालेल्या वारकऱ्याला व वारीत सहभागी होणाऱ्या अन्य भाविकांना शासकीय योजनांची माहिती देताना पारंपरिक लोककलांचा प्रभावीरीत्या वापर करण्यात आला. कलापथक व पथनाट्यातून माहिती देण्यात आली. शाहिरी, भारुड, गवळण या माध्यमातून लोकांना साध्या सहज आणि सुलभ भाषेत योजना, उपक्रम याची माहिती पोहोचवण्यात आली. चित्ररथ आणि चित्र प्रदर्शनातून योजनांची ठळक माहिती देण्याचा आगळा–वेगळा प्रयत्न यशस्वी ठरला. लोककल्याणाच्या योजना प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहचविल्याशिवाय, त्या योजना यशस्वी होत नाहीत. यासाठीच दोन्ही वारी मार्ग व आषाढी वारी सोहळ्यात संवाद वारी उपक्रमाच्या माध्यमातून शासनाच्या जनकल्याणाच्या योजना सामान्यांपर्यंत पोहोचवण्याचे काम संवाद वारीमध्ये झाले.

## उत्स्फूर्त प्रतिसाद

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय शासनाचे कान, नाक आणि डोळे म्हणून सदैव तत्परतेने काम करणारा विभाग आहे. या विभागामार्फत पहिल्यांदाच संत श्री ज्ञानेश्वर आणि संत श्री तुकाराम महाराजांच्या पालखी तळावर शासनाच्या योजनांचा संवाद सेतू उभारण्यात आला. प्रत्येक पालखी तळाच्या ठिकाणी झालेल्या कलापथकाचे कार्यक्रम, पथनाट्य आणि शाहिरी कार्यक्रमांना वारकरी भाविकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. अनेक ठिकाणी वारकऱ्यांनी थेट कलापथकाच्या कार्यक्रमावर ताल धरला. संवाद वारीच्या सोहळ्याचा शेवटचा टप्पा होता कृषी पंढरीत. २२ जुलै रोजी परिवहन मंत्री दिवाकर रावते, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री विजय देशमुख, ज्येष्ठ नेते सुधाकरपंत परिचारक, आमदार प्रशांत परिचारक यांच्या उपस्थितीत संवाद वारीचा समारोप झाला.

'संवादवारी' उपक्रमाच्या माध्यमातून लाखो वारकऱ्यांपर्यंत शासनाच्या योजना पोहोचवण्यात आल्या. कलापथक, पथनाट्य, चित्ररथ व चित्रप्रदर्शनाच्या माध्यमातून अत्यंत प्रभावीपणे योजना पोहचविण्याचे काम सर्व कालाकारांनी केले. पंढरपूर येथे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात योजनांचे चित्रप्रदर्शन भरविण्यात आले होते. या प्रदर्शनाचा लाखो वारकऱ्यांनी लाभ घेतला. दरम्यान लोकराज्य मासिकाच्या वारी विशेषांकाच्या ध्वनीफितीचे अनावरण करण्यात आले.

# केरळमधील पूरग्रस्तांसाठी महाराष्ट्राकडून अर्थसाहाय्य



**देवेंद्र फडणवीस,** मुख्यमंत्री

केरळमध्ये अतिवृष्टीमुळे ओढवलेल्या संकटप्रसंगी पूरग्रस्तांना मदत म्हणून महाराष्ट्रातर्फे २० कोटी रुपयांची तातडीची आर्थिक मदत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केली आहे. तसेच राज्य शासन, विविध सामाजिक व स्वयंसेवी संस्थांशी संपर्कात असून, त्यांच्याशी समन्वय साधून अन्नपुरवठा व इतर मदतीसाठी राज्याकडून पुढाकार घेण्यात आला आहे. समाजाच्या सर्व स्तरातील घटकांनी शक्य ती मदत करावी, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केले आहे.

केरळमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणावर जीवित तसेच वित्तहानी झाली असून, पूरग्रस्तांसाठी देशभरातून मदतीचा ओघ सुरू झाला आहे. महाराष्ट्राकडून तातडीची मदत म्हणून २० कोटींचे अर्थसाहाय्य मुख्यमंत्र्यांनी घोषित केले आहे. राज्यशासन केरळ सरकारशी सातत्याने संपर्कात असून, त्यांना आवश्यक ते सर्व सहकार्य पुरवण्यात येत आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री सचिवालयाच्या पुढाकाराने राज्य आपत्ती व्यवस्थापन कक्षाशी संबंधित सर्व अधिकाऱ्यांची विशेष बैठक मंत्रालयात घेण्यात आली. एका विशेष पथकाची नियुक्ती करून त्यावर याबाबतच्या समन्वय आणि कार्यवाहीची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

केरळ पूरग्रस्तांसाठी अन्नाचा पुरवठा ही प्राधान्याची गरज असल्याचे लक्षात घेऊन महाराष्ट्रातील विविध सामाजिक, स्वयंसेवी तसेच व्यावसायिक संस्थांशी शासनाने समन्वय साधत अन्नपुरवठा करण्याची व्यवस्था केली आहे.

### केरळ आपदग्रस्तांना मदत करा... मुख्यमंत्र्यांचे आवाहन

केरळ राज्यात अतिवृष्टी आणि पुरामुळे बाधित झालेल्या आपद्ग्रस्तांना मदत करण्यासाठी महाराष्ट्रातील नागरिक व संस्था मोठ्या प्रमाणात पुढे येत आहेत. मदत करण्यास इच्छुक असणाऱ्यांनी आपली आर्थिक मदत बँक ऑफ महाराष्ट्रमधील राज्य शासनाच्या ६०३१२९७८१४९ या खाते क्रमांकावर Chief Minister Kerala Flood Relief Fund या नावाने धनादेश किंवा डीडी स्वरूपात पाठवावी, असेही आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे.

@Dev_Fadnavis

Thank you Shri Vitthal Rukmini Mandir Samiti, Pandharpur for contribution of ₹25,00,000/- towards #CMReliefFund for #KeralaFloodRelief !

केरळातील पूरग्रस्तांसाठी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीने २५ लाख रुपयांचा धनादेश मुख्यमंत्री सहायता निधीला प्रदान केला. मी त्यांचा आभारी आहे.

@Dev_Fadnavis

Thank you Cricket Club of India for the contribution of ₹11,00,000/- towards #CMReliefFund for #KeralaFloodRelief ! !

केरळातील पूरग्रस्तांसाठी क्रिकेट क्लब ऑफ इंडियाच्या वतीने ११ लाख रुपयांचा धनादेश मुख्यमंत्री सहायता निधीला प्रदान करण्यात आला. मी त्यांचा आभारी आहे.



**CMO Maharashtra**
@CMOMaharashtra

Great getsure :
On CM @Dev_Fadnavis' appeal, by Sangli Collector Office's initiative, all citizens, NGOs, media, businessmen, students came together & collected around 14.5 ton food products in a record time for #KeralaFloods affected persons.

उमेद
महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान
ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन



## उमेद- महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची वाटचाल

- स्वयंसहाय्यता गटांची संख्या – ३ लक्ष
- सहभागी कुटुंबांची संख्या –३४ लक्ष
- प्रशिक्षित समुदाय संसाधन व्यक्ती – ३० हजार
- बँकेमार्फत स्वयंसहाय्यता गटांना अर्थसहाय्य – रू.४२०० कोटी
- अभियानांतर्गत समुदायस्तरीय संस्थांना समुदाय निधीचे वाटप – रु. ५०० कोटी
- डीडीयुजीकेवाय अंतर्गत ११,०८२ युवक –युवतींना रोजगाराच्या संधी उपलब्ध
- आर–सेटी योजनेअंतर्गत ९६,५४२ युवक –युवतींना स्वयंरोजगारांच्या संधी उपलब्ध
- ५ लक्ष कुटुंबांना उपजीविकेचे स्त्रोत उपलब्ध व त्यामधून रू. ५०० कोटींचे उत्पन्न

**वर्धिनी ताईंना प्रतिसाद देऊ या**
**स्वयंसहाय्यता गटात सहभागी होऊ या**
**आपले भविष्य सक्षम व उज्ज्वल करू या!**

### अस्मिता योजना -

- जिल्हा परिषद शाळेतील ११ ते १९ वयोगटातील मुलींसाठी अस्मिता कार्ड
- अस्मिता कार्डधारक मुलींना ८ पॅडचे (२४० मीमी) सॅनिटरी नॅपकिनचे एक पॅकेट रू.५ या सवलतीच्या दरात उपलब्ध
- ग्रामीण भागातील महिलांना ८ पॅडचे (२४० मीमी) एक पॅकेट रू. २४ व ८ पॅडचे (२८० मीमी) एक पॅकेट रू. २९ या माफक दरात उपलब्ध
- स्वयंसहाय्यता गटांच्यामार्फत सॅनिटरी नॅपकिनची विक्री
- २५ हजार स्वयंसहाय्यता गटांची नोंदणी



श्री. नरेंद्र मोदी
मा. प्रधानमंत्री



श्री. देवेंद्र फडणवीस
मा. मुख्यमंत्री

पंकजा गोपीनाथ मुंडे
मा. मंत्री, ग्रामविकास, महिला व बालविकास

श्री. दादाजी भुसे
मा. राज्यमंत्री, ग्रामविकास विभाग

# माहितीचा खजिना

**अभ्यासक, विद्यार्थी, अधिकारी, पत्रकार यांसाठी उत्कृष्ट आणि उपयुक्त संदर्भग्रंथ...**

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

## महाराष्ट्र वार्षिकी २०१८ प्रकाशित

- कला, क्रीडा, साहित्य, संस्कृती, इतिहास, भूगोल, संसद सदस्य, विधिमंडळ सदस्य, केंद्र व राज्य मंत्रिमंडळ यादी
- महाराष्ट्राच्या निर्मितीपासून सद्य:स्थितीपर्यंतचा आढावा
- शासनाच्या विविध विभागांची संरचना, कामकाज पद्धती, धोरणे, निर्णय, कार्यालयांचे संपर्क
- मंत्रिमंडळ निर्णय, २०१८–१९ अर्थसंकल्प, पुरस्कार इत्यादी...

**अधिकृत!**
**वस्तुनिष्ठ!**
**विश्वासार्ह!**




पृष्ठे ४००
किंमत ₹ २५०

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2018-20
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 12th to 17th Every Month
Date of Publication : 10th of Every Month




महाराष्ट्र शासन, कृषी विभाग

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना



श्री. नरेंद्र मोदी
मा. प्रधानमंत्री

श्री. देवेंद्र फडणवीस
मा. मुख्यमंत्री

## उद्दिष्ट

अनुसूचित जाती / नवबौध्द शेतकऱ्यांना शाश्वत सिंचनाची सुविधा उपलब्ध करुन देणे.

## व्याप्ती

मुंबई आणि मुंबई उपनगर वगळता सर्व ३४ जिल्हे

## पात्रतेचे निकष

१. अर्जदार अनुसूचित जाती / नवबौध्द प्रवर्गातील असावा.(जातीचे प्रमाणपत्र आवश्यक)

२. जमिनीचा ७/१२ व ८-अ चा उतारा आवश्यक.

३. वार्षिक उत्पन्न रु. १,५०,०००/- च्या मर्यादित असावे. (उत्पन्नाचा दाखला आवश्यक)

४. लाभार्थीची जमीन धारणा - ०.२० हेक्टर ते ६ हेक्टरपर्यंत असावी. (नवीन विहिरीच्या लाभासाठी किमान क्षेत्र ०.४० हे. आवश्यक)

५. सामुहिक शेत जमीन किमान ०.४० हेक्टर धारण करणारे एकत्रित कुटुंब नवीन विहीर या घटकाचा लाभ घेण्यासाठी पात्र असेल.

## अर्जाची कार्यपद्धती

agriwell.mahaonline.gov.in या महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर ऑनलाईन अर्ज भरण्याची सुविधा दि.१० ऑगस्ट ते ९ सप्टेंबर २०१८ पर्यंत.

## राबविणारी यंत्रणा

जिल्हा परिषदेचा कृषी विभाग.

## अनुदान

| बाब | अनुदान मर्यादा (रुपये) |
|---|---|
| • नवीन विहीर | २,५०,०००/- |
| • जुनी विहीर दुरुस्ती | ५०,०००/- |
| • इन वेल बोअरिंग | २०,०००/- |
| • पंप संच | २०,०००/- |
| • विज जोडणी आकार | १०,०००/- |
| • शेततळ्यांचे प्लास्टिक अस्तरीकरण | १,००,०००/- |
| • सूक्ष्म सिंचन संच | ठिबक ५०,०००/-किंवा तुषार २५,०००/- |

## नवीन विहीर पॅकेज

नवीन विहीर, पंपसंच, विज जोडणी आकार, तुषार किंवा ठिबक यासाठी एकुण रु. ३.०५ ते ३.३० लाख.

## जुनी विहीर दुरुस्ती पॅकेज

जुनी विहीर दुरुस्ती, पंपसंच, वीज जोडणी आकार, तुषार किंवा ठिबक यासाठी एकुण रु. १.०५ लाख ते १.३० लाख.

## शेततळ्याचे प्लॅस्टीक अस्तरीकरण पॅकेज

शेततळ्याचे प्लॅस्टीक अस्तरीकरण, पंपसंच, वीज जोडणी आकार, तुषार किंवा ठिबक यासाठी एकुण रु. १.५५ लाख ते १.८० लाख

अर्जदाराकडे जर काही घटक उपलब्ध असतील तर उर्वरित आवश्यक घटकांचा लाभ विहीत मर्यादेत देण्यात येईल. उपरोक्त घटकांचा लाभ घेतल्यानंतरही लाभार्थ्याने ईनवेल बोअरींग या घटकाची मागणी केल्यास सदर घटकाचा अतिरिक्त लाभ देण्यात येईल.

## संपर्क कार्यालये

पंचायत समिती, कृषी विभाग
जिल्हा परिषद, कृषी विभाग

कृषी आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे


Visit: www.mahanews.gov.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR

प्रति/TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

*If undelivered, please return to:*

प्रेषक / From

मीनल जोगळेकर
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
लोकराज्य शाखा, ठाकरसी हाऊस, २रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊसजवळ, शुरजी वल्लभभाई मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई – ४०० ००१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक मीनल जोगळेकर, वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी डिलिजंट मीडिया कॉर्पोरेशन लि., प्लॉट नं. ईएल /२०१, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, महापे, नवी मुंबई – ४०० ७०४ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक: ब्रिजेश सिंह